सप्टेंबर, २०१८
पृष्ठे १३२ । किंमत १५
वर्ष अठरावे । अंक नववा

मेहता मराठी ग्रंथजगत



तू सकलांचा भाग्यविधाता,
तू विद्येचा स्वामिदाता
ज्ञानदीप उजळून आमुचा,
निमवी नैराश्याला



'रेड टेप'चे प्रकाशन : 'रेड टेप'चे प्रकाशन करताना अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख व 'एबीपी माझा'चे संपादक राजीव खांडेकर. समवेत 'दिव्य मराठी'चे राज्य संपादक प्रशांत दीक्षित, मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता, 'दिव्य मराठी'चे निवासी संपादक जयप्रकाश पवार, उप संपादक अभिजित कुलकर्णी.

'मॅग्नोलिया'चे प्रकाशन : 'मॅग्नोलिया'चे प्रकाशन करताना सुविख्यात नृत्यांगना शर्वरी जमेनीस. समवेत लेखिका अनिता कुलकर्णी आणि मेहता पब्लिशिंग हाऊसच्या प्रॉडक्शन विभागाच्या प्रमुख राजश्री देशमुख.

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ सप्टेंबर २०१८ ◆ वर्ष अठरावे ◆ अंक नववा

संपादक :
सुनील मेहता
कार्यकारी संपादक :
शंकर सारडा
संपादन सहाय्य :
अंजली पटवर्धन
अंकाची किंमत १५ रु.
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.
प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
मेहता पब्लिशिंग हाऊस

– अनुक्रमणिका –

संपादकीय	४
साहित्यवार्ता	१०
उपक्रम	२०
पुस्तक परिचय	
सिक्स मशिन	२८
विशेष लेख	४०
पुस्तक परिचय	
द ओडेसा फाइल	४६
घाचर घोचर	६०
धना	७२
सर्जा	८०
रेझोनान्स	९२
अडगळ	१०४
नाना आणि महादजी	११४
अभिप्राय	१२४

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/ २४४७५४६२ E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

संपादकीय

साहित्यिकांचे निसर्ग चिंतन

आषाढ-श्रावण महिन्यात पावसाच्या सरी धरतीला चिंब करून जातात आणि मग ती हिरवा शालू परिधान करते. तिचं हे लावण्य अनिमिष नेत्रांनी पाहत राहावं असं असतं. निसर्गाच्या या बहरलेल्या पार्श्वभूमीवर होणारं गणपती-गौरींचं आगमन मनाला आणखी प्रसन्न करणारं असतं. माणसाचं मन असं निसर्गाशी जोडलेलं असतं; पण सर्वसामान्य माणसाला हे जोडलेपण जाणवत नाही किंवा जाणवलं तरी व्यक्त करता येत नाही. साहित्यिक मात्र माणसाच्या भावभावनांची निसर्गाशी असलेली बांधिलकी उत्कटतेने व्यक्त करतात; तर लेखक-कवींनी आपल्या लेख/कथा/कादंबऱ्या/कवितांमधून घडवलेलं विविधरंगी निसर्गदर्शन आणि त्या निसर्गाशी त्यांच्या भावनांचं झालेलं तादात्म्य अनुभवूयात त्यांच्याच शब्दांत.

'कवडसे' या शिवाजी सावंत यांच्या लेखसंग्रहात त्यांनी 'माझं जन्मगाव...आजरा' या लेखात आजऱ्यातील निसर्ग सौंदर्याचं फार सुंदर वर्णन केलं आहे. ते लिहितात, *'मनात प्रतिसाद देणारी जिवंत नस असेल तर खूप-खूप स्वर्गीय भाषेत बोलतं आजऱ्याचं 'ठेंगणं', निळंशार आभाळ! त्यात शाळूचे म्हणजे सुगीचे, कापणीचे दिवस असले, शिवारातील पिवळीधमक झालेली भाताच्या लोंब्यांची लड मावळ वाऱ्यावर डुलू लागली, आंब्याच्या डेरेदार गच्चपणात कवडे घुमू लागले, रानात तिळाची, भुईमुगाची पिवळी फुले डुलू लागली की, आजऱ्याची ही 'गगन बोली' मनाचे सप्तसूर टिपेने छेडते...'अजर' सौंदर्यानं अंगभर नटलेलं ते आजरा! '* शिवाजी सावंतांनी किती सहजपणे माणसाच्या मनाचं निसर्गाशी नातं जोडलंय. हा संपूर्ण लेखच आजऱ्याच्या निसर्ग वर्णनासाठी वाचावा असा आहे.

गोव्यातला निसर्ग असाच मनाला साद घालणारा आहे. माधवी

देसाईंच्या 'धुमारे' या ललित लेखसंग्रहांतील लेखांमध्ये गोव्यातील निसर्गाचं प्रतिबिंब पडलेलं दिसतं. 'तळी' या ललित लेखात गोव्यातील नागेशी आणि बांदिवडे या दोन गावांना जोडणाऱ्या तळ्याचं वर्णन त्यांनी केलं आहे. त्या लिहितात, *'पानी तेरा रंग कैसा?' या प्रश्नाला या तळीच्या पाण्याचा रंग कसा, तर हिरवागार. सभोवताली दाट कुळागरं, नारळी, केळी, पोफळीची थंडगार वनं! त्यांची हिरवी दाट छाया. पाण्यात उतरून शुभ्र पाणीच पाचूमय झालं... असं पाचूच्या रंगानं माखलेलं हे तळं!...ती हिरवीकंच पाण्यानं भरलेली बंदिस्त तळी नजरेत भरते. त्या तळीवर पांढऱ्या ढगांनी भरलेलं निळं आभाळही असतं. पण तळी मात्र हिरवीगार! निळ्या आभाळावर इथे हिरव्या झाडीनं मात केली हे मनोमन पटतं. त्या विस्तीर्ण तळीवर अनेक प्रतिबिंबं असतात. ढगांची, झाडांची आणि जीवनाचीही!'*

व्यंकटेश माडगूळकरांना जंगलाची ओढहोती. जंगलातल्या निसर्गात रमण्याबरोबरच प्राण्यांचं निरीक्षण करणं त्यांना आवडायचं. म्हणूनच नोकरीतून एक महिना रजा काढून ते नागझिऱ्याच्या जंगलात राहायला गेले. त्या निसर्गाच्या सहवासात काही वेळेला त्यांचं मन चिंतन करायला लागे. नागझिऱ्यामध्ये अशाच एका निवांत क्षणी त्यांच्या मनात प्रकटलेलं हे चिंतन. ते लिहितात, *'माणसे हीसुद्धा ज्या काळी, हरिणाप्रमाणे निसर्गाची लेकरे म्हणून वावरत होती, तो काळ किती वैभवाचा म्हणावा! तेव्हा एखादा देवदार वृक्ष कोणी पुत्रवत् मानून त्याचे पालनपोषण करी. वनातील वाटेवरून रथ चालला की, चाकांचा आवाज ऐकून मोर केकारव करीत. मनू म्हणतो की, कृष्णसारमृग ज्या वनात यथेच्छ विहार करतात, तो प्रदेश यज्ञीय समजावा. आता कोठे आहेत ते कृष्णसारमृग? मध्य भारतातील कान्हा-किसलीसारख्या विस्तीर्ण अभयारण्यातसुद्धा त्यांची संख्या केवळ एकवीसच आढळावी? मनुष्यप्राणी तेवढा जगावा आणि वाढावा म्हणून आपण कशाकशाचा संहार करणार आहोत? असा संहार करीत गेलो, तर आपलाही समूळ नाश होणार आहे, हे आपल्या ध्यानी कधीच येणार नाही का?'* माडगूळकरांचं हे चिंतन माणूस निसर्गापासून किती दूर गेला आहे, हे

सूचित करणारं आणि भविष्यातील धोक्याची जाणीव देणारं! चाळीस वर्षांपूर्वी माडगूळकरांनी दिलेल्या या इशाऱ्याकडे आज तरी कुणी गांभीर्याने बघतं आहे का?

माडगूळकरांसारखा साहित्यिक डोळसपणाने निसर्गाकडे पाहत होता, तर शान्ताबाईंसारखी कवयित्री निसर्गाची नवलाई डोळयांत आणि मनात साठवत होती. अशाच एका क्षणी डोंगरावर, डवरून आलेल्या ढगांच्या शुभ्र माळेखाली शान्ताबाई उभ्या असताना त्यांच्या मनात जे भाव दाटून आले, त्याचं वर्णन त्यांनी 'डोंगरावर' या कवितेत केलं आहे. त्या लिहितात-

छाती भरभरून घेतला श्वास मी, प्यायले निर्भर वारा
डोळे विस्फारून आत भिनवला, भिनवला आसमंत सारा
वाटले मला मी साऱ्या जगाहून उंच, अस्पर्श, अलग
उजळून आली आतून आतून एक अलौकिक झगमग

तर निसर्गाच्या सान्निध्यात मनाला जे एक अलौकिक सामधान लाभतं, व्यापकतेची जी अनुभूती येते, ती शान्ताबाईंनी किती सुंदर शब्दांमध्ये व्यक्त केली आहे. 'गोंदण'मधील बहुतांश कवितांमधून निसर्ग आणि शान्ताबाईंच्या मनातील भावभावनांचा कोलाज अनुभवायला मिळतो.

तर साहित्यिक किती उत्कटतेने, आपुलकीने आणि चिंतनशीलतेने निसर्गाकडे बघत असतात, याचं प्रत्यंतर तर वरील वेचे देतातच; पण हे नुसते वेचेही अनुभवताना आपण नि:शब्द होऊन जातो आणि मग समारोपही करावासा वाटतो शान्ताबाईंच्या शब्दांत-

कधीतरी कुठेतरी एक उमलले फूल
त्याच्या आभाळगंधाची पडे अनंताला भूल
तेव्हापासून, तसेच, जिणे तेथेच थांबले
जगण्याचे फक्त पुढे भासआभास लांबले

मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाच्या त्रैवार्षिक आणि पंचवार्षिक वर्गणीत आम्ही १५ ऑगस्ट २०१८ पासून बदल करत आहोत,
याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

आमच्या छापील अंकाच्या वर्गणीतील बदल खालीलप्रमाणे

त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये
पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये

वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

अधिक माहितीसाठी संपर्क

wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

amazon

GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अँन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

eBooks

www.amazon.in

play.google.com

Online पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

साहित्य वार्ता

'रेड टेप' कादंबरीचे नाशिकमध्ये प्रकाशन

नाशिक - 'राजकारण व नोकरशाहीतील अभद्र युतीने भ्रष्टाचाराला बळकटी मिळत असून, या व्यवस्थेत तत्त्वनिष्ठेने काम करणारा प्रशासक वर्ग दुर्दैवाने दुर्मिळ होत चालला आहे. अशा साहसी, हिंमतवान आणि जिगरबाज अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देणारी आणि भारतीय प्रशासन व्यवस्थेवर अचूक भाष्य करणारी प्रभावी कादंबरी म्हणून अभिजित कुलकर्णी लिखित 'रेड टेप'कडे बघायला हवे,' असे गौरवोद्‌गार अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तथा सेवानिवृत्त सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी काढले.

गंगापूर रोडवरील कुसुमाग्रज स्मारकात मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'रेड टेप' कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले. या कादंबरीचे सूत्र आकर्षक आणि भारतीय माणसांना पटणारे असल्याचे सांगत देशमुख म्हणाले की, एका जिल्हाधिकाऱ्याचा संघर्ष 'दिव्य मराठी'चे उपसंपादक अभिजित कुलकर्णी यांनी चपखलपणे शब्दबद्ध केला आहे. ही कादंबरी संभाषणातून उलगडत जाते. अशा प्रकारचे लेखन किती अवघड असते, याची मला जाणीव आहे. यातील घटना पात्रांच्या परस्पर संबंधांतून आणि त्यांच्या संवादांतून उलगडत जातात. कादंबरीतील अधिकारी संघर्षाअंती यशस्वी होत असला तरी प्रत्यक्षात दहापैकी नऊ अधिकारी अशा संघर्षात अपयशीच होतात, हे कटू सत्य आहे. प्रकरणे शांत करण्यासाठी अधिकाऱ्यांच्या बदल्या करणे वा अन्यत्र पदोन्नतीच्या आडून पदावनतीला शोभेल असे काम देणे या बाबी सुन्न करणाऱ्या असतात. यातून राजकीय ऱ्हासाचे दर्शन प्रकर्षाने होते. व्यवस्थेचा बारकाईने अभ्यास आणि निरीक्षण करून ही कादंबरी लिहिली आहे. अरुण साधू आणि मधू मंगेश कर्णिक यांच्या पावलावर पाऊल ठेवून लेखकाने प्रशासकीय व्यवस्थेवर भाष्य करणारे साहित्यलेखन यापुढेही करत रहावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

'दिव्य मराठी'चे राज्य संपादक प्रशांत दीक्षित म्हणाले, 'रेड टेप कादंबरीतील घटना प्रशासकीय अधिकारी, मंत्री, त्यांचे समर्थक, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांच्या परस्पर संबंधांतून उलगडत जातात. त्यातून

प्रशासनाच्या चौकटीचे, भ्रष्टाचाराचे, प्रशासन व सरकार यांच्या परस्पर संबंधाचे चित्र उलगडत जाते.' मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता म्हणाले की, समकालीन वास्तवाचे वेगवेगळे पैलू तितक्याच परखडपणे मांडण्यात आल्याने 'रेड टेप' या कादंबरीतून सद्य: स्थितीविषयीचे चित्र समोर उभे होण्यास मदत होते. या पुस्तकाचा चाहता म्हणून मी खास करून या प्रकाशन समारंभाला आलो आहे. अभिजित कुलकर्णी यांनी सांगितले की, बातमी वा भाष्यलेखन आणि साहित्यनिर्मिती यात किती मोठा फरक असतो, हे मला कादंबरी लिहिताना लक्षात आले. पत्रकार म्हणून काम केल्यानंतर शासनाच्या माहिती विभागात सहाय्यक संचालक म्हणून काम करताना सरकारी व्यवस्थेची आतली बाजू बघायला मिळाली. शासकीय अधिकारी, कर्मचारी, राजकारणी आणि अभ्यागत यांचे निरीक्षण करण्याचा पुरेसा अवधी याच काळात मिळाला.

गांधी-नेहरूंनंतर सडलेपण वाढले : राजीव खांडेकर

नोकरशाही, राजकारण, बिल्डर यांच्या अभद्र युतीमध्ये पत्रकारांचाही सहभाग वाढत चाललाय, असे सांगत 'एबीपी माझा'चे संपादक राजीव खांडेकर म्हणाले की, गांधी-नेहरूंचा काळ संपल्यानंतर व्यवस्थेतील सडलेपण वाढत गेले. प्रशासकीय व्यवस्थेतील अधिकारी असो की राजकारणी, यांना भ्रष्टाचाराविषयी संकोच, लाज वाटत नाही. एखादा अधिकारी चांगले काम करत असेल तर ते इतरांना अडचणीचे ठरू लागते. त्यामुळे चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना सुरक्षितता व उत्तेजन देण्यासाठी माध्यमांनी त्यांच्या पाठीमागे उभे राहायला हवे. चांगले काम करणारे नेहमी एकटे पडतात. त्यामुळे त्यांचे मनोधैर्य खचते. पत्रकाराच्या बातमी व लेख या ठराविक लेखन चौकटीपलीकडे जाऊन ही कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी राजकीय, साहित्य, सांस्कृतिक, वैद्यकीय, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. 'दिव्य मराठी'चे निवासी संपादक जयप्रकाश पवार यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी टिझर निर्मिती करणारे सचिन शिंदे, प्रशांत साठे व लक्ष्मण कोकणे यांचा सत्कार करण्यात आला. पीयूष नाशिककर यांनी सूत्रसंचालन केले. दीप्ती राऊत यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

मॅग्नोलिया'चे प्रकाशन

पुणे : 'मॅग्नोलिया' या अनिता कुलकर्णी लिखित आत्मकथनाचे नुकतेच प्रकाशन करण्यात आले. शर्वरी जमेनीस यांच्या हस्ते हे प्रकाशन झाले. 'मॅग्नोलिया' या आत्मकथनात अनिता कुलकर्णी यांनी आर्किटेक्चर म्हणून झालेली त्यांची जडणघडण, आर्किटेक्ट म्हणून काम करताना आलेले अनुभव तर सांगितले आहेतच; पण कला, प्रवास इ. अन्य अनुभवही कथन केले आहेत. या प्रकाशनानंतर शर्वरी जमेनीस आणि नकुल घाणेकर यांचा 'Meet Me on the Meadow' हा नृत्याचा कार्यक्रम झाला. तसेच अनिता कुलकर्णी यांनी 'मॅग्नोलिया'तील निवडक भागाचे अभिवाचन केले.

साहित्य संमेलन यवतमाळला

९२ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यवतमाळला होणार आहे यावर अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने अखेर शिक्कामोतर्ब केले. स्थळासंदर्भातील अधिकृत घोषणा महामंडळाकडून नुकतीच करण्यात आली. विदर्भ साहित्य संघाची यवतमाळ शाखा आणि डॉ. वि.भि.कोलते संशोधन केंद्र व वाचनालय यांच्या वतीने हे संमेलन आयोजित केले जाणार आहे.

यंदाचे साहित्य संमेलन हे विदर्भातच होणार हे जवळपास निश्चित झाले होते, केवळ स्थळावर निर्णय झालेला नव्हता. ९२व्या साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी विदर्भ साहित्य संघाची यवतमाळ शाखा आणि डॉ. वि.भि.कोलते संशोधन केंद्र व वाचनालय या निमंत्रक संस्थांनी प्रस्ताव दिला होता. महामंडळाच्या संमेलन स्थळ निवड समितीने यवतमाळला भेट देऊन स्थळ व सर्व संबंधित आणि आनुषंगिक बाबींची पाहणी केली. त्यानंतर संमेलन स्थळ निवड समितीच्या बैठकीत या समितीने सर्वानुमते यवतमाळच्या संमेलन स्थळाची शिफारस महामंडळाला केली होती. महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, उपाध्यक्ष डॉ. विद्या देवधर, कार्यवाह डॉ. इंद्रजित ओरके, कोषाध्यक्ष डॉ. विलास चिंतामण देशपांडे या पदाधिकाऱ्यांसह मराठवाडा साहित्य परिषदेचे प्रतिनिधी डॉ. दादा गोरे, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे विनोद कुळकर्णी आणि मुंबई मराठी साहित्य संघाच्या प्रतिनिधी डॉ. अनुपमा उजगरे यांचा या समितीत समावेश आहे. महामंडळाच्या सर्व

हेरगिरीचा पोरखेळ

लेखक
जॉर्जिना हार्डिंग

अनुवाद
उज्ज्वला गोखले

किंमत : २२०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

एका गारठलेल्या सकाळी आठ वर्षांच्या ॲनाची आई घराबाहेर पडते आणि गर्द धुक्यात हरवून जाते.... या घटनेकडे फिरून पाहताना ॲनाला वाटते की, आपण त्या दिवशी घडलेल्या सगळ्या गोष्टी नीट तपशीलवार लक्षात ठेवायला हव्या होत्या. ॲनाच्या मनात आईच्या आठवणी रेंगाळू लागतात.... ॲनाचा मोठा भाऊ पीटर हेरगिरी, शीतयुद्ध काळातल्या घटना, त्यामुळे उडणारा अफवांचा धुरळा व रहस्यमयता यांकडे आकर्षित होतो. तो ॲनाला म्हणतो की, त्यांना आईचा मृत्यू झालाय असं सांगितलं गेलंय; पण ते खरं असेल कशावरून? ते तर अंत्ययात्रेलाही गेलेले नाहीत. आणि मग तो आईबद्दल एक गोष्ट रचू लागतो – पूर्व जर्मनीतली निर्वासित असलेली त्यांची आई मरण पावली नसून कदाचित ती रहस्यमयरीत्या हेरगिरी करत असावी.... ॲना तिच्या कल्पनेमध्ये आईच्या आठवणींचे तुकडे जोडत तिची प्रतिमा तयार करू लागते.... तिच्या आईचं आयुष्य गूढ आणि रहस्य यांनी भरलेलं होतं का? तिची आई कोण होती? भूतकाळ, आठवणी, कल्पना आणि वास्तव यांचा कौशल्याने विणलेला रहस्यमय गोफ!

सदस्यांच्या सहमतीनंतर महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी यांनी महामंडळाचा निर्णय जाहीर केला. साहित्य संमेलनातील ग्रंथप्रदर्शन तसेच संमेलनाचा सविस्तर कार्यक्रम ठरविण्यासाठी महामंडळाच्या ग्रंथ प्रदर्शन समितीची २६ ऑक्टोबरला, संमेलन मार्गदर्शन समितीची २७ ऑक्टोबर आणि महामंडळाची सभा २८ ऑक्टोबरला यवतमाळ येथे आयोजित केल्याचे महामंडळाने सांगितले. ४५ वर्षांपूर्वी ग.दि.माडगूळकर यांच्या अध्यक्षतेखाली यवतमाळ येथे साहित्य संमेलन झाले होते.

काव्यसरींमध्ये रसिक चिंब

'पाऊस' हा सगळ्यांचाच आवडता विषय.... प्रत्येकाच्या मनातला पाऊस वेगळा तसा येणारा पावसाचा अनुभवही वेगळा. वर्षासरी कोसळण्यास सुरुवात झाली, की प्रत्येकाच्या मनात दडलेले शब्द कागदावर उमटू लागतात आणि काव्याचा बहर येतो. अशाच कवींच्या मनामनांतील काव्यसरींत रसिक चिंब भिजले. बालकवी, बहिणाबाई चौधरी आणि आचार्य अत्रे यांच्या जयंतीनिमित्त रंगत-संगत प्रतिष्ठानच्या काव्य विभागातर्फे 'कविता मनामनांतली' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रसिद्ध अभिनेत्री आणि कवयित्री भाग्यश्री देसाई, निवेदिका मोनिका जोशी, गायिका धनश्री गणात्रा आणि ॲड. प्रमोद आडकर यांनी विविधांगी कविता सादर करून रसिकांना ही अनोखी काव्यसफर घडवली.

चिंब पावसातील निसर्गाचे वर्णन करणारी, मनाच्या कोपऱ्यातील दुखऱ्या आठवणींना स्पर्श करणारी, नात्यांची वीण घट्ट करणारी अशी कवितेची अनेक रूपे रसिकांना भुरळ घालून गेली. यावेळी 'आला पाऊस', 'तू तर चाफेकळी', 'भरजरी गं पितांबर', 'श्रावणमासी हर्ष मानसी', 'गुढी उभारुनी' अशा काही परिचित आणि काही क्वचितच ऐकायला मिळणाऱ्या कविता सादर करण्यात आल्या. 'अरे संसार संसार', 'बालकवींची फुलराणी', 'माझे गाणे', 'आचार्य अत्रे यांची 'ती पाहताच बाला', 'उगवला चंद्र पुनवेचा' या कविता रसिकांची विशेष दाद घेऊन गेल्या.

नेहरू उद्यानातील कट्ट्यावर समग्र अत्रे

कमला नेहरू उद्यानातील साहित्य कट्ट्यावर आचार्य अत्रे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या साहित्याचा जागर करण्यात आला. महापालिकेच्या

मराठी भाषा संवर्धन समितीच्या वतीने हा साहित्य कट्टा आयोजिण्यात येत असतो.

कल्पना कुलकर्णी यांनी 'आजीचे घड्याळ कसले आहे चमत्कारिक' या काव्यातील कल्पनाविलास विशद केला. तसेच 'पैशापेक्षा प्रेम श्रेष्ठ' हा संदेश देणारी 'दिनूचे बिल' ही कथा सांगितली. 'श्यामची आई' या आचार्य अत्रे यांच्या चित्रपटातील 'भरजरी गं पितांबर दिला फाडून' हे गीत गीता भुर्के यांनी सादर केले. लग्नाची बेडी नाटकातील गोकर्ण-गार्गी यांचे खटकेबाज संवादही त्यांनी सादर केले. मेधा वर्तक यांनी, अत्रे यांनी सासवडला शाळेत असताना शाळेला प्लेगची सुट्टी कशी मिळवून दिली ते खुमासदार पद्धतीने सांगितले. जयश्री वैद्य यांनी अत्रे यांच्या व्याख्यानातील विनोद सांगितलते. डॉ. वासुदेव सिधये यांनी अत्र्यांनी त्यांच्या 'सांज मराठा'त पशुवैद्यकांच्या मोर्चाची बातमी छापायला कशी मदत केली त्याचा स्वानुभव सांगितला.

श्याम भुर्के म्हणाले, की अत्र्यांच्या विनोदाने मराठी माणसाला मोकळेपणाने हसायला शिकवले. सामान्य माणसांबद्दल कळवळा त्यांनी फक्त बोलून दाखवला नाही तर खंडाळ्याचा भाजीपाला, क्रिकेटप्रेमी बाबू टांगेवाला, यंत्रमहर्षी म्हादबा मिस्त्री या माणसांवर लिहून तो कृतीत आणला. नगरसेविका माधुरी सहस्त्रबुद्धे यांनी सर्वांचे स्वागत केले. सुजाता शेंडे, विजया मोतीवाले, अनिल केळकर, प्रवीण भिसे आदी या वेळी उपस्थित होते. माधवी केसकर यांनी आभार मानले.

भादली रेल्वे स्थानकावर बालकवींचे नवे स्मारक

मराठी साहित्याला निसर्ग कवितांचे अनमोल लेणं बहाल करणाऱ्या बालकवी ऊर्फ त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांच्या नवीन स्मारकाची भादली रेल्वेस्थानकावर उभारणी करण्यात आली आहे. जुन्या स्मारकावर 'निर्झरास' तर नवीन स्मारकावर 'औदुंबर' ही कविता कोरलेली आहे.

बालकवींचा जन्म १३ ऑगस्ट १८९० रोजी झाला. वयाच्या १२व्या वर्षी त्यांनी वनमुकुंद कविता लिहून काव्यसाधना सुरू केली. १९०७ ला जळगावच्या पहिल्या कविसंमेलनात डॉ. कान्होबा रणछोडदास कीर्तीकार यांनी त्यांना 'बालकवी' ही उपाधी दिली. बालकवींनी २८ वर्षांच्या जीवनात शेकडो कविता लिहिल्या. बालकवींचे वडील फौजदार होते. आजोळी राहिलेल्या बालकवींना

कवितेची गोडी आई गोदूबाई यांच्यामुळे लागली.

५ मे १९१८ रोजी नशिराबाद जवळील भादली स्टेशन येथे बालकवींचा अपघाती मृत्यू झाला. त्यांच्या काव्यप्रतिभेचा ठेवा जपण्यासाठी येथे स्मारक असावे, असा विचार जिल्ह्यातील साहित्यिक व ग्रामस्थांनी मांडला. रेल्वे प्रशासनाने त्यास परवानगी देऊन तिकीट कार्यालयाजवळ चबुतरा उभारला. त्यावर 'निर्झरास' ही बालकवींची कविता कोरण्यात आली. चबुतऱ्यावर पुस्तक, दौत, टाक असे स्मारकाचे स्वरूप आहे. रेल्वेमार्गाच्या विस्तारीकरणात स्मारक स्थलांतरित होत असल्याने रेल्वे प्रशासनाने नवीन स्मारकाची उभारणी केली. तेथे बालकवींचा पुतळा उभारण्यात येणार आहे. त्यामुळे जुने स्मारक आता इतिहासजमा होईल.

पुरस्कार

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथसूचीला आणि 'जाणता राजा श्री शिवछत्रपती'ला पुरस्कार

फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स, न्यू दिल्ली यांच्यातर्फे मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथसूचीला उत्कृष्ट निर्मितीसाठीचा दुसरा आणि रा. वा. शेवडे गुरुजी लिखित 'जाणता राजा श्री शिवछत्रपती' या पुस्तकाला बालवाङ्मयासाठीचा उत्तेजनार्थ पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. दिल्लीच्या प्रगती मैदानावर हा पुरस्कार वितरण समारंभ पार पडला. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथसूचीला यापूर्वी फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स, न्यू दिल्लीतर्फे चार पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये २००९मध्ये मिळालेल्या उत्कृष्ट निर्मिती पुरस्काराचा समावेश आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'मी सायुरी', 'शांताराम' आदी पुस्तकांना फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्सतर्फे यापूर्वी पुरस्कार मिळाले आहेत.

'दमा' आचार्य अत्रे मानचिन्हाने सन्मानित

''मिडास राजा हात लावेल त्याचे जसे सोने व्हायचे, तसे आचार्य अत्रेंनी ज्या गोष्टीत हात घातला, त्याचे सोने झाले. ज्यांच्यावर मी मनापासून प्रेम केले त्या अत्रेंच्या नावाच्या पुरस्काराने माझे आयुष्य धन्य झाले,'' अशा शब्दांत ज्येष्ठ साहित्यिक द.मा. मिरासदार यांनी कृतार्थ भावना व्यक्त केली.

साहित्यसम्राट आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या जन्मदिनानिमित्त आत्रेय संस्थेतर्फे माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या हस्ते मिरासदार यांना 'आचार्य अत्रे

मानचिन्ह' प्रदान करण्यात आले. परचुरे प्रकाशनातर्फे आचार्य अत्रे संपादित 'नवयुग वाचनमाला'च्या नव्या आवृत्तीचे प्रकाशन या वेळी झाले. अत्रे यांच्या कन्या मीना देशपांडे, नातू ॲड. राजेंद्र पै, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे आणि प्रकाशक अप्पा परचुरे या प्रसंगी उपस्थित होते. उत्तरार्धात डॉ. गिरीश ओक यांची प्रमुख भूमिका असलेल्या 'तो मी नव्हेच' नाटकाचा प्रयोग झाला.

प्रतिभा पाटील म्हणाल्या, ''१९६२मध्ये मी विधानसभेत पहिल्यांदा निवडून गेले तेव्हा अत्रे यांची अनेक घणाघाती अशी प्रभावी भाषणे मी ऐकली आहेत. ते शिक्षक, राजकारणी, साहित्यिक, विनोदकार होते. त्यांचे लेखन वाचण्याची संधी मला त्या काळात मिळाली होती. साहित्यिक हे शब्दप्रभू असतात. उत्तम निर्मितीची प्रतिभा त्यांच्याकडे असते. आपल्या वाङ्मयनिर्मितीद्वारे ते समाजाला मार्गदर्शन करतात. साहित्यिक समाजाची अनमोल ठेव आहेत.''

उषा तांबे यांना डॉ. गं. ना. जोगळेकर पुरस्कार प्रदान

''आज साहित्य संस्थांच्या कार्यपद्धतीत कमालीचा फरक पडला आहे. पूर्वी साहित्यवाद असायचे. आता साहित्यापर्यंत आपण पोहोचत नाही. भाषा कशी टिकेल इथपासूनच सुरुवात होते. भाषेचे व्याकरण, शुद्धीकरण, प्रमाणभाषा, बोलीच का मानायची? अशा चर्चा ऐकायला मिळतात. घरातून बाहेर पडलो की समाजाची भाषा बोलू लागतो. मराठी भाषिकच मातृभाषेविषयी विशेष आग्रही नसतात,'' अशी खंत अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या माजी अध्यक्षा प्रा. उषा तांबे यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र साहित्य परिषद व जोगळेकर कुटुंबीयांच्यावतीने उषा तांबे यांना डॉ.गं.नां.जोगळेकर पुरस्कार देऊन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांच्या हस्ते गौरविण्यात आले. दहा हजार रुपये, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्षा सुनीताराजे पवार उपस्थित होते. पराग जोगळेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. गं.ना. जोगळेकर यांच्या नावाने मिळणारा हा अत्यंत मानाचा पुरस्कार आहे, अशी भावना व्यक्त करून उषा तांबे यांनी जोगळेकर यांच्या आठवणींना उजाळा दिला.

श्रद्धांजली

व्ही.एस. नायपॉल

लंडन : 'अ हाऊस ऑफ मि. विश्वास', 'अ बेंड इन द रिव्हर' अशा एकापेक्षा एक सरस कादंबऱ्या व 'इंडिया : अ मिलियन म्युटिनिज नाऊ' अशी आशयगर्भ पुस्तके लिहिणारे, तसेच साहित्यासाठीचे नोबेल पुरस्कारविजेते प्रख्यात भारतीय वंशाचे लेखक विद्याधर सूरजप्रसाद ऊर्फ व्ही.एस. नायपॉल यांचे नुकतेच निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते. पाश्चिमात्य देशांनी आपल्या वसाहतींमध्ये तेथील लोकांना जी क्रूर वागणूक दिली, त्याचबरोबर चालविलेला भ्रष्टाचार या विषयांचेही पडसाद त्यांच्या साहित्यकृतीत उमटले आहेत. नायपॉल यांनी स्वतःला कोणत्याही विचारसरणीच्या दावणीला बांधून घेतले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी, प्रख्यात लेखक सलमान रश्दी यांच्यासह अनेक नामवंतांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

साहित्यसेवेसाठी मिळालेले पुरस्कार

नायपॉल यांना लेखनासाठी १९७१मध्ये मॅन बुकर पुरस्कार मिळाला. १९९०मध्ये नाईटहूड बहुमान प्रदान करण्यात आल्यानंतर त्यांना 'सर' असे संबोधण्यात येऊ लागले. २००१मध्ये साहित्यासाठी नोबेल पुरस्कार देऊन नायपॉल यांचा सन्मान करण्यात आला होता.

अजित वाडेकर

परदेशात भारताला पहिली कसोटी मालिका जिंकून देणारे माजी कर्णधार अजित वाडेकर यांचे दीर्घ आजाराने नुकतेच वयाच्या ७७व्या वर्षी निधन झाले. भारत सरकारच्या वतीने वाडेकर यांना अर्जुन पुरस्कार (१९६७) आणि पद्मश्री पुरस्कार (१९७२) प्रदान करून गौरविले होते. त्यांच्या पश्चात पत्नी रेखा, मुले प्रसाद व विपुल आणि मुलगी कश्मिरा असा परिवार आहे. विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांना श्रद्धांजली वाहिली. वाडेकर यांच्या नेतृत्वात भारताने १९७१ साली ऐतिहासिक कामगिरी करत परदेशात पहिला मालिका विजय नोंदवताना वेस्ट इंडिज आणि इंग्लंड या संघांना त्यांच्याच भूमीत नमविले होते. मेहता पब्लिशिंग हाऊसने त्यांचे 'क्रिकेटच्या मैदानात मी' हे पुस्तक प्रकाशित केले होते.

◆

आठवी आवृत्ती

डायरी ऑफ ॲन फ्रँक

अनुवाद
मंगला निगुडकर

किंमत : २२०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

''द डायरी ऑफ ॲन फ्रँक'' हे जागतिक साहित्य-विश्वातील एक अमोल लेणे आहे. एका तेरा वर्षीय मुलीची ही अनुभव-गाथा वाचताना; डोळ्यांत टिपूसही येणार नाही, अशी व्यक्ती शोधून सापडणार नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ज्यू लोकांचा जो छळ झाला, त्यातील अघोरी अनुभव वाट्याला आलेली ही बालिका. आईवडील, बहिण आणि अन्य चार व्यक्ती नात्झी भस्मासुरापासून दूर पळत, एका इमारतीत लपून-छपून जीवन कंठू लागतात. पण दोन वर्षांतच त्यांना हुडकून काढण्यात येते आणि जर्मन छळछावणीत सर्वांची रवानगी होते. कसेबसे वडील मात्र वाचतात. ॲनच्या मृत्युनंतर तिची डायरी वडिलांच्या हाती आली आणि १९४७ साली ती जेव्हा प्रसिद्ध झाली; तेव्हा तिचे वाङ्मयीन आगळेपण वाचकांच्या तात्काळ ध्यानात आले. महायुद्धात मानवी जीवन किती कवडीमोल झाले होते, वांशिक वर्चस्वाच्या खोट्या कल्पनेपायी इतरांचा अमानुष छळ करण्यासाठी मनुष्य कसा प्रवृत्त होतो, याचे प्रत्ययकारी चित्रण तर या डायरीत आहेच; पण एका उमलत्या कळीच्या भावभावनांना तिने आपल्या लेखनात यथेच्छ, कोणताही आडपडदा न ठेवता, वाट मोकळी करून दिली आहे. ''मला मृत्युनंतरही जगायचे आहे, आणि म्हणून देवाने दिलेल्या या देणगीबद्दल मी अत्यंत ऋणी आहे'' असे तिने लिहिले. ही देवाची देणगी; म्हणजे तिच्यात वसणाऱ्या सर्व भावभावनांना शब्दांत पकडण्याचे सामर्थ्य.

उपक्रम

दिनविशेष

दिसामाजि काहीतरी ते लिहावे।
प्रसंगी अखंडीत वाचीत जावे।।

श्री समर्थ रामदास स्वामी

✳ वाचकांसाठी सुवर्णसंधी ✳

करा मैत्री पुस्तकांशी

'मेहता पब्लिशिंग हाऊस'चा

उपक्रम

१६ सप्टेंबर २०१८ ते १५ ऑक्टोबर २०१८

दरम्यानचा दिनविशेष

आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना शुभेच्छा
या ईमेलवर पाठवा.

authors@mehtapublishinghouse.com

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर
५० टक्क्यांपर्यंत सूट

१६ सप्टेंबर - कमलाबाई ओगले यांचा जन्मदिन

कमलाबाई ओगले लिखित 'रुचिरा भाग १ व भाग २'
या पुस्तकांवर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ४५०/-
१६ सप्टेंबर ते २० सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत २९९/-

२१ सप्टेंबर - जागतिक कर्करोग दिन

'Cancer Care & Mysteries & Yoga, 'Cancer Care & Mysteries & Yoga, इट्स नॉट अबाऊट द बाइक, कॅन्सर रोखू या, एक विश्रांती स्थळ'
या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ९२०/-
२१ सप्टेंबर ते २२ सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत ५९९/-

२१ सप्टेंबर- दीपा पोरे यांचा जन्मदिन

दीपा पोरे लिखित 'ज्ञानदा निबंधमाला'
या पुस्तकावर विशेष सवलत.
मूळ किंमत - ९०/-
२१ सप्टेंबर ते २२ सप्टेंबरपर्यंत.

सवलत किंमत ५९/-

२१ सप्टेंबर- ख्रिस गेल यांचा जन्मदिन

ख्रिस गेल लिखित 'सिक्स मशिन'
या पुस्तकावर विशेष सवलत.
मूळ किंमत - ३९५/-
२१ सप्टेंबर ते २२ सप्टेंबरपर्यंत.

सवलत किंमत २७७/-

२२ सप्टेंबर- डी. एस. इटोकर यांचा जन्मदिन

डी. एस. इटोकर लिखित ११ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

सवलत किंमत ६५५/-

संचाची मूळ किंमत - १०८५/-

२२ सप्टेंबर ते २३ सप्टेंबरपर्यंत.

२२ सप्टेंबर- रेई किमुरा यांचा जन्मदिन

रेई किमुरा लिखित 'जॅपनीज रोज', 'जॅपनीज ऑर्किड', 'Japanese Magnolia' 'मी एरिक', 'Awa Maru-Titanic of Japan', 'अ नोट फ्रॉम इचियो', 'वादळफूल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

सवलत किंमत ७७९/-

संचाची मूळ किंमत - १५२०/-

२२ सप्टेंबर ते २३ सप्टेंबरपर्यंत.

२७ सप्टेंबर - जागतिक पर्यटन दिन

'स्वान्सीतील दिवस, अमेरिकेतील पापनगरी' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

सवलत किंमत ३३९/-

संचाची मूळ किंमत - ६४५/-

२७ सप्टेंबर ते २८ सप्टेंबरपर्यंत.

२७ सप्टेंबर - रेश्मा कुलकर्णी-पाठारे यांचा जन्मदिन

रेश्मा कुलकर्णी-पाठारे अनुवादित 'मायकल जॅक्सन', 'बर्न्ट शॅडोज', 'पॉलिटिक्स ऑफ द बूम्ब', 'मी झारा गहरमानी एक देशद्रोही', 'एक अनादि अनंत प्रेमकहाणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

सवलत किंमत ११६९/-

संचाची मूळ किंमत - २२२०/-

२७ सप्टेंबर ते २८ सप्टेंबरपर्यंत

२९ सप्टेंबर - निर्मला मोने यांचा जन्मदिन

निर्मला मोने लिखित **५** बालसाहित्यपर पुस्तके व **२** अनुवादित पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ११५०/-

२८ सप्टेंबर ते १ ऑक्टोबरपर्यंत

सवलत किंमत ६६९/-

२९ सप्टेंबर - जागतिक हृदय दिन

'हृदयविकार निवारण, हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र, चला जाणून घेऊ या! – हार्ट अटॅक, शाकाहार, ध्यानसाधना, आहार आणि आरोग्य ' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत – ६४०/-

२९ सप्टेंबर ते १ ऑक्टोबरपर्यंत

सवलत किंमत ३६०/-

१ ऑक्टोबर - उमा कुलकर्णी यांचा जन्मदिन

उमा कुलकर्णी अनुवादित -'डोंगराएवढा' 'पर्व, आवरण, चिदंबर रहस्य, डॉलर बहू, जिगर, काठ, कर्वालो, महाश्वेता, मंद्र, परीघ, परिशोध, पारखा, सामान्यांतले असामान्य, तडा, तंतू, वंशवृक्ष, अवस्था, सार्थ', लिखित - केतकर वहिनी, 'संवादु अनुवादु', या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत – ५७०५/-

१ ऑक्टोबर ते ३ ऑक्टोबरपर्यंत.

सवलत किंमत ३३३३/-

१ ऑक्टोबर - अपर्णा वेलणकर यांचा जन्मदिन

अपर्णा वेलणकर अनुवादित - 'शांताराम', 'लेडिज कूपे', 'परवाना', 'शौझिया','द ब्रेडविनर','स्पीड पोस्ट' , लिखित - 'फॉर हिअर, ऑर टू गो', या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत – १८७४/-

१ ऑक्टोबर ते ३ ऑक्टोबरपर्यंत.

सवलत किंमत ११३९/-

१ ऑक्टोबर - जागतिक वृद्ध दिन

'चिकन सूप फॉर द ग्रँडपेरेंट्स सोल : भाग १ व भाग २, सुखद वृद्धत्व', 'बिइंग मॉर्टल', 'फिट फॉर ५०+ फॉर विमेन', 'फिट फॉर ५०+ फॉर मेन', 'उत्तरार्ध' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

सवलत किंमत ८१०/-

संचाची मूळ किंमत – १३००/-

१ ऑक्टोबर ते ४ ऑक्टोबरपर्यंत.

२ ऑक्टोबर - महात्मा गांधी यांची जयंती

'दुसरे प्रॉमिथिअस : महात्मा गांधी, लेट्स किल गांधी, मोहनदास, महात्मा गांधी आणि तीन माकडे, फ्रीडम ॲट मिडनाइट' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

सवलत किंमत ११९९/-

संचाची मूळ किंमत – २३००/-

२ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबरपर्यंत.

२ ऑक्टोबर - राजा रवि वर्मा यांचा स्मृतिदिन

'राजा रविवर्मा' या पुस्तकावर विशेष सवलत.

सवलत किंमत २२९/-

पुस्तकाची मूळ किंमत - ३४०/-

२ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबरपर्यंत.

४ ऑक्टोबर - जागतिक प्राणी दिन

'Eat Spray Love, निर्व्याज प्रेम, एका प्राणिसंग्रहालयाची गोष्ट, सफारी आफ्रिकेतील, मी एरिक, बोनोबो : एक शांतिदूत', 'वाघाच्या मागावर', 'सर्जा', 'सिंहांच्या देशात', 'नागझिरा' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

सवलत किंमत १२८९/-

संचाची मूळ किंमत - १९३५/-

४ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबरपर्यंत.

५ ऑक्टोबर - जागतिक शिक्षक दिन

'टू सर विथ लव्ह, चिकन सूप फॉर द सोल इंडियन टीचर्स', 'स्टोन्स इन्टू स्कूल्स','थ्री कप्स ऑफ टी' या पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ११४०/-

५ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबरपर्यंत.

सवलत किंमत ६४९/-

८ ऑक्टोबर - भारतीय हवाई दल दिन

'परमवीरचक्र', 'सैनिक हो तुमच्यासाठी', 'पहिली फेरी', 'वादळ माथा ते १९६५ भारत-पाक युद्ध' या पुस्तकांवर विशेष सवलत.

मूळ किंमत - ११००/-

८ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबरपर्यंत.

सवलत किंमत ५५०/-

८ ऑक्टोबर - जागतिक टपाल दिन

'जे. आर.डी. टाटा यांची पत्रे', 'तुरुंगातील पत्रे', 'प्लेझर बॉक्स भाग-१ व २', 'राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे', 'स्पीड पोस्ट' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - १४७५/-

९ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबरपर्यंत.

सवलत किंमत ९००/-

१२ ऑक्टोबर - शान्ता शेळके यांचा जन्मदिन

लिखित - 'रेशीमरेघा, सांगावेसे वाटले म्हणून..., संस्मरणे, सुवर्णमुद्रा, त्रिवेणी, वर्षा, अनोळख, अनुबंध, गोंदण, कविता स्मरणातल्या,किनारे मनाचे, रंगरेषा,पावसाआधीचा पाऊस, पूर्वसंध्या' अनुवादित -'आंधळी, आंधळ्याचे डोळे, चौघीजणी, मेघदूत,गवती समुद्र' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - २५९५/-

१२ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबरपर्यंत.

सवलत किंमत १५५९/-

१२ ऑक्टोबर - वैजयंती पेंडसे यांचा जन्मदिन

'सॉल्ट अँड हनी', 'अँड द माउंटन्स एकोड' या अनुवादित पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ६४०/-

१२ ऑक्टोबर ते १३ ऑक्टोबरपर्यंत.

सवलत किंमत ३९९/-

१३ ऑक्टोबर - प्रोतिमा बेदी यांचा जन्मदिन

'टाइमपास' या अनुवादित पुस्तकावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ३४०/-

१३ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबरपर्यंत.

सवलत किंमत २१५/-

१४ ऑक्टोबर - अरुण मांडे यांचा जन्मदिन

'विज्ञान गमती', 'विज्ञान जमती' या पुस्तकावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - १७०/-

१४ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबरपर्यंत.

सवलत किंमत ११५/-

१५ ऑक्टोबर - ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती

'अदम्य जिद्द, माझी जीवनयात्रा, टर्निंग पॉइंट्स, योद्धा शास्त्रज्ञ–राष्ट्रपती ए.पी.जे अब्दुल कलाम' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत -६२०/-

१५ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबरपर्यंत.

सवलत किंमत ३९९/-

१५ ऑक्टोबर - मारिओ पुझो यांचा जन्मदिन

'ओमेर्ता' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - २५०/-

१५ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबरपर्यंत.

सवलत किंमत १२५/-

सातवी आवृत्ती

स्टीव्ह जॉब्ज :
एक झपाटलेला तंत्रज्ञ!

अच्युत गोडबोले
अतुल कहाते



किंमत :१५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

तंत्रज्ञानाच्या जगामधला सगळ्यात प्रसिद्ध जादूगार - हे जग सोडून गेला...

पण त्यानं आपल्या अद्‌भुत कल्पनाशक्तीच्या जोरावर तयार केलेले कम्प्युटर्स, मोबाईल फोन्स, म्युझिक प्लेअर्स, टॅब्लेट पीसीज हे सर्व या जगाला त्याची आठवण देत राहतील. जगभरातल्या लोकांच्या कल्पनाशक्तीपलीकडची उत्पादनं जॉब्जनं प्रत्यक्षात आणून दाखवली.

आपलं आयुष्यच तो एका वेगळ्या विश्वात जगला. राजाचा रंक आणि परत रंकाचा राजा असं सनसनाटी आयुष्य जॉब्जच्या वाट्याला आलं. सगळ्यांहून वेगळं आणि अगदी सर्वोत्तम असंच कायम करून दाखवण्यासाठी तो आयुष्यभर धडपडला. कर्करोगानं जॉब्जचं शरीर पोखरून टाकलं, तरी त्याही स्थितीत त्यानं शेवटपर्यंत आपल्या कल्पनांच्या भराऱ्या मारायचं काम थांबवलं नाही.

अशा या हट्टी, जिद्दी, कलाकार तंत्रज्ञाला सलाम करणारी ही रंजक सफर!

पुस्तक परिचय

ख्रिस गेल
सिक्स मशीन

I don't Like Cricket... I Love It

ख्रिस गेलचा जन्म व संगोपन किंगस्टन, जमैका येथे झाले. जमैकन लोकांचे जीवन व्यापून टाकणाऱ्या क्रिकेटच्या खेळातच त्याने स्वतःला झोकून दिले. वयाच्या चौदाव्या वर्षापासूनच त्याने मोठ्या वयोगटातील संघांविरुद्ध शतके झळकवायला सुरुवात केली व शाळेत असतानाच त्याची वेस्ट इंडिज 'अ' संघात निवड झाली. तडाखेबाज सलामीवीर, चतुर फिरकी गोलंदाज, धूर्तपणे रणनीती आखणारा अशी गेलची ओळख आहे. २००७ ते २०१० या कालावधीत वेस्ट इंडिज संघाच्या कर्णधारपदाची धुरा वाहणाऱ्या गेलने आपल्या कसोटी कारकिर्दीत दोन त्रिशतके काढत, कसोटी क्रिकेटच्या इतिहासात असा विक्रम करणाऱ्या केवळ चार खेळाडूंमध्ये मानाचे स्थान पटकावले आहे. टी२०च्या थरारक क्रिकेटचा तो महान प्रणेता आहे. 'वर्ल्ड बॉस' या टोपणनावाने तो ओळखला जातो.

टॉम फोर्डायिस हा बीबीसीचा मुख्य क्रीडालेखक आहे. गेराइंट थॉमसच्या 'द वर्ल्ड ऑफ सायकलिंग ॲकॉर्डिंग टु जी' या पुस्तकाचाही तो सहलेखक आहे. त्याने आपले बहुतेक लेखन सहायक लेखक म्हणून केले आहे.

लेखक
ख्रिस गेल
टॉम फोर्डायिस सोबत

अनुवाद
दीपक कुळकर्णी

मी मारलेल्या षट्कारांमुळे अनेक चेंडू स्टेडियमच्या स्टँडमध्ये जाऊन पडले आहेत. काही चेंडू स्टँड्सच्याही पलीकडे गेले आहेत... मी मारलेल्या चेंडूंमुळे ज्या गाड्यांना पोचे पडले, त्या सर्व गाडीमालकांची मी जाहीर माफी मागतो. गाडीच्या विंडस्क्रीनचा जर चक्काचूर झाला असेल, तर मला क्षमा करा. पुढच्या वेळी जेव्हा सिक्स मशिन तुमच्या शहरात सामना खेळायला येईल, तेव्हा कृपया गाडी थोड्या दूर अंतरावर उभी करा. त्यामुळे स्टेडियममध्ये पोहोचण्यासाठी तुम्हाला जास्त चालावं लागेल; पण तुमचे चालण्याचे श्रम नक्कीच सार्थकी लागतील.

आज मी जिथे आहे, तिथे पोहोचण्यासाठी मी माझ्या परीनं सर्व काही केलंय. प्रत्येक स्तरावरच्या सामन्यात भरपूर धावा काढल्या, छोट्या गटातून खेळायला सुरुवात केली आणि थेट वरिष्ठ गटात जाऊन पोहोचलो. खेळलेल्या प्रत्येक स्पर्धेत माझी कामगिरी कोणाच्याही नजरेत भरण्यासारखी होती. गोलंदाजांवर मी कायम वर्चस्व राखलं. अगदी लहान असल्यापासून मी शतकं झळकावत आलोय. *ती तर माझ्या अंगवळणी पडलेली गोष्ट होती.*

माझ्यामध्ये काही खास क्षमता आहेत याची मला निश्चितच जाणीव होती. प्रत्येक मैदानावर मी यशस्वी ठरलो; पण या यशामागे माझी अपार मेहनत आहे. 'मला ख्रिस गेल आवडतो. मी त्याला संधी देईन. त्याच्या क्षमतेवर माझा विश्वास आहे,' असं म्हणणारा एकही पाठीराखा मला कधी लाभला नाही. मैदानात उतरून सातत्यानं माझी गुणवत्ता सिद्ध करण्याखेरीज माझ्यासमोर दुसरा पर्याय नव्हता. याला कारण होती, माझी पार्श्वभूमी. कदाचित बऱ्याच लोकांना ही गोष्ट माहीतही नसेल, पण हेच कटू सत्य होतं.

जर तुम्ही एखाद्या चांगल्या कुटुंबात वाढला असाल, तुम्ही सफाईदारपणे बोलू शकत असाल, एखाद्या नामांकित शाळेत तुम्ही शिकला असाल, तर तुम्हाला सहज संधी मिळू शकते. आणि जर तुमच्या कातडीचा रंग छान गोरा असेल, तर संधी अगदी तुमच्या दारातच उभी असते.

मला अशी विशेष मदत किंवा भक्कम पाठिंबा दिल्याचा दावा कोणीही करू शकणार नाही. तरीही मी दर्जेदार कामगिरी करून दाखवली.

लोकांच्या मते माझ्यापाशी क्रिकेट खेळण्याचं पारंपरिक तंत्र नाही, खेळाडूला आवश्यक असणारी एकाग्रता नाही, यशस्वी होण्यासाठी लागणारी ईर्षा आणि इच्छाशक्तीचा माझ्यामध्ये अभाव आहे; क्रिकेटकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन सदोष आहे... लहानपणापासून माझ्यावर असे अनेक आरोप झाले; पण अजूनही मी क्रिकेटच्या मैदानावर पाय रोवून उभा आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये मी सर्वोत्तम फलंदाज ठरलोय. लहानपणी माझ्यावर टीका करणाऱ्यांना आता काय वाटत असेल, याचं मला कुतूहल आहे. मजा म्हणजे, ज्यांनी माझ्यावर अविश्वास दाखवला होता, जे माझ्या मार्गात अडसर ठरले होते, आज तेच लोक माझ्यावर स्तुतिसुमनं उधळतात, माझ्याशी जवळीक साधू पाहतात.

कठीण परिस्थितीवर सातत्यानं मात करण्याच्या अनुभवातून माणूस

कणखर बनतो. रोजच्या अथक परिश्रमांतून तो निश्चयी बनतो, आणि हासुद्धा एक खेळच आहे असं समजून त्या खेळाची मजा लुटण्याच्या वृत्तीतूनच तुम्हाला यशस्वी होण्याची प्रेरणा मिळते. अंगात कणखर वृत्ती असल्यावाचून तुम्ही रोलिंग्टन टाउनमध्ये तग धरू शकणार नाही. तुमच्या मनात खेळाबद्दल पूर्ण बांधिलकी असेल तरच ल्युकासच्या मैदानात तुमची कारकीर्द बहरू शकते आणि या क्षेत्रात दीर्घ काळ टिकून राहायचं असेल, तर क्रिकेटवर तुमचं मनापासून प्रेम असायला हवं.

ल्युकासच्या मैदानावर आम्ही लहान मुलं खेळत असताना मोठी मुलं येऊन आम्हाला हुसकावून लावत आणि स्वतः खेळू लागत. पण ती नसताना मात्र मैदानावर आमचंच राज्य असे. काँक्रीटच्या खेळपट्टीवर चेंडू चेहऱ्यापर्यंत उसळत असताना न डगमगता कसं खेळायचं, हे मी ल्युकासच्या मैदानावर शिकलो. गोलंदाजी करतानाही तुमच्याकडे आत्मविश्वास आणि कौशल्याची गरज असते.

आपली गोलंदाजी चोपून काढलेली कोणाही गोलंदाजाला आवडत नाही. मोठ्या मुलांना गोलंदाजी करताना मला अधिकच चेव येई. माझ्या प्रत्येक चेंडूवर ते चौकार-षट्कार मारायला सरसावत आणि मी त्यांना जागच्या जागी जखडून ठेवत त्यांच्यावर वरचश्मा गाजवण्याचा प्रयत्न करत असे. मलाही तुमच्याइतकाच खेळण्याचा हक्क आहे, हे त्यांना दाखवून देण्याचा माझा हेतू असायचा.

आमच्यापाशी क्रिकेटची तुटपुंजी सामग्री असायची. हातमोजे नसले तरी मोज्यांशिवाय आम्ही खेळायचो. प्रसंगी फक्त पुढच्या पायालाच पॅड बांधून मी खेळलोय. पॅड्स नसले की तुम्ही स्वतःच्या नजरेवर जास्त विश्वास ठेवू लागता. वर सूर्य तळपत असायचा आणि अंगातून घामाच्या धारा वाहत असायच्या. पण अशा वेळीच आम्ही खेळण्याचा सर्वांत जास्त आनंद लुटलाय.

तुम्हाला प्रश्न पडला असेल की प्रत्येक खेळ आम्ही इतक्या हिरिरीने कसा खेळतो? पण ती गोष्ट आमच्या अंगवळणीच पडली आहे. सेंट जेम्स आणि पोर्टलंड या दोन गल्ल्यांमधल्या साध्या सामन्यांतही जीवघेणी चुरस असायची. एकमेकांवर आरोप, आळ घेत हाणामारीपर्यंत मजल जायची.

अनेकदा आम्ही रस्त्यावर फुटबॉल खेळत असायचो. गमतीने आम्ही त्याला लुटुपुटुचा सामना म्हणायचो. प्रत्येक संघात तीन किंवा चार खेळाडू.

पण प्रत्येक जण त्वेषाने खेळायचा. कधीकधी खेळाला ओंगळवाणं वळण लागायचं आणि खेळाऐवजी मारामारी सुरू व्हायची. असं असलं तरी आम्हाला प्रत्येक खेळ कौशल्य पणाला लावून, पण आपली ऐट राखून खेळायला आवडतो. 'शिफ्ट' नावाचा एक खेळ आमच्या खूप आवडीचा होता. पायाने बॉल ढकलत एक खेळाडू आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या अंगावर धावत जायचा आणि अशा काही विक्षिप्त हालचाली करून त्याला हुलकावणी द्यायचा, की तो बिचारा पार गोंधळून जायचा. मग आम्हीही त्याची चेष्टा करत खो-खो हसत सुटायचो.

अशा लहानलहान गोष्टी, पण त्यातून खूप मजा यायची. क्रिकेट खेळण्याचे काही अभिनव प्रकार आम्ही शोधले होते. पहिला प्रकार : फलंदाजाने फक्त जमिनीलगत फटके मारायचे. या खेळात दोन पासून २० पर्यंत खेळाडू असायचे. खेळण्यासाठी रस्ता किंवा धुळीचा खडबडीत पृष्ठभागही पुरेसा असायचा. खेळपट्टी चांगली असो वा नसो, त्यामुळे काहीच फरक पडत नसे. फक्त एकच नियम : चेंडू हवेत मारला की फलंदाज बाद. तंत्रशुद्ध फलंदाजीच्या सरावासाठी ते उत्तम प्रशिक्षण होतं. आपोआपच मिळालेली ती एक छान शिकवण होती.

दुसरा अभिनव प्रकार : चुकीचा फटका, म्हणजे एखादा शॉट मारतानाचा तुमचा उद्देश आणि प्रत्यक्ष मारलेला शॉट यात विसंगती असेल तर तुम्ही बाद. समजा, तुम्ही कव्हरच्या दिशेनं चेंडू ड्राइव्ह करायला गेलात आणि तो जर मिड-ऑनला गेला किंवा चेंडू स्क्वेअर लेगला मारायचा तुमचा विचार असेल, पण तुम्ही तो जास्तच मागच्या बाजूला मारलात. असा चुकीचा फटका मारलात की कोणताही क्षेत्ररक्षक तुमच्या विरुद्ध अपील करू शकायचा.

अशा वेळेस बहुसंख्य जणांच्या मते तो फटका चुकीचा होता असा निर्णय झाला तर तुम्हाला बाद ठरवलं जायचं. मग ज्यानं त्या खेळाडूला बाद केलं असेल तो हातात बॅट घेऊन फलंदाजी करू लागायचा. अपील केलेल्या क्षेत्ररक्षकाच्या हाती गोलंदाजी करण्यासाठी बॉल दिला जायचा. प्रत्येकालाच बॅटिंग हवी असायची, म्हणून बोलिंग करायला सर्वच उत्सुक असत. हवेत उडालेला झेल पकडण्यासाठी जो तो पुढे सरसावायचा. फलंदाजानं मारलेला फटका चुकीचा नसला तरी बरेच जण अपील करायचे. या सर्व गदारोळात आणि चढाओढीत आमचं खेळावरचं प्रेम वाढतच जायचं आणि खेळाची

दहावी आवृत्ती

आयुष्याचे धडे गिरवताना

लेखक
सुधा मूर्ती

अनुवाद
लीना सोहोनी

किंमत : १५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

आयुष्याच्या प्रवासात आपल्याला विविध प्रकारच्या व्यक्ती भेटतात, अनेक घटना-प्रसंगांना सामोरे जावे लागते. त्यातून वेगवेगळे अनुभव येतात. त्यातले काही अनुभव चांगले असतात, काही घटना वाईट. काही सुखकारक असतात, तर काही दु:खदायक. काही व्यक्ती चमत्कारिक असतात, तर काही अनुभव मन थक्क करणारे....
हे अनुभव, या व्यक्ती आपल्याला बरेच काही शिकवून जातात. आपले आयुष्य विविध अंगांनी संपन्न करतात; परिपक्व बनवतात. या संग्रहात सुधा मूर्ती यांनी या अनुभवांना आणि व्यक्तिरेखांना कथारूप दिले आहे. या कथा जशा सुधा मूर्ती यांच्या आहेत, तशा त्या तुमच्या-आमच्या आहेत; विलक्षण चमत्कृतींनी भरलेल्या, गुंतागुंतीच्या जीवनाविषयीच्या आहेत.
सहजसोप्या कथनशैलीतून उलगडत जाणाऱ्या या कथा 'आयुष्याचे धडे' देतात; अंतर्मुख करतात.

कौशल्यं व डावपेच नकळतपणे आत्मसात करत, आमची खेळाची जाण सामन्यागणिक परिपक्व होत जायची.

रस्त्यावरही आम्ही जीव तोडून खेळायचो. आमच्यापैकी कोणीही डाव सोडून मधेच घरी निघून जायचा नाही. वेळ नाही, जागा नाही, साधनसामग्री नाही अशी कोणतीही सबब आम्हाला खेळण्यापासून रोखू शकली नाही.

अनेकदा आम्ही आपापसातच सामने खेळायचो. रॅनकिन कप असं त्याला आम्ही नाव दिलं होतं. रॅनकिन हे माझ्या दिवंगत चुलत भावाचं नाव होतं. रोज संध्याकाळी आम्ही ल्युकासवर जाऊन दोन संघ निवडायचो. अंधार पडायला अजून किती वेळ आहे याचा अंदाज घेत कोणत्या प्रकारचा सामना खेळायचा हे ठरवायचो : 'चला, दोन रात्रींचा कसोटी सामना खेळू या. बाद होईपर्यंत प्रत्येक जण बॅटिंग करेल, किंवा आज एक दिवसाचा सामना खेळू. प्रत्येक संघाने २५ षट्कं टाकायची.' कधीकधी आम्ही १० किंवा ५ षट्कांचाही सामना खेळायचो. प्रकाश झपाझप कमी होत जायचा, पण तरीही अंधूक दिसेपर्यंत आम्ही त्याच तडफेनं खेळत राहायचो.

सामन्यासाठी पंच म्हणून उभं राहायला कोणीही तयार नसे. कारण प्रत्येकाला हातात बॅट किंवा बॉल हवा असायचा. झेल घ्यावा किंवा जोरात अपील करावं, अशी प्रत्येकाचीच इच्छा असायची. पंच नसल्यामुळे मैदानातील सर्व निर्णय परस्पर संमतीनं घेतले जायचे. कुंपणावरून फटका मारला तर फलंदाज बाद. फलंदाजाला पायचित ठरवणं किंवा यष्टिरक्षकानं झेल घेतलेला चेंडू बॅटची कड लागून गेला होता का नाही असे निर्णय बहुसंख्य मतांच्या आधारे घेतले जायचे. *एकानं फलंदाज बाद असल्याचं अपील केलं; पण इतर दोन-तीन जणांच्या मते तो बाद नसेल, तर त्याला नाबाद ठरवलं जायचं.*

फलंदाजी करणं ही माझी सर्वांत आवडती गोष्ट आहे, आणि बाद होणं, सर्वांत नावडती. सहसा मी चिडत नाही; पण बाद झाल्यावर मात्र मला राग आवरता येत नाही. त्यातून मला जर चुकीचं बाद दिलं गेलं, तर कोणीतरी पिस्तूल रोखून मला लुबाडलंय, असं वाटत राहतं आणि डोळ्यांतून अश्रू ओघळू लागतात. डावाच्या सुरुवातीलाच असा निर्णय दिला गेला तर मी पेटून उठतो आणि पुढच्या डावात अधिक जिद्दीनं व त्वेषानं फलंदाजीला उतरतो.

'आता दाखवतोच माझा इंगा; बघाच तुम्ही!' असं मी मनातल्या मनात पुटपुटत असतो. *पाहताय ना, त्याचं मन खूप दुखावलंय. संतापाने तो खदखदतोय.*

एकूण क्रिकेट खेळताना खूप धमाल यायची. निखळ आनंद मिळायचा. पण आनंदाबरोबर अनेकदा अवहेलनाही वाट्याला यायची. वरच्या स्तरावर क्रिकेट खेळायचं तर तुमच्या पायात 'ट्रॅव्हल फॉक्स ट्रेनर'सारख्या दर्जेदार कंपनीचे बूट असायला हवेत. माझ्याकडे ते नव्हते. 'मॉंटेगो बे' कंपनीचे बूट घालून मी खेळायचो. ज्यांच्याकडे 'ट्रॅव्हल फॉक्स ट्रेनर' असायचे ते छातीला हनुवटी टेकवून आपल्याच पायांकडे अभिमानानं पाहत टेचात चालायचे. *'तुझ्याकडे फॉक्स ट्रेनर नाहीत? म्हणजे तू अनवाणीच चालतोयस!'* ट्रॅव्हल फॉक्ससारखे किमती बूट तुम्ही पायात चढवले की तुम्हाला आजूबाजूला सतत सावधपणे पाहत चालावं लागायचं. जर एखाद्या चुकीच्या रस्त्यावर, चुकीच्या वेळी, एखाद्या चुकीच्या माणसाची नजर तुमच्या पायाकडे गेली तर दुसऱ्याच क्षणी खिशातून चाकू नाहीतर पिस्तूल काढून त्यानं ते बूट हिसकावून घेतलेच म्हणून समजा.

बुटांकडे पाहून तुम्हाला एक संकेत मिळतो- क्लार्क कंपनीचे बूट घातलेला माणूस पाहिला, की तुमचं काळीज धडधडू लागतं. कारण गुंड-मवाल्यांच्या पायात नेहमी क्लार्कचे बूट असतात. ते बूट पाहिले, की तुमची नजर हळूहळू वर जाऊ लागते. त्या माणसानं शंकरपाळीच्या नक्षीचे पायमोजे घातलेले असतात. कमरेभोवतीच्या पट्ट्यात झटकन उघडता येणारा घडीचा सुरा लटकत असतो. मागच्या खिशातून एक फडकं डोकावत असतं. जाळीच्या बनियनवर त्यानं लांब बाहीचा शर्ट घातलेला असतो. त्या शर्टाला मेरिनो म्हणत असले तरी त्यात मऊशार लोकर मुळीच नसते. हा माणूस पक्का गुंड असतो. त्याच्या पाकिटात सभ्य माणसासारखं वर्तमानपत्र ठेवलेलं दिसत असलं तरी त्याच्या वाट्याला जायची कोणाचीच हिंमत नसते.

याबाबतीत मात्र मी स्वतःला नशिबवान म्हणायला हवं. क्रिकेटनं मला केवळ नावच नव्हे, तर अशा गुंड-मवाल्यांपासून संरक्षणही मिळवून दिलं होतं. माझ्याकडे वाकडी नजर करून पाहायचं कोणीच धाडस करत नसे. त्या वेळी आमच्या इथल्या गल्ल्यागल्ल्यांतून हातात सुरा घेऊन फिरणाऱ्या मुलांनी धुमाकूळ घातला होता. मिस हॅमिल्टन राहत असलेली मॅक्ग्रेगॉर गल्ली, माउंट

ॲव्हन्यूवरून उत्तरेला काही मिनिटांच्या अंतरावर असलेली डॉरेट आळी, जॅक पथ अशा ठिकाणी गुंडांच्या वेगवेगळ्या टोळ्या प्रस्थापित होत्या.

अनेकदा या भागात जरी बाहेरून शांतता नांदत असली तरी आतून काहीतरी खदखदतंय असं वाटत राहायचं. प्रत्यक्ष जेव्हा वातावरण तापायचं तेव्हा दोन गल्ल्या एकमेकांविरुद्ध पेटून उठायच्या. इतके दिवस दडवून ठेवलेल्या पिस्तुलांमधून खुलेआम फैरी झडू लागायच्या. रस्त्यावर चिटपाखरूदेखील दिसायचं नाही. काँक्रीटच्या भिंतींना भोकं पाडून सुसाट गोळ्या आत घुसायच्या, तर काही कुंपणावर आपटून पुन्हा हवेत उडायच्या. शाळा झटपट बंद केल्या जायच्या. जवळपासच्या भागातील लोक माना खाली घालून सावध पावलं टाकत, आपला जीव मुठीत धरून घराची वाट पकडायचे.

माझ्या घराच्या पश्चिमेला असलेल्या तिव्हाली उद्यानात एक टोळी सक्रिय होती. पूर्वेला वारेका टेकडीवर दुसऱ्या टोळीची दहशत होती. उत्तरेला माझ्या घरापासून दोन मैलांवरील नॅशनल स्टेडियमच्या जवळ असलेल्या आमच्या माध्यमिक शाळेच्या अगदी फाटकासमोरची टोळी सर्वांत खतरनाक होती. काही मुलं शाळेत येताना स्वसंरक्षणार्थ मोठा चाकू बाळगत. काही द्वाड पोरं नकली पिस्तुलांतून मोठा आवाज काढून गुंडांची नक्कल करत.

लहानपणी ल्युकासच्या पॅव्हिलियनजवळ आम्हीही एकमेकांवर गोळ्या झाडण्याचा खेळ खेळायचो. मैदानातील चिखलमातीच्या बंदुका बनवायचो आणि त्यातून गोळीबार करायचो. धूम-धडाम-धूम! समोर एकाला उभं करायचं. बंदुकीतून गोळी सुटली की तो जमिनीवर आडवा पडून मेल्याचं सोंग करायचा. धूळ, पाणी आणि चिखलाने सारं मैदान बरबटून गेलेलं असायचं.

केविन मरे हा माझ्याबरोबर रोलिंग्टन टाउन प्राथमिक शाळेत होता. क्रिकेट खेळताना माझ्या फिरकी गोलंदाजीवर तो यष्टिरक्षण करायचा. मी सलामीला तर तो तिसऱ्या किंवा चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला यायचा. गुंडांनी केलेल्या गोळीबारात त्याचे तीन काका मृत्यू पावले होते. त्या घटनेनंतर त्याचे वडील स्वतःचा जीव वाचवण्यासाठी परागंदा झाले होते. आम्ही १७-१८ वर्षांचे झालो, तेव्हा ते किंगस्टनला परत आले. मात्र आपल्या भावांसारखाच ते गुंड आपलाही जीव घेतील या भीतीनं ते आमचा खेळ

पाहायला मैदानात फिरकतही नसत.

आम्ही सर्व संगीताचे शौकीन होतो. शनिवारी आई बाजारात जायची. रेडिओवर बॅशमेंटचं संगीत सुरू असायचं. मला ते खूपच आवडायचं. टेपरेकॉर्डरमध्ये कॅसेट टाकून ते ध्वनिमुद्रित करायचा मला छंद होता.

रस्त्यावर गाणी ध्वनिमुद्रित केलेल्या कॅसेट्स स्वस्तात मिळायच्या. त्या आम्ही विकत घ्यायचो आणि आपापसात कॅसेट्सची देवाणघेवाण करायचो. बॅटरी खर्च होऊ नये म्हणून आम्ही कॅसेट्समधील चाकं पेनाने उलटी फिरवायचो. वाया गेलेल्या कॅसेट्समधून निघून सुटलेल्या लांबलचक टेप्स रस्त्यावरून उडत झाडांभोवती गुंडाळल्या जायच्या.

बाउंटी किलरच्या 'वॉरलॉर्ड वॉक' गाण्याचे सूर कानावर यायचे.

'Nuh bwoy can chat when di Warlord walk
Fool caan chart when di Warlord talk
Place lock dun when di Warlord rock
Bomb juss when Warlord waan shot.
Tough like a stone that a Warlord heart
Shot bwoy dome dat a Warlord knack
Copper plus chrome dat Warlord pack
Tell mi, gunshot when Warlord want.'

हळूहळू काळोख पडत जायचा आणि मग वातावरण शांत व्हायचं. जणू तो एक प्रकारचा युद्धविराम असायचा. बॅशमेंट संगीतावर नाच-गाण्याचा धंदा तेजीत असायचा. म्हणून गुंड लोकांनी पैसे कमावण्यासाठी तो उद्योग स्वतःच्या ताब्यात ठेवलेला होता. युद्धविराम पुकारल्यावर सर्वत्र शांतता पसरायची. आत्तापर्यंत संगीताच्या लयीत धुंद होऊन नाचणारे आमचे शेजारपाजारचे लोक पुन्हा आपापल्या घरात परतून आपली 'शेजाऱ्यांची' मूळ भूमिका वठवू लागत. अर्थात, पुन्हा संधी मिळताच रस्त्यावर जमायची सर्वांचीच तयारी असे.

माझ्या क्रिकेटच्या कारकिर्दीत अनेक संकटं समोर आली. काही मी टाळू शकलो; पण काही संकटं टाळणं मात्र शक्यच नव्हतं.

कृष्णवर्णीय लोकांना क्रिकेट खेळण्याची संधी मिळावी या उद्देशानं ल्युकास क्लबची स्थापना झाली. १९व्या शतकाच्या अखेर किंगस्टनमध्ये जेव्हा क्रिकेट खेळायला प्रथम सुरुवात झाली, तेव्हा खेळाच्या आयोजनामध्ये

आणि प्रत्यक्ष खेळामध्ये फक्त गोऱ्या लोकांचाच सहभाग होता. ल्युकासच्या स्थापनेनंतर हे चित्र पालटलं. ल्युकासनं कृष्णवर्णीय क्रिकेटपटूंबद्दल इतरांचा दूषित दृष्टिकोन साफ बदलून टाकला. १९०१ मध्ये कृष्णवर्णीय क्रिकेटपटूंना खेळण्याची परवानगी मिळाली. तीनच वर्षांच्या आत ल्युकास क्लबनं वरिष्ठ गट चषक जिंकला. त्यानंतर सतत दोन वर्षं तो चषक ल्युकासकडेच होता. एकूण १७ वेळा तो करंडक जिंकण्याचा मान क्लबनं मिळवलाय आणि आत्तापर्यंत ल्युकासच्या १० खेळाडूंनी वेस्ट इंडिज संघात स्थान पटकावलंय.

पण तरीही बिचाऱ्या गरीब कृष्णवर्णीय लोकांना अजूनही संघर्ष करावा लागतोय. प्राथमिक व माध्यमिक शाळेपासून इतर स्तरांवर खेळलेल्या प्रत्येक संघाचं मी नेतृत्व केलंय. *जन्मजातच तो एक नेता आहे.* काही स्पर्धा मी जिंकल्याही आहेत. पोरसवदा वयात जेव्हा जमैका युवक संघामध्ये माझी निवड झाली, तेव्हाही लोकांच्या माझ्याकडून बऱ्याच अपेक्षा होत्या. १९९५ मध्ये माझ्या संघात माझा मोठा भाऊ अँड्र्यू होता. १९९६ मध्ये केनसिंग्टन क्लबतर्फे खेळणारा माझा जुना मित्र वेव्हल हाईंड्सही माझ्या संघातून खेळला. केनसिंग्टनचाच एक खंदा खेळाडू रॉय मॅक्लिन हा आमचा मार्गदर्शक होता. त्याच्याच तालमीत मी तयार झालो. १९९७ सालची युवा चषक स्पर्धा गयानामध्ये आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी रॉय मॅक्लिन प्रत्येक खेळाडूची गुणवत्ता हेरत होता.

माझ्याबद्दल तोपर्यंत बऱ्याच कंड्या पिकवण्यात आल्या होत्या. शिबिरामधील मी सर्वांत आळशी खेळाडू आहे, माझं फलंदाजीचं तंत्र अत्यंत सदोष आहे, असं बरंच काही माझ्याविरुद्ध बोललं जाई. त्या वेळी लिंडन राइट हा आमच्या संघाचा व्यवस्थापक होता. काही वर्षांनंतर तो जमैका क्रिकेट असोसिएशनचा अध्यक्ष झाला. आज तो माझा चांगला मित्र आहे. आम्ही एकमेकांची भरपूर चेष्टामस्करी करतो; परंतु त्या वेळी प्रत्येक नियमाचं काटेकोर पालन करणारा एक शिस्तप्रिय माणूस, अशी त्याची ख्याती होती. शर्ट पँटीत खोचलेलाच हवा. रबरी सँडल्स वापरायचे नाहीत.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

◆

Shivaji Sawant

Srikrishna

The Lord Of The Universe

Translated by
Kadambini Dharap

Co- Translator
Madhura Phadke



Prize- :995/ Rs. | Postage :50/- Rs.

E-book Available

Srikrishna!
A monumental epoch-maker that has reigned the hearts of Indian men and women, young and old alike for more than five thousand years! Official references to Srikrishna's life can be found primarily in the Srimadbhagavatam, Mahabharata, Harivansha and a few other Puranas. Over the last thousands of years, biased, fanciful depictions of his life story have enshrouded his character. The reason being the unintended, credulous augmentation of irrational miracles in his life story. Today, Srikrishna is far removed from reality. Is it possible then to perceive Srikrishna's life de facto without deviating from the facts of his existence? Did he only preach what he expounded in the Gita? Or did he actually practice it in his own life? If the imaginary layers enshrouding his life story are peeled off delicately with careful reasoning it is possible to view his epoch-making, versatile character as is. Just like the sun shining high in the sky, this philosophical warrior; the pivot of the story of Mahabharata would keep shining forever. His majestic life story has the power to be the catalyst to inspire human beings and make the world great again. Yugandhar! Another masterpiece from the renowned author of Mrityunjaya; penned after rigorous travelling across India, years of meticulous research and contemplation, and interviewing many scholars.

विशेष लेख

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय
सेवा-अपेक्षा- स्थिती-कार्यवाही

'सार्वजनिक ग्रंथालये' लोकांनी, लोकांसाठी आणि लोकांच्यामार्फत चालवावित, अशी सार्वजनिक ग्रंथालयांविषयीची महाराष्ट्र राज्याची धारणा आहे. महाराष्ट्र ग्रंथालय अधिनियम, १९६७चे स्वरूप इतर राज्यांतील ग्रंथालय अधिनियमाहून वेगळे आहे. महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांची स्वायत्तता या अधिनियमाने कायम ठेवली आहे. सार्वजनिक ग्रंथालये जनतेच्या सेवेसाठी आहेत आणि ती स्थानिक लोकांनीच चालवावित हे तत्त्व मान्य करण्यात आले आहे. महाराष्ट्रात ग्रंथालय कायदा (अधिनियम) अस्तित्वात येईपर्यंत म्हणजे १९६७पर्यंत ४३४३ ग्रंथालये कार्यरत होती. ही ग्रंथालये संबंधित संस्थांकडून चालविली जात होती. त्यांना काही प्रमाणात शासनाकडून अनुदानही वितरित केले जात होते. त्यांना आवश्यकता होती ती नियमित अर्थसाहाय्याची आणि मार्गदर्शनाची.

महाराष्ट्र ग्रंथालय अधिनियम, १९६७कडून पुढील अपेक्षापूर्ती अपेक्षित होती.

१. कायमस्वरूपी व गरजेनुसार वाढत्या सहायक अर्थसाहाय्याचा पुरवठा होणे.

२. ग्रंथालये सुरू करण्यासाठी संस्थांची निर्मिती, संस्थांकडून कर्मचारी व्यवस्थापन आणि ग्रंथालयांचा विकास याची जबाबदारी स्वीकारणे.

३. कायमस्वरूपी, कार्यक्षम, वाढती व परस्पर सहकार्य असलेली ग्रंथालय सेवा उपलब्ध होणे.

४. ग्रंथालयांच्या जाळ्याची निर्मिती होणे.

५. वय, शिक्षण, अनुषंगाने गरजेची, विनामूल्य सेवा उपलब्ध होणे.

महाराष्ट्रांमध्ये ग्रंथालय कायद्याची अंमलबजावणी १ मे १९६८ रोजी सुरू झाली. सार्वजनिक ग्रंथालयांना अर्थसाहाय्य करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये नियम, १९७० तयार करण्यात आले आणि प्रतिवर्षी अनुदान वितरित होऊ लागले.

सन १९६७-६८अखेरीस शासन मान्यताप्राप्त अनुदानित सार्वजनिक ग्रंथालयांची संख्या ४७४ होती व सन १९६८-६९ या आर्थिक वर्ष अखेरच्या

ग्रंथालय अनुदानावरील खर्च रुपये ११,३२,४२८ होता. मार्च २०१६ अखेर ग्रंथालयांची संख्या १२१४४ इतकी आहे आणि ग्रंथालयांच्या अनुदानासाठी सन २०१६-१७ या वर्षाकरीता रुपये १२७००/-लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती. यावरून ग्रंथालयांची वाढजवळपास २६ पट असून, अनुदान रकमेमध्ये ११२१ पट वाढझाली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियमामध्ये शासन प्रति वर्षी रुपये २५ लाखांपेक्षा कमी नसेल इतकी रक्कम ग्रंथालय निश्चित उपलब्ध करून देईल, अशी तरतूद असताना, सन २०१६-१७ या वर्षाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेला रुपये १२,७००/- लक्ष रुपये निधी देखील ५०८ पट आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये, नियम १९७०नुसार 'अ' वर्ग जिल्हा ग्रंथालयास प्रतिवर्षी रुपये १५,०००/- अनुदान मिळत होते. सध्या रुपये ७,२०,०००/- मिळत आहे. तसेच वर्ग 'ड' ग्रंथालयाच्या अनुदानात रुपये ५००/- वरून रुपये ३०,०००/- पर्यंत वाढझाली आहे. सदर अनुदान मान्य खर्चाच्या ९० टक्के (कमाल मर्यादा) दिले जाते, म्हणजे एखाद्या ग्रंथालयाच्या किमान अपेक्षित खर्चाच्या फक्त १०टक्के खर्च ग्रंथालयाने करावयाचा आहे. या अनुदानवाढीचे प्रमुख कारण कर्मचाऱ्यांच्या वेतनातील वाढआहे. प्रत्येक वेळी वाढीव अनुदानातील ५०टक्के रक्कम कर्मचारी वेतनाकडे वर्ग करण्यात आली आहे. ही वेळोवेळची वाढ(सहा वेळा) विचारात घेऊनही, सध्या जिल्हा अ-वर्ग ग्रंथालयातील ग्रंथपाल पदावरील कर्मचाऱ्यास रुपये १०,५००/-,शिपाई क्र. १ रुपये ३,०००/- आणि क्र. २ रुपये २८३४/- प्रतिमहिना वेतन मिळत असून, या कर्मचाऱ्यांनी प्रत्येक कामकाजाच्या दिवशी सहा तास काम करणे बंधनकारक आहे. या वस्तुस्थितीवरून, कर्मचारी वेतनाचा प्रश्न सुटलेला नाही हे स्पष्ट होते. अपेक्षित मान्य खर्चाच्या ९०टक्के अनुदान शासनाकडून देऊनही वाढीव अर्थसाहाय्याची मागणी थांबत नाही आणि ती थांबणारही नाही, याचे कारण अनुदानातील वाढआणि कर्मचाऱ्यांचे वेतन याचा परस्परांशी जोडलेला संबंध असून, कर्मचाऱ्यांना मिळत असलेले वेतन अत्यल्प आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम १९६७च्या अपेक्षेनुसार महाराष्ट्रातील ग्रंथालय संस्थांची स्वायत्तता कायम ठेवली असे जरी असले तरी या ग्रंथालयांच्या संस्था चालकांनी कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन आणि ग्रंथालयांचा विकास याची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक होते. अशी जबाबदारी महाराष्ट्रामधील किती नोंदणीकृत व

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ग्रंथालयांनी पूर्ण केली याबाबतचे आत्मनिरीक्षण संबंधितांनी करणे गरजेचे आहे. तथापि, जबाबदारी पूर्ण करणारी काही ग्रंथालये आहेत हे पुढील ग्रंथालयांच्या उदाहरणांवरून स्पष्ट होईल.

पुणे मराठी ग्रंथालय, पुणे जिल्हा अ-चा सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक अहवालावरून मान्य खर्च रुपये ७९,५९,८९३ असून यामधील वेतनावरील खर्च रुपये २५,३८,०६२/- इतका आहे. ग्रंथालयात ३० कर्मचारी असून, त्यामधील २२ कर्मचारी पूर्ण वेळ व आठ कर्मचारी अर्धवेळ कार्यरत आहेत. ग्रंथालय व्यवस्थापनाने स्वतःची वेतनश्रेणी दिली असून, कर्मचाऱ्यास किमान रुपये ६०००/- ते कमाल रुपये १३,०००/- मासिक वेतन दिले जात होते. व्यवस्थापनाने कर्मचारी व्यवस्थापन उत्तम केले आहेच, त्या शिवाय ग्रंथालयाचा विकास देखील उत्तम पद्धतीने साध्य केला आहे. महाराष्ट्रातील उर्वरित अनुदानित ग्रंथालयांनी ग्रंथालयाच्या गरजेचे उत्पन्न वाढवून कर्मचारी व्यवस्थापन व ग्रंथालयाचा विकास साध्य केल्यास ग्रंथालयांना शासनाच्या अनुदानावर विसंबून रहावे लागणार नाही, याचा अर्थ शासनाने अनुदानात वाढकरू नये, तसेच कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी उपलब्ध करून देऊ नये असा होत नाही.

'गाव तिथे ग्रंथालय' हे शासनाचे घोषवाक्य आहे. १ मे २०१८ रोजी ग्रंथालय कायदा अस्तित्वात येऊन अर्धशतक लोटेले असले तरी या उद्दिष्टापासून राज्य खूपच दूर आहे. सन २०१५-१६ अखेर १२१४४ अनुदानित व ४३ शासकीय अशी एकूण १२१८७ सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत आहेत. महाराष्ट्रात जिल्हे-३६, तालुके ३७८ व खेडी ४३,७११ अशी एकूण ४४,१२५ गावे असूनही जवळपास ३२,००० गावांमध्ये ग्रंथालय उपलब्ध नाही. सध्या इतर - अ (१६७) वर्ग ग्रथंालयांस रुपये २,८८,०००/-, ब (२००३) वर्ग ग्रंथालयांस रुपये १,९२,०००/- क (४१२२) वर्ग ग्रंथालयांस रुपये ९६,०००/- आणि ड (५,५३९) वर्ग ग्रंथालयांस रुपये ३०,०००/- वार्षिक अनुदान वितरित होते, म्हणजे एका ग्रंथालयास सरासरी प्रतिवर्षी रुपये १,५१,५००/-अनुदान वितरित करावे लागते. ३२,०००/- सार्वजनिक ग्रंथालयांना प्रतिवर्षी जवळपास रुपये ४८५/- कोटी आणि सध्या कार्यरत असलेल्या १२,१४४ ग्रंथालयांसाठी रुपये १२७ कोटी अशा एकूण ६१२ कोटी रकमेची आवश्यकता प्रतिवर्षी लागणार आहे. ३२,००० ग्रंथालयांना शासनमान्यता देण्याचा कालावधीही विचारात घ्यावा लागेल. श्री. व्यंकप्पा पतकी समितीने (२००१) दि. १८ ऑक्टोबर २००२ रोजी आपल्या समितीचा दुसरा आणि अखेरचा अहवाल शासनास सादर केला होता. या अहवालाच्या

शिफारशींमध्ये पुढील दहा वर्षांत 'गाव तेथे ग्रंथालय' हे उद्दिष्ट साध्य करण्याची शिफारस करण्यात आली होती. शासनाला अहवाल सादर होऊन आज १५ वर्षांपेक्षा अधिक कालावधी लोटला असून, अजूनही जवळपास ३२,००० गावांमध्ये सार्वजनिक ग्रंथालय सुरू व्हावयाचे आहे. यावरून 'गाव तेथे ग्रंथालय'हे घोषवाक्य अवास्तव तर नाही ना असे वाटणे साहजिक आहे.

गुजरातमध्ये शासकीय २९६ व अनुदानित ३१८० सार्वजनिक ग्रंथालये आहेत. सन २०१७-१८ साठी रुपये ३२३९ लाखांची तरतूद करण्यात आली होती. महाराष्ट्रात १२,१४४ अनुदानित ग्रंथालये असून, सन २०१६-१७साठी रुपये १२,७००/- लक्ष तरतूद होती. गुजरातमध्ये विशेष ग्रंथालये (दहा) रुपये ५,००,०००/-, शहर ग्रंथालये (४२) रुपये १,५०,०००/- ग्राम ग्रंथालये (३४४५) रुपये १५,०००/- वार्षिक अनुदान उपलब्ध होते, तर महाराष्ट्रात जिल्हा-अ (३४) रुपये ७,२०,०००/-, इतर-अ (१६७) रुपये २,८८,०००/- आणि 'ड' वर्ग ग्रंथालयास रुपये ३०,०००/- वार्षिक अनुदान उपलब्ध होते. गुजरात- मधील अनुदानित ग्रंथालयांतील कर्मचाऱ्यांस कोणतीही वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नाही.

केरळमध्ये ५८३८ सार्वजनिक ग्रंथालये असून, सन २०१६-१७ साठी रुपये ४७,५१,४७,२३१ इतका निधी प्राप्त झाला होता. ग्रंथालयांच्या अ,ब,क,ड,इ आणि फ अशा श्रेणी (ग्रेड) आहेत. अ-३२,०००/-, ब-२४,०००/-, क-२०,०००/-, ड-१६,०००/-, इ-१४,०००/- आणि फ-१२,०००/- रुपये वार्षिक अनुदान दिले जाते, तसेच श्रेणी अ (+) ३,०००/-, अ,ब,क २५००, ड-इ-फ-२२५० रुपये ग्रंथपालास मासिक भत्ता दिला जातो. कर्मचाऱ्यांना सध्या तरी वेतनश्रेणी दिलेली नाही. केरळ राज्य ग्रंथालय परिषदेमार्फत चालविल्या जात असलेल्या जिल्हा, तालुका व राज्य बाल ग्रंथालये यामधील कर्मचारी आकृतिबंध व वेतनश्रेणी याबाबतचा प्रस्ताव केरळ शासनाच्या विचाराधीन आहे.

गुजरात व केरळ राज्यांतील अनुदानित सार्वजनिक ग्रंथालयांचा विचार केल्यास तेथील ग्रंथालयांना देण्यात येत असलेले अनुदान हे महाराष्ट्रातील मिळणाऱ्या ग्रंथालयांच्या अनुदानापेक्षा कमी आहे. तसेच दोन्ही राज्यांतील अनुदानित ग्रंथालयांतील कर्मचाऱ्यांसाठी वेतनश्रेणी देण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहायक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री यासाठी मान्यता) नियम, १९७० असा शब्दप्रयोग असल्याने शासनाकडून फक्त

अनुदानसाहाय्य करावे व ग्रंथालय संस्थाचालकांनी कर्मचारी व्यवस्थापन व ग्रंथालयांचा विकास करण्याची जबाबदारी महाराष्ट्र ग्रंथालय अधिनियम, १९६७ द्वारे केली असावी असे वाटते. पुणे मराठी ग्रंथालय, पुणेमध्ये आकृतिबंधानुसार सहा कर्मचारी अपेक्षित असताना ३० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून, किमान रुपये चार लाख वेतनावर खर्च करणे बंधनकारक असताना रुपये २५,३८,०६२/- इतका खर्च सन २०१६-१७मध्ये केला आहे. महाराष्ट्रातील १२,१४४ अनुदानित ग्रंथालयांपैकी १५४ ग्रंथालये स्थानिक स्वराज्य संस्थांची आहेत. उर्वरित ११,९९० ग्रंथालये नोंदणीकृत संस्थांची आहेत. महानगरपालिका, नगरपालिकांमधील ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना संबंधित संस्थेची वेतनश्रेणी दिली जाते. ग्रामपंचायत आणि नोंदणीकृत संस्थांनी 'पुणे मराठी ग्रंथालय, पुणे'चा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आपल्या ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना योग्य ते वेतन देण्याची सध्यातरी गरज आहे, याबाबत गांभीर्याने विचार व्हावा असे वाटते.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय सेवा विषयी ग्रंथालयांचे संगणकीकरण, आधुनिकीकरण, कामाकाजामध्ये समन्वय, परस्पर सहकार्य, ग्रंथालयांच्या जाळ्याची निर्मिती, वाचन साहित्य सामूहिक वापर, ग्रामीण भागात सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना-विकास, जिल्हा, तालुका ग्रंथालयांनी स्वीकारावयाची जबाबदारी इत्यादी अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. सन १९६७चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३,४, कलम-३ अन्वये या अधिनियमाच्या अंमलबजावणीशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर राज्य सरकारला सल्ला देणारी, 'राज्य ग्रंथालय परिषद' अस्तित्वात नाही. यामुळे महाराष्ट्र ग्रंथालय चळवळ विकास यावर कोणतेही नियंत्रण नाही. महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळ योग्य दिशेने वाटचाल करीत आहे, असे विधान करणे धाडसाचे होईल. यावर राज्य शासनाने गांभीर्याने विचार करणे महत्त्वाचे ठरेल.

-श्याम दाइंगडे

मोबा. ९८९०६५३०४५

(लेखक ग्रंथालय संचालक, कोकण भवन, प्रमुख पदावरून सेवानिवृत्त झाले असून, त्यांचे 'सार्वजनिक ग्रंथालये' याविषयी तीन ग्रंथ यापूर्वीच प्रकाशित झाले आहेत.)

◆

दहावी आवृत्ती

सरमिसळ

द. मा. मिरासदार



किंमत : १३०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

महाराष्ट्राच्या प्रत्येक खेड्यात जसे एक
मारुतीचे देऊळ असते, एक पार असतो,
एक ओढा असतो, त्या मातीत पिकणारे
खास पीक असते; तसा गावरान विनोदही असतो.
गावओढ्यासारखाच तो सतत खळाळत असतो
आणि हरेक पाण्याची चव वेगळी,
तशी या विनोदाची चवही वेगळी असते, खास असते. भंपक
माणसांनी मारलेल्या बढायांतून,
अडाण्यांच्या आणि अश्रापांच्या सहज वागण्यातून,
बेरकी लोकांच्या गप्पांतून,
जुन्या माणसांच्या आठवणींतून,
तरण्यांच्या हुंदडण्यातून विनोद उसळ्या घेत असतो. रोज हसावे
असे काही घडत असते.
उत्तम म्हणून गाजलेल्या मिरासदारांच्या कथांतून
हा गावरान विनोद अगदी जसाच्या तसा आढळतो.

पुस्तक परिचय

द ओडेसा फाइल

ब्रिटनमधल्या केन्ट परगण्यातील ॲशफोर्ड इथे १९३८ मध्ये फ्रेडरिक फॉर्सिथ यांचा जन्म झाला. ग्रॅनडा इथे शिक्षण घेतल्यानंतर वयाच्या अवघ्या एकोणिसाव्या वर्षी ते रॉयल एअर फोर्समध्ये भरती झाले आणि रॉयल एअर फोर्समधल्या अत्यंत तरुण अशा वैमानिकांपैकी एक बनले. १९५८ मध्ये त्यांनी रॉयल एअर फोर्स सोडले.

१९६१ ते १९६५ या काळात रॉयटरमध्ये पत्रकार म्हणून काम केल्यानंतर त्यांनी बीबीसीमध्ये असिस्टंट डिप्लोमॅटिक कॉरस्पॉन्डन्ट म्हणून काम पत्करले. बायफ्रा आणि नायजेरिया यांच्यामधल्या यादवी युद्धाच्या वेळी जुलै ते सप्टेंबर १९६७ या कालखंडात वार्ताहर म्हणून काम करताना काही वाद निर्माण झाल्यावर त्यांनी १९६८ मध्ये बीबीसीची नोकरी सोडली. फ्री-लान्स रिपोर्टर म्हणून पुन्हा एकदा बायफ्राला भेट दिल्यानंतर त्यांनी 'द बायफ्रा स्टोरी' हे आपले पहिले पुस्तक लिहिले.

१९७१ मध्ये प्रकाशित झालेली 'द डे ऑफ द जॅकॉल' ही त्यांची पहिली कादंबरी. त्यानंतर अनेक कादंबऱ्या, दोन कथासंग्रह अशी पुस्तकेही त्यांनी लिहिली. 'ग्रेट फ्लाइंग स्टोरीज' या संग्रहात त्यांनी सर ऑर्थर कॉनन डॉयल, लेन डिलायटन, एच. जी. वेल्स इत्यादींच्या कथा एकत्रित केल्या आहेत. बारीकसारीक तपशिलांसह संशोधन करून, कटकारस्थाने रचून आपल्या ओघवत्या भाषेत लिहिलेल्या त्यांच्या कादंबऱ्यांनी जगभर खळबळ माजवली आहे.



लेखक
फ्रेडरिक फॉर्सिथ

अनुवाद
अशोक पाथरकर

तुम्ही भूतकाळ माफ करू शकता?

१९६३ साल. एका तरुण जर्मन पत्रकाराकडे वंशसंहारातून वाचलेल्या एका माणसाच्या आत्महत्येच्या तपासाची कामगिरी देण्यात आली आहे. बातमी साधी सरळ वाटते : एका व्यक्तीच्या हालअपेष्टांची करुण कहाणी; पण मृत व्यक्तीच्या डायरीच्या पानात एक दीर्घकाळ दडलेले रहस्य सापडते.

त्यानंतर जे घडते ते म्हणजे हजारो लोकांच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या आणि ज्याला त्याबद्दल अजून शिक्षा झालेली नाही, अशा छळछावणीच्या एका भूतपूर्व प्रमुखाचा जीवघेणा पाठलाग.

पीटर मिलर ते ब्राऊन पेपरचे पुडके घेऊन घरी आला, तेव्हा नुकतेच तीन वाजले होते. त्याने पुडके हॉलमधल्या टेबलावर टाकले आणि ते वाचायला बसण्याआधी मोठे पातेलेभर कॉफी करायला आत गेला.

त्याच्या आवडत्या आरामखुर्चीत, जवळच कॉफीचा कप घेऊन, सिगारेट पेटवून तो बसला आणि त्याने पुडके उघडले. ती डायरी म्हणजे सुट्या कागदांची, वर-खाली पुठ्ठ्याचे मळकट काळ्या प्लॅस्टिकचे कव्हर असलेली फाईल होती. कोणतेही कागद काढता यावेत किंवा घालता यावेत, अशी क्लिप मध्ये होती.

फाईलमध्ये दीडशे टाईप केलेली पाने होती. काही अक्षरे ओळीच्या जरा वर तर काही जरा खाली आणि काही पुसट तर काही ठळक होती, त्यावरून ती जुन्या टाइपरायटरवर टाईप केली असावीत. बहुतेक पाने अनेक वर्षांपूर्वी अनेक-अनेक वर्षांच्या काळात टाईप केलेली असावीत, कारण बहुतेक कागदांना पिवळट छटा आली होती.

पण वरचे आणि अगदी खालचे काही कागद नवे वाटत होते. त्यावरून ते थोड्याच दिवसांपूर्वीच लिहिले असावेत. सर्वांत वर एक प्रस्तावना होती आणि शेवटी उपसंहार होता. त्या दोन्ही कागदांवर २१ नोव्हेंबर तारीख होती. त्यावरून ते दोनच दिवसांपूर्वी लिहिलेले असावेत. आपले जीवन संपवण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्याने ते लिहिले असावेत, असा मिलरने अंदाज केला.

पहिल्या पानावरील काही परिच्छेदांवरून नजर फिरवल्यावर त्याला आश्चर्य वाटले, कारण भाषा अचूक व स्पष्ट जर्मन होती आणि तिच्यावरून लिहिणारा सुशिक्षित आणि सुसंस्कृत माणूस असावा. फाइलीच्या मुखपृष्ठावर एक पांढरा कागद चिकटवलेला होता आणि तो मळू नये म्हणून त्याच्यावर एक मोठा पारदर्शक कागद चिकटवलेला होता. कागदावर मोठ्या अक्षरात, काळ्या शाईत 'सॉलोमन टाउबरची डायरी' असे लिहिलेले होते. मिलर खुर्चीत मागे सरून बसला. त्याने फाईल उघडली आणि तो पहिले पान वाचू लागला.

सॉलोमन टाउबरची डायरी

प्रस्तावना

माझे नाव सॉलोमन टाउबर. मी ज्यू आहे आणि आता मरणार आहे. मी स्वत:चे आयुष्य संपवण्याचा निर्णय घेतला आहे. कारण त्याला आता काही

किंमत राहिलेली नाही आणि माझ्याकडे आता दुसरे काही करण्याजोगेही नाही. माझ्या आयुष्यात ज्या गोष्टी करायचा मी प्रयत्न केला त्यांचा काहीही उपयोग झाला नाही आणि माझे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. कारण जे वाईट आहे ते तरले आहे आणि जे चांगले होते ते धुळीला मिळाले आहे. माझ्या ओळखीचे, मित्र, ज्यांचे हाल झाले, जे बळी पडले, ते सर्व नष्ट झाले आहेत आणि ज्यांनी अत्याचार केला तेच माझ्याभोवती आहेत. दिवसा मला रस्त्यात त्यांचे चेहरे दिसतात आणि रात्री इस्थरचा, अनेक वर्षांपूर्वी परलोकवासी झालेल्या पत्नीचा, चेहरा दिसतो. मी आतापर्यंत जिवंत राहिलो याला एकच कारण होते, ते म्हणजे मला एक गोष्ट करायची होती, एक गोष्ट मला बघायची होती आणि ती मला कधीच करता किंवा बघता येणार नाही, हे मला कळून चुकले आहे.

जर्मन लोकांविषयी माझ्या मनात जराही द्वेष किंवा कटुता नाही, कारण ते चांगले लोक आहेत. आम जनता वाईट नसते, काही व्यक्ती वाईट असतात. इंग्रज तत्त्वज्ञ बर्क म्हणाला ते योग्यच होते : 'पूर्ण देशावर आरोपपत्र कसे ठेवायचे ते मला माहीत नाही.' सामुदायिक अपराधीपणा असा नसतो. कारण बायबलमध्ये सांगितले आहे की देवाला सोदोम आणि गोमोरा हे देश, ज्यात दुष्ट माणसे त्यांच्या बायका-मुलांसह राहत होते, ते नष्ट करायचे होते; पण त्यांच्यात एक सच्चा माणूस राहत होता आणि तो सच्चा होता म्हणून त्याला काहीही झाले नाही. तेव्हा अपराधीपणा हा मुक्तीप्रमाणेच व्यक्तिसापेक्षच असतो.

मी जेव्हा रिगा आणि स्टुटहोफच्या छळछावण्यांमधून बाहेर पडलो, जेव्हा मृत्यूची शिक्षा झालेल्यांच्या मॅगडेबर्गला जाणाऱ्या जथ्यातून वाचलो, जेव्हा एप्रिल १९४५ मध्ये ब्रिटिश सैनिकांनी माझ्या देहाची तिथून सुटका केली तेव्हा माझा आत्मा तिथेच साखळ्यांमध्ये राहिला, तेव्हा मी सगळ्या जगाचा द्वेष करू लागलो. मी माणसांचा द्वेष करू लागलो; झाडांचा, दगडांचा द्वेष करू लागलो. कारण त्या सर्वांनी माझ्या विरुद्ध कट करून माझे हाल केले होते आणि अर्थातच जर्मनांचा तर मी सगळ्यात जास्त द्वेष करीत होतो. गेल्या चार वर्षांत अनेकदा आणि त्या वेळीसुद्धा, मी देवाला विचारले की देवाने त्यांचा सर्वांचा, बायका-मुलांसकट नाश का नाही केला? त्यांची गावे, त्यांची घरे जमीनदोस्त का नाही केली? आणि ते केले नाही म्हणून मी त्याचाही द्वेष करू लागलो. 'आम्ही तुझे लाडके आहोत असा तू आमचा समज करून दिला होतास आणि तूच आम्हाला

वाऱ्यावर सोडलेस' असे मी त्याला बोललो. देव नाहीच आहे असेही म्हणालो.

पण जसा काळ गेला तसा मी पुन्हा प्रेम करायला शिकलो – दगडांवर, झाडांवर, डोक्यावरील आकाशावर, गावाजवळच्या नदीवर, रस्त्यातल्या कुत्र्यांवर आणि मांजरांवर, दगडांमधल्या शेवाळ्यावर आणि माझ्या विद्रूप चेहऱ्याला घाबरून पळून जाणाऱ्या मुलांवर. त्यांचा काहीच दोष नाही. एक फ्रेंच म्हण आहे : 'सगळे समजणे म्हणजे सगळे माफ करणे.'

जेव्हा कोणी लोकांना समजून घेतो – त्यांचा भोळेपणा, त्यांची भीती, त्यांचा लोभ आणि सत्तेची हाव, त्यांचे अज्ञान आणि जो सर्वांत मोठ्याने ओरडेल त्याच्यापुढे लाचार होणे – तेव्हा तो माफ करू शकतो. पण तो कधीच विसरू मात्र शकणार नाही.

काही लोक असे असतात की, त्यांची दुष्कृत्ये समजण्यापलीकडे असतात आणि म्हणून माफ करण्याच्याही पलीकडे असतात. कारण ते अजून आपल्या अवतीभवती असतात, आपल्या गावात असतात, ऑफिसात काम करत असतात, कँटिनमध्ये सगळ्यांबरोबर खात-पीत असतात, हसतात, हस्तांदोलन करतात. चांगल्या लोकांना 'कामेराड' (मित्र) म्हणतात. त्यांनी अजून जिवंत असावे – बहिष्कृत म्हणून नव्हे, तर सन्मान्य नागरिक म्हणून – त्यांनी केलेल्या पाशवी कृत्यांनी पूर्ण देशाचे नाव कायमचे बदनाम करून जगावे, हे खरे अपयश आहे आणि हे माझे, तुमचे, आपणा सर्वांचे अपयश आहे, घोर अपयश आहे.

शेवटी जसा काळ गेला तसा मी देवावर पुन्हा प्रेम करू लागलो आणि त्याने घालून दिलेल्या नीतिनियमांच्या विरुद्ध ज्या अनेक गोष्ट मी केल्या होत्या त्याबद्दल त्याची क्षमा मागू लागलो.

शोमा इस्राएल, अदोनाय एलोहेनू, अदोनाय एहाद...

(ओ इस्राईल, ऐक : प्रभू आमचा देव आहे, प्रभू एकच आहे...)

डायरीच्या पहिल्या वीस पानांमध्ये टाउबरने हॅम्बुर्गमधील त्याचा जन्म आणि बालपण, त्याचे कामगार वर्गातील; पण युद्धात पराक्रम गाजवलेले वडील, हिटलर १९३३ मध्ये सत्तेवर आल्यावर लवकरच त्याच्या आई-वडिलांचा झालेला अंत याविषयी लिहिले होते. १९४० च्या जवळपास,

आर्किटेक्ट म्हणून काम करत असताना इस्थर नावाच्या मुलीशी त्याचे लग्न झाले आणि १९४१ पर्यंत, त्याला काम देणाऱ्या माणसाच्या मध्यस्थीमुळे तो अटक होण्यापासून वाचला. अखेरीस एका ग्राहकाला बर्लिनला भेटायला गेला असताना त्याला अटक झाली. काही काळ एका स्थलांतरण छावणीत काढल्यावर त्याला पूर्वेकडे जाणाऱ्या गुरे वाहून नेणाऱ्या ट्रेनच्या एका बंद डब्यात इतर अनेक ज्यूंच्या समवेत कोंबण्यात आले.

ती आगगाडी अखेरीस कोणत्यातरी स्टेशनात येऊन केव्हा थांबली ते मला बरोबर आठवत नाही. मला वाटते, आम्हाला बर्लिनला त्या डब्यात कोंबल्यानंतर सहा दिवस आणि सात रात्री झाल्या असाव्यात. गाडी अचानक थांबली. फटीतून येणाऱ्या उजेडावरून ती दिवसाची वेळ असावी. थकवा आणि दुर्गंधी यांच्यामुळे माझे डोके गरगरत होते.

बाहेरून आरोळ्या आणि बोल्ट सरकवल्याचे आवाज ऐकू आले आणि दारे उघडली गेली. मी नेहमी पांढरा शुभ्र शर्ट आणि इस्त्री केलेल्या पँटमध्ये असायचो. आता मी कसा दिसत होतो ते मला कळत नव्हते, हे बरे झाले. (टाय आणि कोट मी कधीच काढून टाकले होते.)

झगझगीत सूर्यप्रकाश डब्यात आल्याबरोबर सर्व जण डोळे झाकत वेदनांनी किंचाळू लागले. दरवाजा उघडतोय असे दिसताच मी डोळ्यांना इजा होऊ नये म्हणून ते घट्ट मिटून घेतले. आत डांबलेल्या माणसांच्या रेट्यामुळे अर्धेअधिक लोक प्लॅटफॉर्मवर कोसळून त्यांचा दुर्गंधीयुक्त ढीग झाला. मी मागे आणि दरवाजापासून एका कडेला असल्यामुळे वाचलो. उजेड सहन होत नसूनही मी डोळे किलकिले करण्याचा धोका पत्करला आणि न धडपडता प्लॅटफॉर्मवर उतरलो.

दुष्ट चेहऱ्याचे क्रूर एस.एस. गार्ड न समजणाऱ्या भाषेत ओरडत तिरस्कार दर्शवत थोड्या अंतरावर उभे होते. डब्यात खाली एकतीस माणसे पडलेल्या आणि तुडवलेल्या स्थितीत होती. ती पुन्हा कधीच उभी राहणार नव्हती. उरलेली उपाशी, अर्धआंधळी, घामेजलेली, कपड्यांची लक्तरे झालेली आणि प्रचंड दुर्गंधी येणारी माणसे प्लॅटफॉर्मवर धडपडत उभी राहू लागली. तहानेने आमच्या कोरड्या पडलेल्या, फुगलेल्या आणि काळ्या पडलेल्या जिभा टाळूला चिकटल्या होत्या.

प्लॅटफॉर्मवर बर्लिनहून आलेल्या चाळीस डब्यांतून आणि व्हिएन्नाहून आलेल्या अठरा डब्यांतून अशाच प्रकारे माणसे बाहेर पडत होती. त्यातील अर्धी स्त्रिया आणि मुले होती. अनेक स्त्रिया आणि मुले विवस्त्रावस्थेत, विष्टेने लडबडलेली आणि आमच्याचसारख्या स्थितीत होती. धडपडत प्लॅटफॉर्मवर येणाऱ्या काही स्त्रियांच्या बाहूंमध्ये त्यांच्या मुलांचे मृतदेह होते.

प्लॅटफॉर्मवर इकडून तिकडे धावणाऱ्या शिपायांनी आम्हाला दंडुके मारत, ढोसत जरा रांगेत उभे केले आणि गावातून चालत नेले. पण गाव कोणते होते? आणि ते कोणत्या भाषेत बोलत होते? नंतर मला समजले की ते गाव 'रिगा' होते आणि ते एस.एस. गार्ड स्थानिक लटवियन होते. जे जर्मनीतील एस.एस.एवढेच कट्टर ज्यू द्वेष्टे होते, पण बुद्धीने बरेच कमी, मनुष्यदेहातील जनावरे असे होते.

गार्ड्सच्या मागे जरा दबून उभ्या राहिलेल्या मळकट शर्ट आणि स्लॅक्समधील माणसांचा जथा उभा होता. त्यांच्या छातीवर आणि पाठीवर काळ्या कापडाचा तुकडा शिवलेला होता आणि त्याच्यावर मोठ्या आकारात 'J' हे अक्षर होते. ही वसाहतीतील एक विशेष तुकडी होती. त्यांना गाडीच्या सर्व डब्यांमधील प्रेते काढून गावाबाहेर नेऊन पुरण्याचे काम होते. ह्या तुकडीवरसुद्धा पाच-सहा जणांचा पहारा होता. त्यांच्याही छातीवर आणि पाठीवर J अक्षर होते, पण त्यांच्या बाहीवर एक पट्टा होता आणि हातात एक जाडजूड दंडुका. ते होते ज्यू कापो (ज्यू पोलीस). त्यांना ते करत असलेल्या कामाबद्दल इतरांपेक्षा जरा चांगले अन्न मिळत असे.

काही जर्मन एस.एस. अधिकारी स्टेशनच्या इमारतीच्या सावलीत उभे होते. माझे डोळे उजेडाला जरा सरावल्यावर ते मला दिसले. त्यातील एक जण लाकडाच्या खोक्यावर उभा राहून डब्यांमधून बाहेर पडणाऱ्या हजारो मानवी सांगाड्यांकडे बघत होता. त्याच्या चेहऱ्यावर समाधानाची छटा असलेले पुसट स्मित होते. तो हातातील चामड्याचा चाबूक त्याच्या उजव्या पायातील जॅकबुटावर हलकेच आपटत होता. त्याच्या अंगावर काळ्या आणि रुपेरी रंगातील विजेसारखी दिसणारी एस.एस. अक्षरे असलेला हिरवा गणवेश होता आणि तो जणू काही त्याच्यासाठीच शिवला असावा इतका 'चपखल' बसला होता. त्याच्या कॉलरच्या उजव्या टोकावर 'वाफेन एस.एस.'चे विजेसारखे चिन्ह

दुसरी आवृत्ती

भारतीय गणिका



लेखक

डॉ. सुरेश रघुनाथ देशपांडे

किंमत : २००/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

अंग देशाच्या राजाकडून ब्राह्मणांचा अवमान झाल्याने समस्त ब्रह्मवृंद देश सोडून गेला; त्यामुळे राज्यात अवर्षण पडले. ऋश्यशृंग देशात येतील तर हे अवर्षण दूर होईल, असे इंद्रांनी अंग देशाचे राजे लोमपाद यांना सांगितले. लोमपादांनी काही गणिकांना पाठवून ऋश्यशृंग यांस आपल्या राज्यात आणले. त्याबरोबर भरपूर पर्जन्यवृष्टी होऊन राज्यातले अवर्षण दूर झाले; त्यामुळे कृतज्ञ होऊन लोमपादांनी आपली शांता नामक कन्या (वास्तविक ही दशरथाची पुत्री आहे.) ऋश्यशृंगास दिली. एक पुत्र होईपर्यंत ऋश्यशृंग अंग देशात राहिले. तदनंतर शांतेसह ते आपल्या आश्रमात परतले.

होते. डाव्या टोकावर त्याचा 'कॅप्टन' हा हुद्दा दाखवणारे चिन्ह होते.

तो उंच आणि सडपातळ होता, फिकट सोनेरी केस, निळे डोळे. मला नंतर समजले की, तो विकृत मनोवृत्तीचा होता. त्याला दोस्त राष्ट्रांच्या अधिकाऱ्यांसह सर्व जण 'रिगाचा खाटीक' म्हणायचे. एस.एस. कॅप्टन एडवर्ड रोशमनचे मला झालेले ते पहिले दर्शन....

२२ जून, १९४१ रोजी पहाटे पाच वाजता, लष्कराच्या तीन भागांमध्ये विभागलेल्या १३० तुकड्यांनी रशियाची सीमा ओलांडून आक्रमणाला सुरुवात केली. सेनेच्या प्रत्येक विभागाच्या मागे एस.एस. मारेकरी पथके होती. हिटलर, हिमलर आणि हेड्रिचने त्यांना, सेना जो प्रदेश पादाक्रांत करेल त्यातील कम्युनिस्ट पदाधिकारी आणि खेड्यात राहणाऱ्या ज्यू लोकांचा 'निकाल' लावणे आणि शहरांमधील वसाहतींमध्ये राहणाऱ्या ज्यूंना नंतर 'विशेष वागणूक' देण्यासाठी ताब्यात घेणे, ह्या जबाबदाऱ्या दिलेल्या होत्या.

सेनेने लटवियाची राजधानी रिगावर १ जुलै, १९४१ ला ताबा मिळवला आणि दोन आठवड्यांत एस.एस. कमांडो तिथे येऊन पोहोचले. एस.एस.च्या एसडी आणि एसपी विभागाच्या पहिल्या तुकड्या रिगात १ ऑगस्ट, १९४१ ला पोहोचून स्थिरावल्या आणि 'ओस्टलँड' (जर्मनीने व्यापलेल्या तीन बाल्टिक देशांचे त्यांनी ठेवलेले नवे नाव) 'ज्यू-मुक्त' करण्याचे काम त्यांनी ताबडतोब सुरू केले.

त्यानंतर जर्मनी आणि ऑस्ट्रियामधील ज्यूंसाठीसुद्धा रिगा हाच मृत्यूच्या वाटेवरील शेवटचा कॅम्प करावा, असे बर्लिनमध्ये ठरवण्यात आले. १९३८ मध्ये ३ लाख २० हजार जर्मन ज्यू आणि १ लाख ८० हजार ऑस्ट्रियन ज्यू, म्हणजे एकूण पाच लाख ज्यू होते. जुलै १९४१ पर्यंत त्यापैकी हजारो ज्यूंचा जर्मनी आणि ऑस्ट्रियातील साकेन हॉयसेन, माउथ हाउसेन, रावेन्स्ब्रुक, डचाऊ बुकेनवॉल्ड, बेल्सेन आणि थेरेझिन्स्टाट येथील छळ छावण्यांमध्ये 'निकाल लावण्यात' आला. पण ह्या छावण्यांमध्ये आता फार गर्दी होत होती आणि उरलेल्या ज्यूंना खतम करण्यासाठी पूर्वेकडचे फार माहीत नसलेले प्रदेश सोयीचे होते. ऑश्विट्स, ट्रेब्लिंका, बेल्झेक, सोबीबोर, शेतम्नो आणि मैदानेक येथे अस्तित्वात असलेल्या मृत्युछावण्या (एक्स्टर्मिनेशन कॅम्प) वाढवण्याचे किंवा नव्या छावण्या स्थापन करण्याचे

काम सुरू करण्यात आले. पण त्या तयार होईपर्यंत शक्य तितक्या ज्यूंना मारून टाकण्यासाठी किंवा ठेवण्यासाठी जागेची आवश्यकता होती. त्यासाठी रिगाची निवड झाली.

१ ऑगस्ट, १९४१ ते १४ ऑक्टोबर, १९४४ ह्या काळात जवळ-जवळ दोन लाख जर्मन आणि ऑस्ट्रियन ज्यू रिगाला पाठवण्यात आले. तिथे ८० हजार मेले आणि १ लाख २० हजार जणांना दक्षिण पोलंडमधील वर उल्लेखलेल्या मृत्यू छावण्यांमध्ये पाठवण्यात आले. त्यापैकी ४०० जण जिवंत राहिले; पण त्यातील अर्धे स्टुटहोफला किंवा मॅगडेबर्गच्या 'डेथ मार्च'मध्ये मेले. टाउबरची आगगाडी राईश जर्मनीतून रिगाला १८ ऑगस्ट, १९४१ ला दुपारी ३.४५ला पोहोचलेली पहिली गाडी होती.

रिगामधील ज्यू वसाहत ही शहराचाच भाग होती आणि रिगामधील ज्यू तिथे राहत असत. मी तिथे पोहोचलो तेव्हा दोन-तीनशे ज्यूच उरले होते. दोन आठवड्यांतच रोशमन आणि त्याचा साहाय्यक क्राऊस यांनी हुकमाप्रमाणे त्यांनाही मारून टाकले होते.

ज्यू वसाहत शहराच्या उत्तर सीमेवर होती, तिच्या उत्तरेला मोकळा प्रदेश होता. वसाहतीच्या दक्षिणेला भिंत होती आणि इतर तीन बाजूंना काटेरी तारांची कुंपणे होती. वसाहतीत येण्या-जाण्यासाठी उत्तरेच्या कुंपणात एकमेव दरवाजा होता. त्याच्या दोन्ही बाजूंना टेहळणी मनोरे होते आणि त्यात लटवियन एस.एस.चे सैनिक पहाऱ्यावर असत. ह्या गेटपासून वसाहतीच्या मधोमध दक्षिण भिंतीपर्यंत जाणारा एक सरळ रस्ता होता. त्याचे नाव 'मासे काल्नू इमेला', म्हणजे 'टेकडीवरील रस्ता' असे होते. ह्या रस्त्यावर उत्तरेच्या गेटकडे तोंड करून उभे राहिले असता उजव्या बाजूला ब्लेक प्लाट्झ उर्फ 'टिन चौक' होता. तिथे आज ज्यांना मारून टाकायचे त्यांची निवड करणे, रोजची हजेरी, गुलाम मजुरांच्या तुकड्या निवडणे, फटक्यांच्या शिक्षेची अंमलबजावणी करणे आणि फाशी देणे अशा प्रकारची कामे होत असत. चौकाच्या मधोमध आडव्या तुळईला असलेल्या आठ हुकांना टांगलेले दोराचे गळफास वाऱ्यावर झुलत असत. त्यांना रोज रात्री कमीतकमी सहा जण आणि अनेकदा आठ-आठच्या फासांवर अनेक तुकड्या लटकवल्यावरच रोशमनला दिवसाचे काम केल्याचे

समाधान लाभत असे.

ती पूर्ण वसाहत दोन चौरस मैलांपेक्षा मोठी नसेल. तिच्यात एके काळी १२,००० ते १५,००० लोक राहत होते. आम्ही पोहोचण्यापूर्वी रिगातील ज्यूंनी, निदान जे दोन-एक हजार उरले होते त्यांनी, भिंतींचे काम पूर्ण केले होते. त्यामुळे आमच्या जथ्यात आलेल्या ५,००० पुरुष, स्त्रिया आणि मुलांसाठी जागा ऐसपैस होती. पण आमच्यानंतर रोज एकामागून एक जथे येतच राहिले आणि आमच्या भागातील लोकांची संख्या तीस-चाळीस हजारांवर पोहोचली. मग येणाऱ्या जथ्यातील लोकांना जागा व्हावी म्हणून आधीच्या लोकांपैकी नवीन आलेल्यांच्या संख्येइतक्या लोकांना मारून टाकावे लागत होते. तसे केले नसते तर अति गर्दीमुळे आमच्यातील जे कामगार कैदी होते ते आजारी पडले असते आणि ते रोशमनला चालणार नव्हते.

त्यामुळे पहिल्या दिवशी आम्ही सर्वांत चांगली घरे निवडून एका खोलीत एक असे आणि पांघरायला पडदे आणि कोट घेऊन खऱ्या पलंगांवर झोपलो. पोटभर पाणी पिऊन आल्यावर माझा शेजारी म्हणाला की, कदाचित आपल्याला भीती वाटली होती तेवढे वाईट दिसत नाहीये. पण आम्हाला अजून रोशमनचा अनुभव यायचा होता...

जसा उन्हाळा संपून वसंत सुरू झाला आणि मग वसंत संपून हिवाळा सुरू झाला तशी वसाहतीतील स्थिती अधिकाधिक खराब होत गेली. रोज सकाळी वसाहतीतील सर्वांना – यात मोठ्या संख्येत पुरुषच असत, कारण काम करायला निरुपयोगी म्हणून स्त्रिया आणि मुलांना रिगाला पोहोचताच मोठ्या प्रमाणात मारून टाकले जायचे – लटवियन गार्ड बंदुकीच्या दस्त्याने ढोसत-ढकलत टिन चौकात गोळा करून हजेरी घ्यायचे. नावे घेतली जायची नाहीत, नुसती संख्या मोजली जायची आणि मग आमचे अनेक कार्यगटांमध्ये विभाजन केले जायचे. जवळ-जवळ सर्वांना – पुरुष, बायका, मुले – सभोवतीच्या प्रदेशातील कारखान्यांमध्ये १२ तास काम करण्यासाठी बाहेर काढले जायचे. मी सुरुवातीला सुतार असल्याचे सांगितले होते – खरे म्हणजे मी आर्किटेक्ट होतो आणि सुतारकाम कधीच केले नव्हते; पण बघून त्या कामाची मला कल्पना होती. सुतारांची गरज नेहमीच असणार असा मी केलेला अंदाज बरोबर होता. मला जवळच्या एका कारखान्यात कामाला पाठवण्यात आले; त्या कारखान्यात पाईनच्या झाडांपासून फळ्या बनवल्या जात आणि त्यांचा उपयोग सैनिकांसाठी

घरे बांधायला करत.

धडधाकट माणसाच्याही कमरेचा काटा ढिला व्हावा इतके काम असे. शिवाय, उन्हाळा असो की हिवाळा, आम्हाला लटवियाच्या किनाऱ्याजवळच्या सखल भागात, दमट हवेत काम करावे लागत होते. त्यामुळे एकंदरीतच तब्येत खराब होत असे.

आमचे जेवण-खाण म्हणजे सकाळी कामावर जायच्या आधी देण्यात येणारे, किंचित रंग असलेले अर्धा लिटर पाणीवजा सूप – कधी-कधी त्यात बटाट्याचा लहान तुकडा काळ्या ब्रेडच्या एका स्लाईसबरोबर असे. सकाळसारखेच पुन्हा अर्धा लिटर सूप संध्याकाळी.

बाहेरून छावणीत खाद्यपदार्थ आणणे हा भयंकर मोठा गुन्हा होता आणि तो करणाऱ्याला संध्याकाळच्या हजेरीच्या वेळी टिन चौकात सर्वांच्या समोर फाशी दिले जायचे. तरीही, जिवंत राहायचे असेल तर तो धोका पत्करावाच लागायचा.

रोज संध्याकाळी कैद्यांच्या रांगा गेटमधून आत येत तेव्हा रोशमन आणि त्याचे विश्वासू शिपाई गेटपाशी उभे राहत आणि मधूनच एखाद्याला तपासत. ते कोणाही पुरुष/स्त्री/मुलाला ओरडून बाजूला बोलवायचे आणि सर्व कपडे काढायला सांगायचे. जर का एखादा बटाटा किंवा ब्रेडचा तुकडा असे काही सापडले तर त्याला तिथेच थांबवून घेत. इतर कैदी हजेरीसाठी टिन चौकात जात.

सर्व कैदी जमले की, रोशमन छाती पुढे काढून, सावकाश पावले टाकत रस्त्यावरून येत असे. त्याच्या मागे इतर एस.एस. गार्ड आणि सापडलेले दुर्दैवी कैदी असत. त्यांच्यापैकी जे पुरुष असत, ते सर्व कैद्यांची मोजणीवजा हजेरी पुरी होईपर्यंत फाशीच्या चौथऱ्यावर चढून गळ्याभोवती फास असलेल्या स्थितीत खुर्चीवर उभे राहत. मग रोशमन त्यांच्या चेहऱ्यांकडे बघत त्यांच्या पुढे येऊन प्रत्येकाच्या पायाखालची खुर्ची लाथेने उडवून टाकी. मरणाऱ्या कैद्याला आपला चेहरा दिसावा यासाठी त्याला हे त्यांच्या पुढून करायला आवडत असे. कधी-कधी तो खुर्चीला लाथ मारायचा अभिनय करायचा आणि शेवटच्या क्षणी पाय मागे घ्यायचा. खुर्चीवरील माणसाला आपण फासाला लटकत आहोत असे

वाटून तो थरथर कापायचा आणि मग पायाखाली खुर्ची अजून आहे, हे त्याच्या लक्षात यायचे. ही सर्व 'गंमत' बघत रोशमन खो-खो हसायचा.

फासावरच्या कैद्यांपैकी कोणी देवाची प्रार्थना करीत तर कोणी दयेची याचना करीत. रोशमनला ती ऐकायला आवडायचे. आपण थोडे बहिरे आहोत असे ढोंग करून तो कानामागे हात धरून त्या कैद्याला 'काय म्हणालास? जरा मोठ्याने बोल' म्हणून सांगायचा. मग कैद्याच्या पायाखालची खुर्ची – ते खोकेच असायचे – उडवून तो त्याच्या जवळच्या शिपायांकडे वळून 'मला आता ऐकण्याचे यंत्र आणायलाच हवे' असे म्हणायचा.

थोड्याच दिवसांत रोशमन म्हणजे मूर्तिमंत दैत्यच आहे, अशी आम्ही मनाशी खूणगाठ बांधली. त्याच्या डोक्यातून नाना विकृत कल्पना निघायच्या.

जर कोणी स्त्री कैदी छावणीत येताना काहीतरी खायचा पदार्थ लपवून आणताना पकडली गेली तर प्रथम तिला इतरांना फाशी देताना बघायला लावायचे – विशेषत: त्यांच्यात तिचा नवरा किंवा भाऊ असेल तर. मग रोशमन तिला चौथऱ्यावर गुडघे टेकून बसायला लावी आणि मग छावणीतील न्हाव्याकडून तिचे डोके तासले जायचे.

हजेरी संपल्यावर कुंपणाच्या बाहेर असलेल्या दफनभूमीवर नेऊन तिला एक उथळ खड्डा खणायला लावायचे, नंतर त्या खड्ड्याच्या कडेला गुडघे टेकून बसायला लावायचे आणि मग रोशमन किंवा त्याचा शिपाई मागच्या बाजूला, तिच्या कवटीच्या खाली गोळी झाडायचे. ह्या हत्या कोणाला बघू दिल्या जात नसत; पण तरी लटवियन गार्ड्सकडून समजायचे. कधी कधी रोशमन त्या स्त्रीच्या कानाजवळून गोळी झाडायचा, त्या धक्क्याने ती त्या उथळ थडग्यात पडायची, तिला पुन्हा उठून पूर्वीसारखे बसायला लावले जायचे. कधी-कधी तो रिकाम्या पिस्तुलाने 'क्लिक' करायचा आणि त्या स्त्रीला आपल्याला गोळी लागली, असे वाटायचे. लटवियन गार्ड राक्षसच होते; पण तेही रोशमनच्या पुढे फिके पडत...

TBC च्या सभासदांना निम्म्या किमतीत उपलब्ध

◆

अतरापी

मूळ गुजराती लेखक
ध्रुव भट्ट

अनुवाद
सुषमा शाळिग्राम

किंमत : १६०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

तशी सकृत्दर्शनी ही दोन भावांची-कुत्र्यांची-कथा... एक भाऊ स्वतंत्र विचारांचा... त्याचं आयुष्य एक खळाळता प्रवाह असतो; नात्यांना, विकारांना न जुमानणारा. आयुष्य समरसून पण अलिप्तपणे जगणारा... दुसरा भाऊ सरळमार्गी आयुष्य जगणारा... नातेसंबंध जपणारा; रूढी, परंपरा, नीतिनियम यांचं पालन करणारा... आध्यात्मिक विचारांचा... त्या भावांचा जन्मापासून मृत्यूपर्यंतचा प्रवास ही 'अतरापी'ची कहाणी. हे भाऊ जन्माला येणाऱ्या जीवांचं प्रातिनिधिक रूपक आहे. ओघवत्या, रसाळ शैलीतली ही 'वेगळी' कादंबरी वाचकांना अंतर्मुख व्हायला, विचार करायला प्रवृत्त करते.

सृष्टिकर्त्याच्या इच्छेने जन्म घेणारा जीव असतो परका...
तिऱ्हाईत... एक अतरापी!

पुस्तक परिचय

घाचर घोचर

विवेक शानभाग हे नावाजलेले कन्नड लेखक आहेत. त्यांचे पाच कथासंग्रह, तीन कादंबऱ्या व दोन नाटकं प्रकाशित आहेत. त्यांनी दोन संग्रहांचेही संपादन केले आहे. देशकालया साहित्यविषयक नियतकालिकाचे त्यांनी २००५ ते २०१२ या काळात प्रकाशन व संपादन केले आहे. शानभाग यांच्या साहित्याचे अनेक भारतीय भाषांमध्ये अनुवाद प्रसिद्ध करण्यात आले आहेत. घाचरगोचर ही त्यांची कादंबरी भारत/इंग्लंड/ अमेरिकेत इंग्रजीत प्रसिद्ध झाली आहे. यू. आर. अनंतमूर्ती यांच्या 'Hindutva or Hind Swaraj' या पुस्तिकेचा त्यांनी इंग्रजीत सहअनुवाद
केला आहे. शानभाग यांचे लेखन ग्रँटा, सेमिनार, इंडियन लिटरेचर आणि आउट ऑफ प्रिंट या नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाले आहे. आयोवा विद्यापीठातीलआंतरराष्ट्रीय लेखन उपक्रमात ते २०१६ मध्ये सहभागी झाले होते. विवेक शानभाग व्यवसायाने अभियंता असून त्यांचे वास्तव्य बंगळुरूमध्ये आहे.



लेखक
विवेक शानभाग

अनुवाद
अपर्णा नायगांवकर

मुंग्यांचा बेसुमार त्रास असलेल्या घरातून मध्यमवर्गीय, सुरक्षित घरात जाण्याचं एका एकत्र कुटुंबाचं स्वप्न साकार होतं; पण नवीन घरात गेल्यावर भावनिक समीकरणं बदलतात.

पूर्वी खऱ्या अर्थानं एकत्र नांदणारं हे कुटुंब भावनिकदृष्ट्या दूर व्हायला लागतं. या कादंबरीच्या अस्वस्थ निवेदकाची बायको त्याला सोडून निघून जाते. या सगळ्या बदलत्या परिस्थितीकडे तो हतबुद्धपणे पाहत राहतो. पैशाची अभिलाषा कुटुंबनाशाला किंवा नात्यांमधील दुराव्याला कशी कारणीभूत ठरते, त्याचं हे प्रातिनिधिक चित्र

'घाचर घोचर'मधून प्रभावीपणे समोर येतं. अस्वस्थ निवेदकाच्या प्रवाही निवेदनातून 'घाचर घोचर' या शब्दाचा अर्थ उलगडत जातो.

आमच्या घरात असा एक सुरुंग होता, की तो नेहमी स्फोट होण्याची वाट पाहत असायचा. हा सुरुंग म्हणजे मालती. आमच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर या सुरुंगाला पैशांची धुंदी चढू लागली. त्या वेळी ती कॉलेजात शिकत होती. आतापर्यंत घरातल्या पैशाच्या व्यवहाराची मूठ आवळलेली असायची. ती आता सैल झाली. छोटा-मोठा खर्च करतानाही विचार करावा लागायचा, व्यवस्थित हिशेब ठेवायला लागायचा, त्यात आता ढिलाई होऊ लागली. एकमेकांना न सांगताच आम्ही पैसे खर्च करू लागलो. आपण करत असलेल्या खर्चामुळे घरात कोणाला काही तरी कमी पडेल, ही भावना नाहीशी झाली. आता खर्च करणं ही वैयक्तिक बाब झाली. अप्पांचं घरातल्या खर्चावरचं नियंत्रण पूर्वीसारखं राहिलं नव्हतं. इतकंच नव्हे, तर आमचं आमच्यावरचं नियंत्रणही सुटत चाललं होतं.

आम्ही नव्या घरात आल्यावर जणू नवीन आयुष्यात प्रवेश केला. आता पूर्वीसारखं एकमेकांवर अवलंबून असणं कमी झालं. नवीन घराबरोबरच खरेदीच्या संधी मिळाल्यावर खर्च करण्याचा हव्यास पराकोटीला पोचला. पहिले काही आठवडे खरेदीच खरेदी चालली होती. चिक्कप्पाच्या, घरासाठी सामान खरेदी करण्याविषयीच्या सूचना आई व मालती तंतोतंत पाळत होत्या व त्याच्या मित्राच्या दुकानात जाऊन दिसेल ते खरेदी करत होत्या. दिवाणखान्यासाठी खरेदी केलेले कोच अगदीच बेढब दिसत होते.

एकमेकांशी ताळमेळ नसलेल्या वस्तूंची घरात गर्दी झाली होती. टीव्ही आला. पलंग, ड्रेसिंग टेबलने खोल्या भरून गेल्या. घरात आणलेल्या काही काही वस्तू तर नेहमी वापरण्याजोग्या नव्हत्याच. त्यामुळे त्या वस्तूंबद्दल फारशी जवळीक, आपलेपणा वाटत नव्हता. आम्ही काहीसे बेपर्वा झालो होतो. आमच्या मनाच्या संभ्रमित अवस्थेला कधी कधी मालती प्रत्यक्ष रूप देत असे. तिच्या एकेका कृतीतून ते व्यक्त होत असे. तिचा आरडाओरडा, भांडखोरपणा, तिच्या वागण्यातला दिमाख या सगळ्यातून आमच्या नवीन जीवनशैलीचा प्रत्यय कोणत्या न कोणत्या रूपात समोर येऊ लागला होता. मालतीच्या वागण्यावर पूर्वीसारखाच अंकुश ठेवण्याचा प्रयत्न आई करत असे. तिची पुस्तकं, बॅग गुपचूप तपासत असे. आता मालती आपल्या बंडखोरपणातून, बोलण्याच्या पद्धतीतून घरातील अलिखित असे नियम धुडकावून लावत होती, हे स्पष्ट दिसू लागलं होतं. हॉटेलमध्ये जाऊन खाणं सुरू केलं ते मालतीनंच. एकदा असं खाऊन घरी आल्यावर तिनं शास्त्रापुरते दोन घास खाल्ले व त्यावरून आई व

तिच्यात बोलाचाली झाली होती.

यापूर्वी आम्ही अगदी क्वचित हॉटेलात जायचो. पंधरा दिवसांतून एखाद्या रविवारी आम्ही सगळे हॉटेलात जायचो. मसाला डोसा खाण्याकरिता मालती अधीर झालेली असायची. रविवारी दुपारच्या जेवणानंतर छोटीशी डुलकी घ्यायची अप्पांना सवय होती. आम्ही त्यांच्या उठण्याची वाट पाहत बसायचो. ते उठले की बाहेर जाण्यासाठी आम्ही त्यांना खूप घाई करायचो. अप्पांचं बजेट डोसे खाऊ घालण्याइतकंच असायचं व त्यानुसार आम्ही फक्त डोसे खायचो. आम्ही कोणीच कॉफी प्यायचो नाही. अप्पा व आई कॉफी घ्यायचे, तीही एक कॉफी दोघांत. दुसरा पदार्थ आम्ही क्वचितच घ्यायचो. आणि तो घेतला तर अप्पा कॉफी घ्यायचे नाहीत. हॉटेलमधले पदार्थ इतके रुचकर असायचे, की कितीही प्रमाणात खायला पोटात जागा असायची. खाऊन झाल्यावर प्लेटमध्ये एक कणही शिल्लक नसायचा. प्लेट एकदम चकाचक. चटणीसुद्धा चाटून पुसून संपवायचो आम्ही.

त्या दिवशी मालती बाहेरून खाऊन आली असावी असा आईला संशय आला व तिने मालतीला हळूच त्याविषयी विचारलं. त्यावर ''हो, पोटभर खाऊन वर कॉफीसुद्धा पिऊन आले आहे,'' असं मालतीनं आईच्या अंगावर ओरडून सांगितलं. तिला एक विचारलं तर दहा गोष्टी ऐकाव्या लागत. तिच्याशी बोलताना, ती आपल्या बोलण्यावर काय काय बोलेल याची भीतीच वाटायची. अनिता माझी बायको म्हणून या घरात येण्यापूर्वी, मालतीसमोर बोलण्याची हिंमत आमच्या घरात कोणाजवळच नव्हती. काहीही बोललं तरी त्यातून भलताच अर्थ काढून ती भांडण सुरू करायची. सहजपणे 'कुठे गेली होतीस?' असं विचारलं तरी पुरे. त्यावर ''या घरात कोणालाच विचारला जात नाही असा प्रश्न मलाच का विचारता? तुम्ही तुम्हाला हवं ते करता तेव्हा तुम्हाला कोणी प्रश्न विचारतं का? तुम्ही कुठे गेला होतात, असं मी विचारते का कधी? माझ्या बाबतीत मात्र कोणाचा विश्वास नाही.'' बोलणं असं कुठून कुठे न्यायची ती.

पैसा माणसाला खेळवतो असं म्हणतात, ते काही खोटं नाही. पैशाचं स्वतःचं असं अस्तित्व असतं. स्वतःची एक शक्ती असते. पैसे कमी असतील तर परिस्थिती आपल्या आवाक्यात असते. अतिरिक्त पैसे मिळू लागले की पैशाची ताकद आपल्यावर आक्रमण करायला लागते. पैसे आपल्याला वर उचलतात तसंच वेळ आली तर खाली आपटतात, वादळवाऱ्यात भिरकावून देतात.

मालतीच्या लग्नात आम्ही अगदी मोकळेपणानं पैसे खर्च केले. अर्थात ते कोणाच्या सांगण्यावरून नाही किंवा कोणाच्या दडपणामुळेही नाही. वादळात गेल्यावर आपण स्वतःला भिजण्यापासून थांबवू शकत नाही, तद्वत तो खर्च थांबवणं आम्हाला शक्य झालं नाही. सुमारे एक महिना चालू असलेल्या या खर्चिक कार्यक्रमात मुख्य पात्रं होती ती आई व मालती. आपल्याला काय काय हवं आहे हे त्यांचं त्यांनाच कळत नव्हतं. रोजच्या रोज खरेदी चालू होती. घरात असायच्या तेव्हा दागदागिने, साड्या यावर चर्चा करत असायच्या. लग्नाच्या दिवशी जेवणात काय काय पदार्थ ठेवावे ते ठरवायला आलेले लोक घाबरून जावेत इतके पदार्थ लग्नात केले होते. चिरोटे, फेण्या, जिलबी, पुरणपोळ्या अशी सगळे 'वा वा' म्हणतील ती पक्वान्नं, आणि नाव घ्यावं ती भाजी पानात हजर होती. लग्नाच्या दिवशी सगळे धार्मिक विधी उरकल्यावर शेवटच्या पंगतीला अगदी शेवटच्या पानावर अप्पा खाली मान घालून जेवायला बसले होते. त्यांच्याकडे पाहिल्यावर हे सगळं किती व्यर्थ आहे अशी जाणीव मनाला टोचू लागली. नानाविध पदार्थांनी भरलेल्या पानावर बसून अप्पा खिन्न मनःस्थितीत जेवत होते. जेवणं उरकल्यावर पाहुण्यांनी केलेली जेवणाची तारीफ ऐकता ऐकता आई तिथेच पंक्तीत थांबली. वधू-वरांनी तिच्याजवळ बसून एकमेकांना जिलबीचा घास भरवला व तिच्याबरोबर फोटो काढून घेतला. आईच्या अंगावर तेव्हा भरपूर दागिने होते.

मालतीच्या लग्नात झालेल्या खर्चाबद्दल मी असा वाकड्यात बोलतोय असं समजू नका; पण अप्पा जर त्या वेळी सेल्समनच असते, तर मालती आता आलेली आहे तशी सहा महिन्यांतच संसार सोडून माहेरी परत आली नसती, हे नक्की. पैशांच्या दिमाखामुळे, साध्या साध्या पण अपरिहार्य अशा गोष्टीही सहन करण्याची तिची शक्ती कमी झाली होती. मालतीचा नवरा विक्रम वाईट नव्हता. पहिल्यापहिल्यांदा छोटी-मोठी भांडणं झाल्यावर मालती इकडे माहेरी यायची; पण परत जायची. नंतर मात्र तिचा इकडचा मुक्काम वाढू लागला. विक्रम घरचं साड्यांचं दुकान सांभाळत होता. त्याला फक्त रविवार मोकळा असे. 'माझ्यासाठी मला हवा तेव्हा त्यानं वेळ काढला पाहिजे,' हा मालतीचा हट्ट. 'कायमच दुकान दुकान असं चाललेलं असतं,' अशी तिची तक्रार असायची. त्या दोघांमध्ये नेमकं काय झालं, ते कोणालाच नीटसं माहीत नव्हतं. पण तिच्या आदर्श संसाराच्या कल्पनेत कष्टाळू नवरा बसत नव्हता; आणि दुकान हेच त्याचं उत्पन्नाचं साधन होतं. एकूण काय, सुरुवातीला छोट्याछोट्या नाराजीतून सुरू

झालेल्या गोष्टी दोन वर्षांत त्याला सोडून देण्यापर्यंत पोचल्या. अप्पा-आई मालतीला घेऊन समेटाची बोलणी करायला त्यांच्याकडे गेले तेव्हा मीही त्यांच्याबरोबर होतो.

आम्ही त्यांच्याकडे गेलो ती रविवारची दुपार होती. बहुधा चारची वेळ असावी. त्या दिवशी वातावरण अगदी ढगाळ होतं. मालती तीन महिन्यांनी त्या घरी गेली होती. आम्ही त्यांच्या मोठ्या दिवाणखान्यात बसलो होतो. विक्रम नि त्याचे वडील आमच्याबरोबर हवापाण्याच्या कोरड्या गप्पा मारत होते. अर्थात मुख्य विषयाकडे कसं यावं, हे त्यांनाही कळत नव्हतं. मालतीची सासू स्वयंपाकघरात होती. मालती तिकडेच होती. अचानक तिकडून काचेच्या कपबाा फोडल्याचे आवाज येऊ लागले. त्या मागोमाग धुसफुसणारी मालती हॉलमध्ये घुसली. गुढग्याच्या दुखण्यामुळे थोडी लंगडत चालणारी तिची सासू, तिच्या पाठोपाठ तेथे आली.

''बघा, बघा काय केलंन ते. ही आली आणि चांगल्या टीसेटची वाट लावून टाकलीन. किती छान होता,'' असं म्हणू लागली. राग व असहायता यामुळे बोलताना ती थरथरत होती.

''तुम्हाला काय म्हणायचं आहे ते म्हणा,'' मालती चिडली होती.

''यात काय चूक आहे ते सांगा. म्हणे नवीन सेट कशासाठी आणला? आम्ही हा काही अपराध केलाय का? सांगा,'' सासूनं आवाज चढवला.

''माझ्या माहेरची माणसं आली असताना त्यांच्याकरीता नवीन कपबशा का नाही काढल्या? त्यांना काय जुने फुटके कप द्यायचे?'' मालती उसळून म्हणाली.

''आम्ही जुने फुटके कप कधीच वापरत नाही. नेहमीच्या वापराला चांगलेच कप आहेत. नवीन काढण्याची काय गरज होती, इतकंच माझं म्हणणं,'' सासू.

''तर मग तो नवीन सेट कुणालाच नको. म्हणून तर फोडून टाकला,'' मालतीने तिचा हटवादीपणा चालूच ठेवला.

तेव्हा 'आई-वडिलांनी हेच शिकवलं का?' असे शब्द तिच्या सासूच्या तोंडून बाहेर पडले. आपले आई-वडील तिथे बसलेले आहेत हे लक्षात न घेता बोलल्या गेलेल्या त्या शब्दांनी मालती बिथरली.

''हो, त्यांनी हेच शिकवलं. हवं तर त्यांना विचारा, इथेच आहेत ना ते? विचारून पाहा, विचारा,'' असं म्हणू लागली.

सगळं प्रकरण हाताबाहेर चाललं होतं. इतक्यात मालतीची सासू आई-

अप्पांना उद्देशून म्हणाली, ''बघताय ना, बघताय ना तुम्ही? अशा बाईबरोबर कसं काय जमवून घ्यायचं? एक बोललं तर ही दहा ऐकवते,'' असं म्हणून ती रडू लागली.

आता विक्रम चिडला. ''आई, तू कशाला रडतेस? ती काय आहे ते सगळ्यांसमोर आलं आहे ना? तिला खुशाल तिच्या घरी जाऊ दे.'' तो अतिशय शांतपणे बोलत होता. त्याच्या आवाजातील पुरुषी अहंकाराची झलक स्पष्टपणे जाणवत होती. मालतीचे सासरेही रागावले होते.

''आम्ही इतकी वर्षं संसार केला पण तिला कधी डोळ्यांतून पाणी काढू दिलं नाही. आता सून आल्यावर मात्र तिच्यावर अशी रडायची वेळ आली आहे.''

यावर मालती काय गप्प बसणार. ''हो, सगळ्याला कारण मीच आहे. तुम्ही सगळे मोठे सुसंस्कृत ना?'' मालती.

''संस्कार पैशांनी विकत घेता येत नाहीत; ते पहिल्यापासूनच असावे लागतात. पैसा आल्यावर चांदण्यातसुद्धा लोक छत्री घेऊन फिरतात, नाही का?'' सासू बडबडली. हे बोलणं आईला चांगलंच झोंबलं. ''हो बाई, आम्ही गरिबीत वाढलो आणि आता श्रीमंती आली आहे; पण म्हणून काही डोकी फिरली नाहीयेत आमची,'' आता आई वेड्यासारखं बोलू लागली.

आता पुढे बोलण्यात काहीच अर्थ नाही, असं सगळ्यांनाच वाटलं. आम्ही बाहेर पडलो. ते थांबा असं म्हणालेही नाहीत व आम्हाला निरोप द्यायला दारापर्यंत आलेही नाहीत. मालती तरातरा पुढे निघाली. तिच्या मागोमाग आम्ही चालत होतो. मला मालतीचं उद्धटासारखं वागणं अजिबात आवडलं नव्हतं. पण ती काही ऐकायच्या मनःस्थितीत कुठे होती? घडलेल्या या सगळ्या फार्समध्ये अप्पा एक अवाक्षरही बोलले नव्हते.

पुढच्याच रविवारची गोष्ट. मी दुपारचा सिनेमा पाहून घरी आलो तो हॉलमध्ये चिक्कप्पासह घरातली सगळी मंडळी बसली होती. सगळ्यांना असं एकत्र बसलेलं पाहून माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली.

अप्पा नि आई सोफ्यावर बसले होते. मालती समोर पाय पसरून खुर्चीवर बसली होती. सासरी असलेल्या तिच्या दागिन्यांबद्दल मालती बोलत होती. गेले काही दिवस ते मिळविण्यासाठी तिचे प्रयत्न चालले होते व आजच्या तिच्या बोलण्यावरून, तिच्या प्रयत्नांना यश आलं आहे, असं दिसत होतं.

मी आत आल्यावर, ''ये, तूच तेवढा नव्हतास.'' असं म्हणून चिक्कप्पानं

टेक मी होम

लेखक
रश्मी बन्सल

अनुवाद
सुनीति काणे



किंमत : १६०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

किरीट देशपांडे यांनी नागपुरात राहून आपलं व्यवसायाचं स्वप्न पूर्ण केलं... चंदूभाई विराणी यांनी राजकोटमधून सुरुवात करून 'ग्लोबल' उद्योग साकारला... दीपक दाधोटी यांनी बेळगावमधून घेतलेली 'उद्योग-भरारी' देश-विदेशांत पोहोचली... या सगळ्यांना हे जमलं; तर मग तुम्हाला का नाही जमणार? या पुस्तकात आहेत आपल्या मातीशी इमान राखत उद्योगांची उभारणी करणाऱ्या २० उद्योजकांच्या विलक्षण प्रेरक कहाण्या. भारतातल्या लहानशा खेड्यांमधून या उद्योजकांनी आपल्या उद्योगाची सुरुवात केली, आणि ते जागतिक स्तरावर नेले. विशेष म्हणजे त्यासाठी त्यांनी स्थानिक पातळीवरील गुणवान मंडळींच्या गुणांचाच कौशल्याने उपयोग करून घेतला, आणि नवीन रोजगारही निर्माण केला. त्यांनी सिद्ध केलं की, एक चांगला उद्योग उभारण्यासाठी तुम्ही मोठ्या शहरांमध्येच असलं पाहिजे असं काही नाही. त्यांनी दाखवून दिलं की, तुमच्याकडे योग्य दृष्टिकोन, ध्येयवेड आणि जिद्द असेल तर तुम्हीही यशस्वी उद्योजक होऊ शकता; तुम्हीही तुम्हाला हवं ते करू शकता; काहीतरी नवीन घडवू शकता; तुमचा स्वत:चा असा यशोमार्ग निर्माण करू शकता — हा मार्ग 'मायमाती'तून सुरू होणारा... 'ग्लोबल' आकाशाला गवसणी घालणारा...!

माझं स्वागत केलं. मी आल्यानंतर मालती सुरुवातीपासून काय काय झालं ते सांगू लागली.

''आज एक वाजता मी तिकडे गेले होते. मला माहीत होतं की, दोनच्या आत गेलं तर सगळी माणसं घरात भेटतील. चिक्कप्पाचा फोन आल्या आल्या बाहेर पडले. त्या घराच्या जवळ एक पार्क आहे ना, तिथं चिक्कप्पाचे सगळे मित्र थांबले होते. रवी त्यांचा लीडर होता. मी त्यांचे फोन नंबर घेतले व तिकडे गेल्यावर फोन करते असं त्यांना म्हणाले, तेव्हा ''ताई, तुम्ही मिस्ड कॉल द्या, एका मिनिटात आम्ही तिथे पोचतो,'' असं रवीनं सांगितलं. मी तिथे गेले आणि दाराची बेल वाजवली. सासूनं दार उघडलं. दारात मला पाहून, ''तुला घरात घेणार नाही, ओरडून अख्खी गल्ली गोळा करीन,'' असं म्हणून मिनिटभर ती दार अडवून उभी राहिली. मी 'करून बघा' असं म्हणत हातात फोन घेतला. दोन मिनिटांत एकापाठोपाठ एक असे सहा जण आले. सगळ्यात पुढे रवी होता. त्यांना पाहून घाबरून गेलेली सासू, 'हे सगळे कोण आहेत?' असं विचारू लागली. 'घाबरलात की काय? माझ्या चिक्कप्पाचे मित्र आहेत ते,' असं सांगून टाकलं. दारात उभ्या असलेल्या सासूला बाजूला ढकलून रवी आत आला. तेवढ्यात सासरे आणि विक्रम तिथे आले. ''हे कोण आहेत? हे सगळं काय चाललंय,'' असं माझ्याकडे पाहून विक्रम ओरडू लागला. बऱ्याच दिवसांत त्याचा राग पहिला नव्हता. त्यानं 'पोलिसांना फोन करतो,' असं म्हणताक्षणी रवीनं खाडकन त्याच्या कानाखाली वाजवली व त्याची बोलतीच बंद केली. आता घाबरून गेलेला विक्रम 'अंगाला हात लावू नका, सर' असं म्हणू लागला. रवीकडून फटका खाल्ल्यानं विक्रम त्याला सर म्हणत होता ते पाहून मला हसू येत होतं.

''माझं सोनं घेऊन जाण्याकरता आलेय. तुम्ही घेतलेलं आहे ते तुम्हीच ठेवा; पण माझं मात्र मला सरळपणे देऊन टाका,'' मी म्हटलं.

''काय, ताई काय सांगतेय ते ऐकू येतंय ना?'' असं म्हणून रवीनं एक मोठा चाकू बाहेर काढला आणि तिथेच टेबलवर ठेवला. बरोबरच्या दुसऱ्याने पुढचा दरवाजा बंद केला व त्याला आतून कडी घालून टाकली. मी बेडरूममध्ये गेले. कुलपं वगैरे सगळं जागच्या जागी होतं. सगळं सोनं एका डब्यात ठेवलेलं होतं. ते तसंच होतं. मी डबा घेऊन बाहेर आले. त्यातलं मंगळसूत्र व त्यांनी केलेल्या बांगड्या सासूच्या अंगावर फेकल्या. सासरे बिचारे खुर्चीवर शांतपणे बसलेले होते. रवीने जवळ जाऊन विक्रमला काही तरी सांगितलं. त्यानं 'सर,'

असं म्हटल्यावर मला हसू आवरेनासं झालं. समोरचं मी फेकलेलं मंगळसूत्र पाहून सासू विक्रमच्या तोंडाकडे पाहू लागली. मी विक्रमला म्हणाले, ''मी माझं सोनं तेवढंच नेते आहे. हवं तर बघून घे,'' असं म्हणून त्याच्यासमोर डबा धरला. त्यानं पाहिलंही नाही नि तो काही बोललाही नाही. नंतर मी तिथून बाहेर पडले. मी घरी आल्यानंतर रवीचा दोनदा फोन आला होता. तो थोडा वेळ तिकडे थांबला होता. चहा घेऊन निघाला. गोड बोलून सगळ्याचा चांगला शेवट करून आलो, असं म्हणत होता. मालती कथन करत होती. तिच्या बोलण्यावर थोडं थोडं हसून चिक्कप्पा तिला साथ देत होता असं मला वाटलं. तिचं शेवटचं वाक्य मात्र आईला आवडलं नाही. त्यांच्या घरी चहा प्यायलो ही काय फोन करून सांगण्यासारखी महत्त्वाची गोष्ट होती का?

''सगळं घेऊन आल्यावर संबंध तुटल्यातच जमा आहेत. आता असं घरात घुसून गोंधळ घालणं चांगलं नाही.'' अप्पांच्या या बोलण्यावर चिक्कप्पानं दिलेलं उत्तर काही सरळ नव्हतं. ते सगळे माझे दोस्त आहेत. त्यामुळे घरातल्या लोकांनीच तिथे जाऊन ते दागिने जबरदस्तीने परत आणले आहेत असंच समजा तुम्ही. अशी वसुली करणं हेच त्यांचं काम आहे. त्यांना रिकव्हरी एजंट असंच म्हटलं जातं. वसुली करणं, हा आजकालचा एक उद्योग बनलाय. तसं नसतं तर 'सोना मसाला' कंपनीचं येणं वसूल करण्याकरिता मला दारोदार भटकत बसावं लागलं असतं.

ही चर्चा अप्पांना रुचली नाही. ते उठून बाहेर गेले. बहुधा आईसुद्धा या गोष्टींशी सहमत नसावी. पण आतल्या आत कोलमडलेली ती, काही न बोलता बसून राहिली होती.

आजचा पेपर कुठे आहे, असं म्हणून पेपर शोधण्याचं निमित्त काढून चिक्कप्पा तेथून बाहेर पडला. मालतीच्या पाठोपाठ मीही तेथून काढता पाय घेतला. आपल्या खोलीत जाऊन मालतीनं दरवाजा लावून घेतला. त्या दारासमोरून मी जात असता आत ती ओक्साबोक्शी रडत आहे हे मला जाणवत होतं. घडलेलं सगळं तिच्या हाताबाहेरचं होतं, असं मला वाटलं. एखादी अदृश्य शक्ती, अहंकार ठासून भरलेल्या मालतीला, तिची जायची इच्छा नसलेल्या मार्गावर ढकलत आहे, असं मला वाटू लागलं. त्या वेळी आत जाऊन मालतीचं सांत्वन करायला हवं होतं, पण एकतर तिच्या अभिमानाला धक्का लागला असता व दुसरं कारण म्हणजे त्या घटकेला तिच्याजवळ काय बोलावं हेच मला कळत नव्हतं, त्यामुळे मी आत गेलोच नाही.

त्यानंतर मालती एकदाही सासरी गेली नाही. आईला तिचा संसार नीट व्हावा, असं वाटत होतं. माझ्या समजुतीप्रमाणे तिचं विक्रमवर प्रेम होतं. ती काय करत होती, कुठे जात होती याविषयी तिला विचारण्याची कोणाची हिंमत नव्हती. अलीकडे ती घरकामात आईला थोडीशी मदत करायची. कारण प्रत्येक गोष्टीत नाक खुपसल्याशिवाय तिला राहवत नसे. त्यातच अनिता आली. ती आल्यानंतर आपल्या अधिकाराला कुठे धक्का तर लागत नाहीये ना, या भीतीमुळे ती प्रत्येक ठिकाणी गरजेपेक्षा अधिक लक्ष घालू लागली होती. उद्योग नसेल तेव्हा मोबाइलवरून सतत मेसेज पाठवत राहायची. कधी कधी तर मध्यरात्री तिच्या खोलीतून फोनवर बोलण्याचा आवाज यायचा. इतक्या रात्री ही कोणाजवळ बोलत असेल? रवीजवळ? संशयानं भरलेलं माझं मन कल्पनेच्या भराऱ्या मारू लागायचं. कोणाच्याही नकळत ती विक्रमबरोबर तर फिरत नसेल ना, असंही मनात यायचं. कितीतरी वेळा ती सिनेमाला जायची. तिची मैथिली नावाची मैत्रीण होती. तिच्याबरोबर मालती हिंडत राहायची. हल्ली हल्ली ती कधी मैथिलीकडे राहायला जायची. तिच्याबरोबर मद्रासला, म्हैसूरला जाऊन यायची. मैथिली हे एक निमित्त होतं असा मला संशय होता. तिच्या नावाखाली ती दुसऱ्या कुणाबरोबर गाव भटकत रात्रीपर्यंत वेळ काढत असावी, असा माझा अंदाज होता. अर्थात हे जरी खरं निघालं असतं तरी मी काय करणार होतो? तिचं चित्त सैरभैर झालेलं होतंच; पण आमचीही स्थिती तशीच झाली होती की काय, असं कधी कधी मला वाटत असे. ती किती धाडसी झाली होती, किती तोंडाळ, भांडखोर झाली होती. आमच्या सहवासात घालवलेल्या त्या काळात ती एक गुणी, संस्कारी मुलगी होती. पण ते तिचे गुण आता कुठे नाहीसे झाले, याचं आश्चर्य वाटायचं.

जुन्या घरात असताना आम्ही दोघं मधल्या खोलीत झोपायचो. तिचं अंथरूण व माझं अंथरूण टी या इंग्लिश अक्षराच्या आकारात असायचं. कधी कधी झोप येत नसेल तेव्हा आम्ही गप्पा मारायचो. अगदी क्वचितच ती तिचं मन मोकळं करत असे, असं मला आठवतंय. तिच्या वर्गातल्या वंदना नावाच्या मुलीला तिची सावत्र आई शिळं अन्न खायला द्यायची, असं एकदा तिनं सांगितलं होतं. राग आल्यावर कधी कधी ती गरजेपेक्षा जास्त अन्न शिजवून, उरलेलं अन्न शिळं झाल्यावर, त्याला वास लागल्यावर हिला खायला द्यायची. खाल्लं नाही तर गोंधळ घालायची. तिचं वर्गातल्या रमेश कोळीवर प्रेम होतं. तिनं लिहिलेली पत्रं मालतीच त्याला नेऊन द्यायची. ती दोघं पुढे लग्न करणार

होती. अशी अनेक गुपितं ती मला सांगत असे. नवीन घरात आल्यावर प्रत्येकाला स्वतंत्र खोली मिळाली व अशा गप्पा अशक्य झाल्या. 'सोना मसाले' निर्माणच झाले नसते तर मालतीचं जीवन असं बदललं नसतं, असं अनेकदा माझ्या मनात येई.

अशा प्रकारे नवऱ्याचं घर सोडून माहेरी राहण्यात काय दुःख आहे, ते जिचं तिलाच माहीत. या प्रकरणात चूक कोणाचीही असेल, मालतीबद्दल आम्हा सगळ्यांनाच सहानुभूती होती. घरी येणारे नातलग, लग्नकार्याला गेल्यावर तिथे भेटणारी परिचित माणसं, आमच्या स्वाभिमानाच्या फुग्याला टाचणी लावण्यासाठी आतुर असलेले आमचे हितचिंतक, कार्यात आलेल्या मुली अशा किती तरी मंडळींच्या कुतूहलाची ती सावज बनत असे. कोणीही तिच्याजवळ बोलायला आलं, इतकंच काय तिच्याकडे सहज कोणी पाहिलं तरी त्यांच्या मनात तिच्याबद्दल काय भावना असतील याची कल्पना करता करता आम्ही अस्वस्थ व्हायचो. विक्रमच्या घरी जाऊन ती सोनं घेऊन आली, त्या घटनेनंतर ज्या बातम्या पसरल्या होत्या त्यावरून ती जणू फुलनदेवीचा अवतारच होती, असा सगळ्यांचा समज झाला असावा. तिनं पुढाकार घेऊन गुंडांना बोलावलं, तिनं दिलेल्या सूचनांप्रमाणे त्यांनी त्या घरात नासधूस केली, गोंधळ घातला अशा प्रकारच्या बातम्या पसरत होत्या. तिनं नवऱ्याच्या गळ्याशी चाकू धरला होता, असंही बोललं जात होतं. मला माहीत आहे, तिलाही हे असं घडायला नको होतं. कुणाच्याही बोलण्याला भीक न घालणारी, भांडखोर बाई म्हणून न वावरता सुखानं संसार करण्याची तिचीही इच्छा होती. पण कुठे तरी तोल ढळला. कुठे ते नाही कळलं. मात्र सगळं ओझं, अपराधीपणा याची जबाबदारी 'सोना मसाले'वर ढकलणं कितपत योग्य आहे, ते मला माहीत नाही.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

◆

पुस्तक परिचय

धना

पहिलवान गणेश ऊर्फ मिलिंद दत्तात्रय मानुगडे हे डिप्लोमाधारक असून, रेल्वेमध्ये कार्यरत आहेत. लेखनाची प्रेरणा त्यांना पत्रकार व ग्रामीण लेखक असलेल्या त्यांच्या वडिलांकडून मिळाली. कुस्ती या खेळासाठी आजवर त्यांनी विपुल लेखन केले आहे. सध्या 'फड' आणि 'चितपट' या कुस्तीप्रधान पुस्तकांचे लेखन सुरू आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून 'कुस्ती-मल्लविद्या' नावाचे फेसबुक पेज ते चालवतात. कुस्तीशी संबंधित सर्व गोष्टी या एकाच पेजवर रोज दिल्या जातात. ज्याचे रोजचे वाचक ७० लाख आहेत आणि जे ५२ देशांत वाचले जाते. व्हॉट्स ॲप, गुगल ब्लॉग, वेब, इन्स्टॅग्रॅम, गुगल प्लस यांसह यू ट्यूबवर कुस्ती या विषयावरचे अनेक लेख दररोज नि:शुल्क वाचण्याची सोय त्यांनी केली आहे. या उपक्रमाला आजवर ७० पेक्षा जास्त पुरस्कार मिळाले आहेत. महाराष्ट्रातील ३६५ तालुके, ३६ जिल्ह्यांत समविचारी पहिलवानांना त्यांनी संघटित केले आहे. या संघटनांच्या माध्यमातून सामाजिक कामे केली जातात.



लेखक

पै. गणेश मानुगडे

धना आणि राजलक्ष्मीची ही प्रेमकहाणी आहे. धना एक यशस्वी पहिलवान आहे, तर राजलक्ष्मी सर्जेराव या तालेवाराची लेक. त्या दोघांच्या प्रेमात अनेक अडथळे येतात. आधी सर्जेराव या दोघांच्या लग्नाला संमती देतात; पण त्यासाठी धनाला कुस्ती सोडावी लागेल, असं सांगतात; पण धना त्याला तयार नसतो, म्हणून सर्जेराव रागावतात. मात्र गावात दहशत माजवणाऱ्या नरभक्षक वाघाला धना शस्त्राशिवाय ठार मारतो आणि सर्जेराव खूश होतात; पण गंभीर जखमी झालेला धना इस्पितळात उपचार घेत असताना त्याचं अपहरण होतं. यशवंत महाराज ऊर्फ राजे यांच्या माणसांनी त्याचं अपहरण केलेलं असतं. राजे धनाला त्यांच्या फौजेचा राजा करणार असतात; पण त्यासाठी त्याला राजलक्ष्मी आणि घरादाराचा त्याग करावा लागणार असतो. तरीही धना तयार होतो. दरम्यान, वाघाच्या मृत्यूची चौकशी करण्यासाठी गावात आलेला सूर्याजी जाधव हा वन खात्याचा अधिकारी राजलक्ष्मीच्या प्रेमात पडतो; पण राजलक्ष्मीचं मन धनावर जडलं आहे, हे कळल्यावर तो त्या दोघांना एकत्र आणायचं ठरवतो. दरम्यान, खूप वेगाने काही घटना घडतात आणि राजे आणि त्यांच्या फौजेची गुप्तता धोक्यात येते. त्यामुळे ते स्थलांतर करायचं

ठरवतात मात्र, स्थलांतर करण्याआधी राजलक्ष्मी आणि सूर्याजीला संपवण्याचा आदेश त्यांनी दिलेला असतो. त्या आदेशामुळे धना अस्वस्थ असतो. त्यानंतर या प्रेमकहाणीला धक्कादायक वळण मिळतं. देशभक्ती आणि प्रेम यांच्या कात्रीत सापडलेल्या धनाच्या संघर्षाची ही गाथा उत्कंठावर्धक आणि तितकीच रोमहर्षक आहे.

झुंज दोन वाघांची

वस्तादकाका तालमीतून झपाझप पावले टाकून निघून गेले.

धनाने अंघोळ करून घरचा रस्ता धरला...!

गावात नि:शब्द शांतता पसरली होती.

धनाने वडलांच्या फोटोला नमस्कार केला आणि आईला विचारले, 'नरभक्षक वाघ' काय असतो?'

सर्जेरावांचे प्रकरण झाल्यापासून आई व धनात संवाद कमी झाला होता.

आई चुलीपुढे भाकरी करत होती. पदर सावरत म्हणाली, ''साधाच वाघ असतोय, पण त्याला माणसाची शिकार करायची चटक लागलेली असते.

'माणसाच्या रक्ताला चटावलेला वाघ म्हणजे नरभक्षक.'

नरभक्षक वाघ आणि स्त्रीला सोकावलेला पहिलवान ...फार फरक नाही...!

उपाशी मरेल, पण माणूसच खाईल...!''

आई सहज बोलून गेली.

या असल्या शब्दाने धनाचा पारा चढला.

चटकन तो उठला आणि म्हणाला, ''माहीत आहे मला, माझी चूक झाली आहे; पण चूक माझी एकट्याची नाही. वैताग आलाय तुमच्या सगळ्यांचा...उठता-बसता टोमणे ऐकून...'' असे म्हणत त्याने उंबऱ्याजवळ ठेवलेले कोल्हापुरी पायताण पायात चढवले आणि झपाझपा पावले टाकत घराबाहेर पडला...!

मागोमाग आई त्याला थांबवायला आली; पण तोवर तो बराच दूर गेला होता.

गावाच्या बाहेर एका भुईकोट किल्ल्याची तटबंदी होती, त्याच्यापलीकडे महादेवाचे मंदिर आणि तलाव होता. तिन्हीसांज झाली की तिकडे कोणी फिरकत नसे.

धना डोके शांत व्हावे म्हणून किल्ल्यावर गेला.

मावळणाऱ्या सूर्याकडे पाहत तो काहीतरी आठवू लागला...राजलक्ष्मीचे रूप आपसूक त्याच्या मनात येऊ लागले.

आज जवळपास तीन महिने होत आले. मनावर दगड ठेवून आपण फक्त कुस्ती-मेहनत करतोय ...तिच्या मनाची घालमेल काय होत असेल, याची जाणीव धनाला होऊ लागली...आणि सारखे आईचे शब्द आठवू लागले की, 'नरभक्षक वाघ आणि स्त्रीला सोकावलेला पहिलवान ...फार फरक नाही...!'

त्या वाघाने तर नाकीनव आणून सोडले होते. सारा गाव नव्हे, तर पंचक्रोशी हैराण होती. लोक घर सोडत नव्हते...पण का कोणास ठाऊक धना त्या वाघाच्या ठिकाणी स्वत:ला पाहू लागला.

उपाशी मरेल, पण माणूसच खाईल...

मनात काहीतरी वादळ सुरू झाले. बस्स! आता दुनिया काहीही म्हणो, मी राजलक्ष्मीकडे जाणारच. निश्चयी मुद्रेने तो उठला. जायला निघणार, तितक्यात तळ्याच्या बाजूने काहीतरी चमकले...

धनाच्या अंगावर भीतीने शहारे आले, हृदयाचा आवेग वाढला..काय होते ते?

आसपास हाक जरी मारली, तरी कोसभर तरी कोणी नव्हते, अशी स्थिती...

धनाने सावध पवित्रा घेतला... आणि पडक्या किल्ल्याच्या खाली असलेल्या वडाच्या झाडाखालच्या डोलीत दबा धरला... आणि ते काय आहे, याचा मागोवा घेण्यास सुरुवात केली...

एक क्षण...दोन क्षण... प्रचंड डरकाळी फुटली आणि वडावरच्या पाखरांनी एकच कल्लोळ माजवला ....सूर्य अस्ताला जाऊन संधिप्रकाश रेंगाळत होता आणि त्या संधिप्रकाशाच्या सोनेरी किरणांत वाघाचे ते प्रचंड धूड राजबिंड्या तालात चालत चालत वडाकडे येत होते ...

धनाच्या मनात भीतीने थैमान घातले.

रागाच्या भरात हे काय करून बसलो आपण...गावापासून एवढ्या लांब आलो, आता आपले मरण नक्की ...

गावात धनाच्या आईने वस्तादकाकांच्या घरी जाऊन हकिकत सांगितली. 'धना रागाने बाहेर गेलाय, कुठे ते माहीत नाही ....मला काळजी वाटते..!'

वस्तादांनी तालमीतील पोरांना भाले, बर्चे घेऊन बोलावले होतेच...

तीन-तीन जणांचा गट करून, हातात मशाली घेऊन चारी बाजूला पोरे पाठवली...आणि धावत ते सर्जेरावांच्या वाड्यात गेले...

राव नुकतेच जेवण आटोपून सदरेवर पान खात होते...

घडलेला प्रकार काकांनी सांगितला आणि राव उभे राहिले...

घरातील नोकरांना बंदूक आणण्याचे आदेश दिले आणि घोडा तयार करून सोबत वीसएक तरुण नोकर घेऊन राव स्वत: धनाच्या शोधार्थ बाहेर पडायला निघाले...

वरच्या मजल्यावरून राजलक्ष्मी हा प्रकार पाहत होती.

तिच्या अश्रूंचा बांध फुटला, तिला काय करावे समजेना...

तिचे मन एकसारखे धनाच्या भेटीसाठी आतुर झाले.

तिला कधी एकदा धनाजीला मिठी मारते, असे झाले होते...

राव गेले आणि वाड्यात शुकशुकाट झाला ...

इकडे किल्ल्याच्या खाली असलेल्या वडाच्या परिसरात एका थरारनाट्याला सुरुवात होणार होती...

झपाझप पावले टाकत येणाऱ्या वाघाकडे धना सावध होऊन पाहू लागला. वाघाला आधीच माणसाचा वास लागला होता, म्हणून तर तो तलावाचे प्रचंड पात्र पोहून अलीकडे आला होता ...

धनाजीने खांद्यावरचा शेला कमरेला बांधला ...वडाच्या खाली पडलेल्या मजबूत काठ्यांपैकी एक काठी कानाच्या उंचीची करत तोडली ...आणि डोळे बंद करून हनुमंताचे स्मरण केले ...

'हनुमंता, आता जगेन असं वाटत नाही...पण माझ्या आयुष्यात मी खूप चुकलो... प्रेमासाठी घरची, गावची इज्जत घालवली...आणि मूर्खपणानं प्रेमसुद्धा घालवायला निघालो होतो...मला क्षमा कर...'

धनाने डोळे उघडले आणि वडाच्या पारंबीला धरत सरसर वर चढून एका मजबूत फांदीवर जाऊन बसला ....किर्र रात्र वाढत होती... दिवस थंडीचे होते; पण प्रसंग असा होता की, घामाच्या धारा सुरू होत्या...

नखांचा आवाज वाढू लागला...ते जातिवंत जनावर समोर दिसू लागले...

सोन्याच्या कोंदणात हिरे बसवावेत तसे चमकणारे डोळे, एखाद्या राजपुरुषासारख्या मिशा...अंगावर पिवळे-काळे पट्टे आणि आपल्या अजस्र सुळ्यांनी पहाडसुद्धा उचलायची ताकद असलेला जबडा ...हे कमीच की काय, तोवर मागे आकाश-पाताळ दणाणून सोडणारी डरकाळी फुटली ...आसपासचे अणुरेणूसुद्धा शहारले...!

ही डरकाळी साऱ्या गावाला ऐकू गेली...गस्त घालणारी जवान पोरे पायाला भिंगरी बांधावी, तशी हत्यारे पेलीत किल्ल्याकडे दौडू लागली...

नो ऑर्डिनरी डे

लेखक
डेबोरा एलिस

अनुवाद
तोषदा आलटकर



किंमत : १५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

वल्ली या तरुणीची कहाणी...

झरिया गावातल्या कुटुंबात राहणारी... खाणीतील कोळसा वेचत आयुष्य जगणारी... गावाच्या परिघा बाहेरचं जग तिला माहीत नसतं. रेल्वे रुळांच्या पलीकडे राहणाऱ्या वस्तीतल्या राक्षसांना ती भीत असे. हे राक्षस म्हणजे कुष्ठरोगी. आपल्या जन्मदात्या कुटुंबाने पैसे देऊन संगोपनासाठी या कुटुंबाकडे सोपवल्याचे समजल्यावर ती कोलकत्याला येते... एका डॉक्टरकडून आपल्याला कुष्ठरोग झाला असल्याचे तिला समजते.

उपचाराची संधी नाकारून ती रस्त्यावरचे अनिश्चित जीवन अंगीकारते... प्राप्त परिस्थितीत प्रत्येक गोष्टीत ती आनंद, समाधान शोधते.

अनेक वळणे घेत जाणारा वल्लीचा जीवनप्रवास वाचकांना अस्वस्थ करतो...

आणि कुष्ठरोगाच्या समूळ निर्मूलनासाठी जगभरातून सांघिक प्रयत्न होण्याची गरज अधोरेखित होते.

वाघाने धनाला हेरले ...त्याने प्रचंड चीड व्यक्त करत वडाच्या बाजूला असणाऱ्या प्रचंड दगडावर आपली मांड उभी केली ....बस्स, आता एक झेप आणि धना संपणार होता... बरोब्बर एका झेपेत धना सावज होणार, एवढे अंतर उरले होते...

धना एकसारखा वाघाच्या डोळ्यांत पाहत होता ...भीतीने आत्तापर्यंत थरथर कापत होता ...पण क्षणात त्याला राजलक्ष्मीचा चेहरा आठवला.

अगदी काहीच वेळापूर्वी त्याने निश्चय केला होता की, तिला भेटायचे ...पण नशिबाने वाघाच्या रूपाने यमालाच पुढे उभे केले होते ...

अंगात वीरश्री संचारली, बाहू थरारून उठले ...मनगटे शिवशिवू लागली आणि धना फांदीवर उभाच राहिला...

वाघ हे पाहत होता...नुकताच चंद्रोदय होत होता, चंद्राच्या निळसर प्रकाशात धनाचे ते पीळदार बाहू आणि हातात काठी...जणू काही तो शिलेदार वाटत होता ...

धनाला काय झाले, त्यालाही कळत नव्हते ...बस्स, आता या वाघाशी चार हात करायचे ...मारायचे किंवा मरायचे...

वाघाने हल्ल्याचा पवित्रा घेतला...धना सावध झाला ...एक क्षण... आणि दुसऱ्या क्षणात वाघाची झेप फांदीजवळ आली आणि धनाने पूर्ण ताकद पणाला लावत काठीचा प्रहार वाघाच्या डोळ्यांवर केला...धनाचा प्रहार, वाघाची झेप याने कडाडकड आवाज करत फांदी तुटली आणि सात-आठ फूट लांब जमिनीवर पडली...आणि त्याबरोबर ते दोन वाघही जमिनीवर पडले ...पडताच सावध होऊन पायांवर उभे राहिले ...

वाघ गुरगुरत होता...धनाची छाती लोहाराच्या भात्यासारखी फुरफुरत होती...

वाघाने पुन्हा झेप घेतली...धनाने काठीचा प्रहार केला, मात्र काठी तुटली ...

आता?

आता केवळ हात...आता ताकद बाहुबलाची...आणि मर्जी हनुमंताची...

धना पक्का पहिलवान होता...

कुस्ती ही प्राण्यांच्यापासूनच निर्माण झाली आहे...

पूर्वी हिंस्र श्वापदांपासून केवळ कुस्ती करूनच सुटका व्हायची. काळाच्या ओघात हे आपण विसरलो; मात्र धनाच्या नशिबी इतिहास पुनरावृत्ती करत होता...

वाघाच्या अणकुचीदार नखांनी धनाच्या हातांवर, दंडांवर, मांड्यांवर वर्मी जखमा झाल्या होत्या. रक्ताचे पाट वाहायला लागले होते... पण आता जीवात जीव असेपर्यंत माघार नव्हती...

दुसरीकडे राव आणि त्यांचा लवाजमा घोड्यावर स्वार होऊन किल्ल्याच्या पायथ्याला आला आणि मागोमाग पोरांचे शस्त्रपथक...

धनाच्या आरोळ्या आणि वाघाची डरकाळी यांनी आसमंत दुमदुमला होता ....

धना रक्ताने लालभडक झाला होता ...वाघाने एक निकाली झेप टाकली; मात्र धनाने नेहमीप्रमाणे बगल डूब करत पाठीवर कब्जा घेतला...हे सारे जवळपास अर्धा तास सुरू होते...ही कुस्ती माणूस आणि वाघ यांच्यातील वाटतच नव्हती...जणू दोन वाघ लढत आहेत, असे वाटत होते ...

हे दृश्य पाहताच सर्जेरावांची पाचावर धारण बसली...त्यांनी निमिषात काडतूस भरलेली बंदूक काढली आणि हवेत दोन फैरी झाडल्या...गोळीचा आवाज ऐकून सारा गाव किल्ल्याकडे धावू लागला ...

धना आणि वाघ, दोघांत किमान पाच-सहा फूट अंतर होते; मात्र राव निशाणा साधू शकत नव्हते...जर नेम चुकला, तर धनाचा जीव जाण्याची शक्यता होती...

सर्जेरावांनी अजून दोन बार हवेत काढले, तेव्हा मात्र वाघाला जाणीव झाली की, आता एकापेक्षा जास्त माणसे जमा होत आहेत ...त्याने एक शेवटचा पंजा धनावर उगारला; मात्र नेहमीप्रमाणे धनाने तोड काढत हुकवला आणि क्षणात वाघाचा पंजा धरत जोरात त्याला फिरवला...वाघ बाजूच्या दगडावर आपटला...आणि क्षणात धनाने बाजूला पडलेल्या दगडाने वाघाच्या बरोबर नाकावर वर्मी प्रहार केला...वाघाचा विरोध पूर्ण मावळला आणि तो धडपडत, जीव वाचवत तलावाकडे पळू लागला...

हे पाहताच धनाने अंगात उरलेल्या शक्तीने पुन्हा दगड घेत वाघाच्या डोक्यावर मारला ...डोक्यातून रक्ताचे कारंजे वाहू लागले...धना लंगडत लंगडत वाघापाशी आला आणि एक मोठा दगड उचलून त्याच्या डोक्यात घातला...

तितक्यात सारा गाव किल्ल्याच्या पायथ्याला जमा झाला होता ...

वाघाचा अंत करून धना साऱ्या गावाकडे रक्तबंबाळ अवस्थेत पाहत होता.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

◆

पुस्तक परिचय

सर्जा

एका बैलाची हृद्य जीवनकहाणी

रामचंद्र खाटमोडे यांचा जन्म ८जून १९९०चा असून, हे मूळचे सोलापूर जिल्ह्यातील दिवेगव्हाण येथील आहेत. अभियांत्रिका क्षेत्रातील बी. टेक. पदवी त्यांनी संपादन केली आहे.

'देऊळ बंद', 'मुळशी पॅटर्न' व 'खिचीक' या चित्रपटांसाठी, तसेच दूरदर्शनवरील 'झी युवा'वर सादर झालेल्या 'बनमस्का' या मालिकेसाठी सहायक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. त्याबरोबरच लेखक प्रवीण तरडे याच्याकडे सहायक लेखक म्हणून दोन वर्षे काम केले असून, पारितोषिकविजेत्या 'दोन अंकी नाटक' व सहा एकांकिकांचे लेखनही त्यांनी केले आहे.

पुण्यातील फिरोदिया करंडक २०१३मध्ये सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन व लेखनासाठी (झिम पोरी झिम), पुरुषोत्तम करंडक २०१२ (रंग माझा वेगळा), राज्य नाट्य स्पर्धा २०१५ (गाभारा), राज्य बालनाट्य स्पर्धा २०१५ 'गोष्ट पृथ्वीमोलाची' या कलाकृतींसाठी लेखन-दिग्दर्शनासाठी त्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले आहे.



लेखक
रामचंद्र खाटमोडे

शेपटी नसलेला सर्जा
धावत राहतो रस्त्यावर
भर उन्हात, मिळेल ती सावली घेत...
अंगात बळ नसतानाही तो फोडत राहतो हंबरडा
त्याच्या अस्तित्वाचा...
आठवणीच्या शेतातून
दु:खांना पायदळी तुडवत
तो काढत राहतो वाट...
धावत राहतो एका आशेने
की सुखाचं गाठोडं सापडेल त्याला कुठेतरी
जिथे खिलारी त्याची वाट पाहत बसली असेल...

तासाभराने परत गाडी थांबली. शटर उघडलं. तर बाहेर सारं मोकळं रान दिसलं. शहराबाहेरच्या दूरच्या माळरानावर आम्ही थांबल्याचं दिसत होतं. बाजूला ना शेतं होती ना वस्तीत दिसतात तशी घरं. मला आणि राजाला टेम्पोमधून बाहेर काढलं. आम्ही जागेवर उभे होतो, टेम्पो निघून गेला आणि नजरेआड असलेलं पत्र्यांनी बांधलेलं मोठ्ठं शेड समोर दिसू लागलं. तो माणूस आम्हाला त्या शेडच्या दरवाजाकडे घेऊन गेला. त्याने दरवाजावर टकटक केली. दरवाजा उघडला. आतमध्ये आमच्यासारख्या आकाराचा माणूस उभा होता. कुरळे केस, विचित्र चेहरा, अंगाचा घाण वास, जणू आठवडाभर त्याने अंघोळ केलीच नव्हती. लाल रंगाने भरलेले हात टॉवेलला पुसत त्या ढोल्याने विचित्र स्मितहास्य केलं. त्याने दरवाजा पूर्ण उघडला आणि आम्हाला आत घेऊन जाऊ लागला. आम्ही जसे-जसे आत जाऊ लागलो, तसा समोरचा तो भयावह नजारा पाहून काळजाला भेगा पडल्या. हे समोर जे दिसत होतं ते कधीच पाहिलं नव्हतं, आणि असं असू शकतं, याचा कधी विचारही केला नव्हता. साक्षात नरकात आल्याचा साक्षात्कार आम्हाला झाला. अंगावर शहारे आले, सारं शरीर भीतीने थरथर कापू लागलं, डोकं चालेनासं झालं. आजपर्यंत डोळ्यासमोर बैलांना मरताना पाहिलं होतं, पण हे काय? आमच्यासोबत असंही कधी घडू शकतं? नजर फिरताच जणू आपल्याच डोक्यावर कुणीतरी कुऱ्हाड चालवलीय, असं वाटलं. आजूबाजूला सगळीकडे कातडी सोललेले बैल मुंडकी छाटून उलटे टांगले होते. काही बैलांजवळ हातात सुऱ्या घेऊन माणसं उभी होती, जी त्यांचे मोठ्या सुरीने कांदा कापल्यासारखे खटाखट तुकडे करत होती. समोर एका मशीनमध्ये एक बैल बाहेर डोकावून बघत होता, तो त्या मशीनमध्ये काय करतोय, ते मला कळालं नाही. तेवढ्यात झपकन त्याच्यावर गरम पाणी पडलं आणि तो तडफडू लागला. आमच्यासमोर तो तडफडून मरत होता, त्याचं ते मरण बघणं आमच्या डोळ्यांना सहन होणारं नव्हतं.

पायाला अचानक ओलं लागायला लाग़लं म्हणून खाली वाकून पाहिलं. रक्ताचे पाटच्या पाट वाहत होते. जणू ते आमच्या पायाला लागून 'नका येऊ, आत मरण आहे, मरण' असं ओरडत होते. कदाचित हाच तो कत्तलखाना होता. हो कत्तलखाना, जिथं जनावरांना कापलं जातं आणि ते मांस लोकांना विकलं जातं, खाण्यासाठी. माझा विश्वासच बसत नव्हता, की आम्हाला कापून कोणी खाऊ शकतं. कोंबडी, बोकड, मासे हे खाताना आम्ही पाहिलं होतं. त्यांनातरी लोक मारून खाण्यासाठीच पाळत असतात. पण गाय-बैल तर त्यांची होईल तोपर्यंत सेवा करतात. मग तरीही त्यांच्या नशिबी हे का? आम्हालाच बळीचा बकरा केलं

जाईल, अशी पुसटशी शंकाही कधी मनात आली नव्हती. पण हे खरं होतं. तिथल्या माणसाने आम्हाला विकत घेतलं होतं, जिवंत असतानाच मारण्यासाठी! आमच्या मांसाचे तुकडे लोकांच्या घशात घालण्यासाठी. शरीराची किंमत तर बघा, तरुणपणी ज्या शरीराने कष्ट करून धान्य पिकवलं, शेकडोंना खायला दिलं; मरताना हेच शरीरपण त्यांना खायला द्यायचं. पैशासाठी इतका नीचपणा? तो माणसालाच जमू शकतो.

ते सगळे आमच्याकडे बघून इतक्या कुत्सितपणे हसत होते, जणू पुढचे बकरे आम्हीच होतो. अशा अवस्थेत त्यांची नजर चुकवणंच बरं होतं. आतमधून आम्हाला मागे नेलं, शेडच्या मागे एक गोठा होता. तिथे जवळपास पन्नास बैल होते. सगळेच आमच्यासारखे म्हातारे होते, पण काही लहान तर काही तरणेही होते. आम्हाला सगळ्यात शेवटी बांधण्यात आलं. जो देश नेहमी शेतकरीशेतकरी म्हणून ओरडतो, त्याच शेतकऱ्याच्या बैलाला काहीतरी किंमत असेल, असं आम्हाला वाटायचं. पण जिथे शेतकरीच उपासमारीने मरतो, तिथे आमचं काय? आश्वासनं, योजना, नुकसानभरपाई, कित्येक कोटींची तरतूद अशा काल्पनिक गोष्टींनी त्या शेतकऱ्याला दाबून टाकतात. आम्हाला तर तेही नव्हतं. आधी माझा आवडता प्राणी म्हटलं की बैल किंवा गाय असं म्हणायचे, जास्तीत जास्त मांजरापर्यंत जायचे. पण आजकाल आम्ही कदाचित आवडत्या पाळीव प्राण्यांत मोडत नव्हतो. आता इंग्लिश कुत्र्यांनी आमची जागा घेतली होती.

आम्हाला तिथे बांधल्यावर समोरून एक माणूस पाणी घेऊन आला. आम्हाला खूप तहान लागली होती. मरणार आहोत हे माहीत होतं, तरी कसलाही विचार न करता त्या पाण्यावर दोघेही तुटून पडलो. आजूबाजूचे सगळे विचित्र नजरेने आमच्याकडे बघत होते. आमचं संपवून झालं तरी त्यांच्या नजरा आमच्यावरच होत्या. कदाचित राजाची नि माझी पाणी पिण्याची पद्धत त्यांना विचित्र वाटली असावी. त्यांच्या नजरा पाहून मी त्यांना हाय, हॅलो करू लागलो. पण त्याचा काही परिणाम झाला, असं वाटलं नाही. कारण सगळ्या उदास चेहऱ्यांवरची साधी माशीही हालली नव्हती.

सगळ्यांच्या नजरा वळल्या त्या लहान वासराच्या ओरडण्याने. ती दोन पैलवान माणसं त्याच्या मुंडक्याला धरून ओढून नेत होती. ते बिचारं वासरू खूप प्रतिकार करत होतं, पण त्या पैलवानापुढे त्याचा प्रतिकार व्यर्थ होता. ते जिवाच्या आकांताने ओरडत होतं. 'मला मारू नका, मला मारू नका, मला

जगायचंय', म्हणून ते किंचाळत होतं. पण त्या बिचाऱ्यासाठी कुणी काही करू शकत नव्हतं. माळरानावर एखाद्या वाघासमोर ते असतं तर सगळे त्या वाघावर धावून गेलो असतो आणि त्याला वाचवलं असतं. पण इथे सगळं वेगळं होतं. वाघापेक्षाही भयंकर माणसं हातात कुऱ्हाडी घेऊन यमराजासारखी उभी होती. त्या वासराला फरफटत ओढून घेऊन जाताना काळजाचं कातडं कुणीतरी ओरबाडून काढत असल्यासारखं वाटलं. ते त्याला त्या कड्ड्यावर घेऊन गेले आणि त्याचं मुंडकं त्या लाकडी ओंडक्यावर धरलं. ते वासरू धडपडत होतं, निसटण्याचा प्रयत्न करत होतं, पण त्या पैलवानाची पकड लोखंडासारखी घट्ट होती. मोठेमोठे बैल पछाडणाऱ्या त्या पैलवानाला या कोवळ्याची धडपड जराही त्रास देत नव्हती. एकाने त्याचं मुंडक धरलं होतं. दुसऱ्याने कुऱ्हाड उचलली. वरती उगारली, तसा आमचा श्वास थांबला. वर थांबलेली ती कुऱ्हाड वाऱ्याच्या वेगाने सपकन खाली आली, ते मुंडकं सोबत घेऊनच. बाजूच्या मुंडक्यांच्या ढिगावर अजून एकाची भर पडली होती. त्या वासराचं शरीर तडफडत होतं, जणू त्याच्या यातना साऱ्या शरीरातून सळसळ करत होत्या. तसंच त्याच्या शेपटाला पकडून ते त्याला फरफटत घेऊन गेले. त्याची अवस्था बघून डोळ्यांत पाणी आलं, त्याचं दु:ख झालं आणि आपलंही असंच होणार, याची भीती मन खाऊ लागली. मनात विचारांची चक्रं फिरायला लागली. स्वत:चं मरण कशा पद्धतीने येणार, हे समोर दिसल्याने मरणाची जास्तच भीती वाटू लागली.

''आपण असेच मरणार?'' राजाने विचारलं.

''हो, कदाचित.'' – मी.

''एक-दोन दिवसच राहिलेले दिसतायत.'' – राजा.

''सहा दिवस!'' अचानक आलेला हा अनोळखी आवाज ऐकून आम्ही दोघांनी वर पाहिलं. बाजूच्या रांगेतला एक बैल ॲटिट्यूडने आमच्याकडे पाहत होता. अंगाने तसा काठीसारखा, बारीक पण ताठ. त्याची शिंगंही वेगळीच, चार-पाच पिळे असलेली काळविटासारखी, त्यांची टोकं जणू जमिनीला वाकून नमस्कार करण्याच्या तयारीत होती.

''तुला कसं माहीत?'' राजाने प्रश्नार्थकपणे विचारलं.

''सांगतो, जरा इकडे या.'' आम्ही पुढे सरकलो.

''कसंय, इथे रोज दहा बैल कापले जातात, त्या अंदाजाने पन्नाससाठी पाच दिवस. त्यात एक रविवार म्हणजे सुट्टी, म्हणून सहा दिवस. अन् सातव्या दिवशी पहिला मी.'' बोलताबोलता त्याच्या डोळ्यांतून पाणी ओघळू लागलं. त्याच्या या

द सेव्हन्थ स्क्रोल



लेखक
विल्बर स्मिथ

अनुवाद
बाळ भागवत

किंमत : ५५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

कथा आजच्या काळात घडलेली असली, तरी तिचा संबंध आहे चार हजार वर्षांपूर्वीच्या रिव्हर गॉडमधील जगाशी. सेव्हन्थ स्क्रोल– वाचकाला खिळवून ठेवणाऱ्या कुशल कथाकाराची आणखी एक साहसकथा.

धूसर बनून विस्मृतीतच गेलेल्या कालखंडामधील अफाट खजिन्याचे स्थान निश्चित करण्यासारख्या खाणाखुणा सेव्हन्थ स्क्रोलमध्ये सोडल्या आहेत. ड्युराइड अल् सिमा आणि त्याची इंग्लिश-इजिप्शिअन माता-पिता असलेली पत्नी रॉयन यांनीच पहिल्यांदा राणी लॉस्ट्रिसच्या कबरीचा शोध लावला. त्या वेळी योगायोगानेच अत्यंत हुशार आणि कावेबाज ताईताने फेरो मॅमोस आणि त्याचा अफाट खजिना कबरीमध्ये पुरून ठेवल्याचे वर्णन असलेल्या पपायरसच्या गुंडाळ्या त्यांच्या हातात पडतात. हा त्यांचा शोध नाइलपासून इथिओपियाच्या दऱ्याखोऱ्यांत पोहोचतो. तो खजिना फक्त स्वत:साठी मिळवण्याच्या लालसेने पछाडलेले ताकदवान लोक फेरोच्या गुप्त खजिन्यामागे लागल्यावर अत्यंत हिंसक असा पाठलाग सुरू होतो. ड्युराइडचा खून पडल्यावर रॉयन इंग्लंडमध्ये आसरा घेते आणि निकोलस क्वेन्टन हार्पर या विख्यात पुराणवस्तू संशोधकाबरोबर इथिओपियाला जाते – ड्युराइडसाठी! ताईतासाठी! एका प्राचीन फेरोच्या स्वप्नांसाठी!! आणि स्वत:च्या उद्ध्वस्त आयुष्याचे धागे पुन्हा जुळवण्यासाठीही!

विचार करण्यावर आम्ही दोघे अचंबित झालो.

''इतका नका विचार करू. मला माहितेय माझं टॅलेंट. आपण असल्यावर लय टेन्शन घ्यायचं नाही. सहा दिवस निवांत राहायचं.'' आम्ही अजून त्याच्याकडे आश्चर्याच्या नजरेनेच पाहत होतो.

''बाय द वे, मी वीरू,'' म्हणून त्याने ऐटीत मान डोलावली.

''हं हं हं! वीरू!'' आम्ही दोघेही हसलो.

''हो, आपला मालक शोलेचा जबरदस्त फॅन. म्हणून आमची नावंही तशीच, जय - वीरू.''

''मग जय कुठाय?''

''दुष्काळानं आधीच गिळलं त्याला; म्हणून तर मालकानं मला विकलं, पैशापायी. तसंही एकट्या बैलाचं काय करणार होते ते?'' एक वेगळीच दु:खाची सल वीरूला बोचून गेली.

''तुला किती दिवस झाले आत येऊन?'' मी विचारलं.

''परवा! परवा आलोय. तेव्हापासून पाहतोय मरणाला. धडापासून शिराला एका फटक्यात वेगळं होताना तुम्ही बघालच रोज. सवय होईल त्याची. पण जास्त टेन्शन नाय घ्यायचं. मरायचंच ना? मग मस्त मरू. पाच दिवस मस्त गप्पा मारू, काय? तुमची नावं नाही सांगितली तुम्ही?'' स्वत:ला आवरत वीरूने विचारलं.

''मी सर्जा आणि हा राजा. शहापूरच्या पाटलाचे.'' – मी.

''शहापूर?'' वीरूने आश्चर्याने विचारलं.

''हो!'' – मी.

''शहापूरच्या पाटलाची जोडी— सर्जा-राजा! ए हेऽऽ'' बिछडे यार भेटल्यासारखं तो आनंदाने ओरडू लागला. ''आरं लय फॅन तुमचे आम्ही! बैलगाडीच्या शर्यतीत काय पळायचा राव! सर्रर्रर्रर्र ए हे, काय स्पीड! आम्हीतर अर्ध्या पैलात असताना तुम्ही शर्यत जिंकायचा पण. तिथं भेटता नाही आलं पण इथं शेवटी भेट झालीच हं. एक नंबर!''

''अजूनही लक्षात आहेत त्या शर्यती?'' राजाने कौतुकाने विचारलं.

''तर! सलग पाच वर्षे तुम्ही पाटलाला जिंकण्याचा मान दिला. तो तुमचा रुबाब— सर्जा रुईसारखा पांढराशुभ्र, तगडा, तर राजा काळसर पैलवानापेक्षा बढतर. अरे, काय चर्चा व्हायची तुमची? चरायला गेल्यावर तुमच्याच शर्यतीच्या गप्पा.'' वीरूचं बोलणं चालूच होतं.

''हं, संपला तो काळ. आता फक्त त्या आठवणी घेऊन जगतोय.'' – मी.

''अरे, पण पाटलाचे तर तुम्ही खूप लाडके. त्यांनी का विकलं तुम्हाला?'' – वीरू.

''कितीही लाडके असू, पण पोटापुढे काय चालतं कुणाचं? स्वत:चं पोट भरणं होईना, मग आमचं कसं भरणार? दुष्काळ इतका की, त्यालापण आमच्यापेक्षा पैसेच गरजेचे वाटले असतील.'' – राजा.

''सगळ्यांचं तेचय म्हणा!'' – वीरू.

इथं सगळ्यांचं तेच बोचरं दु:ख होतं म्हणा!

''पण आपल्याला का कापतात? आपलंही मांस खातात का?'' राजाने वीरूला विचारलं.

''हो. त्यासाठीच तर कापतात आपल्याला.'' वीरूने सांगितलं.

''आपल्याला कापून खातात?'' – राजा.

''हो.'' – वीरू.

''आपल्याला खावंसं वाटतं लोकांना?'' राजाचा हा प्रश्न खरंच विचार करायला लावणारा होता.

''खावंसं वाटतं? खूप आवडीने खातात हे लोक. इतक्या स्वस्तात मिळतं. इथं कमी खात असतील; पण बाहेर खूप खातात.'' वीरू सांगत होता.

''म्हणजे आपलंपण मटन विकलं जातं?'' मी विचारलं.

''बीफ, बीफ म्हणतात त्याला. जसं कोंबडीचं चिकन, बोकडाचं मटन, तसं आपलं बीफ.''

वीरूचं जनरल नॉलेज खूप चांगलं होतं. त्या रात्रभर आमच्या गप्पा सुरूच होत्या. राजाचा पाय त्रास देत असल्याने तो जरा लवकरच आडवा झाला होता. सकाळी जाग आली ती एका आकाशाला गवसणी घालणाऱ्या किंचाळीने. डोळे उघडताच समोर खाडकन आवाज झाला अन् दिवसाची पहिली कत्तल झाली.

त्यानंतर दोन दिवस दहाएक जनावरं कोंबडीसारखी मारली गेली. हे सगळं पाहवलं जात नव्हतं. सणासुदीला पूजा करणाऱ्या आम्हाला आमचं असं विचित्र मरण पटतच नव्हतं. आम्हाला इथं मारण्याची शिक्षा म्हणजे देहदंड दिलाय; पण कोणताही गुन्हा केला नसताना! कदाचित माणसासाठी आयुष्यभर शेतात राबलो, धान्य कमावलं हेच आमचं पाप असावं. इथं आंदोलनही करता येत नव्हतं; कारण करणार कुणापुढे आणि ऐकणार कोण? तिथं खूप कोंडमारा होत होता, खिलारीची आठवणही येत होती आणि काळजीही वाटत होती. आधीसारखी कणखर नव्हती ती, वयाच्या मानाने बरीच अशक्त झाली होती. समोर अशी मुंडकी कापली जात

असताना, रक्ताचे थारोळे पडत असताना खूप नकोसं होत होतं. बैलांच्या अंगावरची कातडी सुरीने सोलून काढताना जणू माझीच कातडी ओरबाडली जात होती. नको असलेले पाय खटाखट बाजूच्या ढिगावर पडत होते. अंगातली सगळी हाडं काढून वाळवून ते पोत्यात भरत होते. जिकडे पाहावं तिकडे रक्तच रक्त होतं, जणू भिंतींना आणि जमिनीलाही रक्ताने रंगवलं होतं. आजूबाजूच्या सगळ्यांच्या डोळ्यांत ती भीती दिसत होती. मलाही त्या भीतीत राहून असं मरायचं नव्हतं. या मरणाच्या दारात मरणाची वाट बघत बसणं शक्य नव्हतं. मला इथून निघायचं होतं. हो, निघायचं होतं.

''आपण पळून जायचं इथून?''

माझ्या या प्रश्नाने सगळेजण टरकले.

''वेडा झालायस तू!'' राजा जोरात हंबरला.

''काही शक्य नाहीये. सगळीकडे कुऱ्हाडी घेऊन बसलेले असतात. मोकळे दिसलो की तीच कुऱ्हाड मानेवर येऊन बसेल.'' वीरू रागात बोलला.

''ही दोरी तुटणार आहे का तुझ्याकडून? तेवढी ताकद आहे का अंगात?'' राजा मला समजावू पाहत होता.

''अरे मग काय करू? तसंही दोन दिवसांनी मरायचंच आहे. आधी मेलो तर काय फरक पडणारे?'' मी जोरात बोलत होतो.

''वेडेपणा करू नको सर्जा, गप्प रहा.'' राजा मला शांत करत होता.

''काही शक्य नाहीये. उगाच फालतू विचार करतो. पळून जाणं एवढं सोप्पं असतं, तर आम्ही काय इथं थांबलो असतो का? वेडाय हा.'' वीरू सगळ्यांना ऐकू जाईल अशा आवाजात ओरडला आणि मला शांत राहाण्याचं खुणवून जाग्यावर बसला. सगळ्यांनी आपापल्या नजरा फिरवल्या; पण मी ठरवलं होतं, इथून बाहेर जायचंच!

दुसऱ्या सकाळी नेहमीसारखी किंचाळीने जाग आली. डोळे उघडले तर समोर वीरू. चेहऱ्यावर एखाद्या डिटेक्टिव्हसारखा भाव आणून तो बसला होता. कदाचित वीरू माझ्या उठण्याची वाट बघत तोंडासमोर उभा होता.

''काय?'' मी त्याला विचारलं.

तरीही तो शांतच होता.

''अरे काय?'' मी त्याला परत विचारलं.

वीरूने इकडेतिकडे पाहिलं, हळू आवाजात तो पुटपुटला,

''ते कालचं, पळून जायचं?''

''म्हणजे तुला शहाणपण सुचलं म्हणायचं.'' – मी.

वीरूने त्याच्या बढाया मारायला सुरुवात केली, ''अरे राजा, सांग याला भाऊ. पहिल्यापासूनच हुशारेय आपण. काल तू सगळ्यांसमोर बोलला रे! कसंय, सगळ्यांपुढे नाही बोलायचं, परत प्रॉब्लेम होतो. खरंतर याचा विचार आपण आल्याआल्याच केला होता, पण कुणी भेटलं नाही. मगाशीच सांगितलं राजाला, हो की नाही राजा?''

राजाने जिवावर आल्यासारखी मान डोलावली. आम्हा तिघांचं आता एकमत झालं होतं. आता फक्त इथून निघायचा प्लॅन करायचा होता.

आम्ही आता रोज डिटेक्टिव्हसारखे वागायला लागलो. आजूबाजूचे लोक, तिथल्या हालचाली, सगळ्या गोष्टी बारकाईने पाहू लागलो. गणेश उत्सवात पाहिलेल्या सिनेमांचा मला खूप फायदा झाला. सगळं कसं प्लॅनिंगने करायचं होतं. समोर असणारा वीरू त्या बाबतीत खूपच पुढे होता. वीरूने इथल्या सिक्युरिटी सिस्टीमची चांगलीच माहिती काढली होती. गेटजवळ दिवसा एकजण, आत बैल कापणारे सहाजण आणि मागच्या बाजूला दोघे असायचे. म्हणजे साधारणत: दिवसा पळून जाणं ही एक फालतू कल्पना होती. रात्री आम्ही पाळत ठेवून जागे राहिलो. कत्तलखाना बंद झाल्यावर तीन लोक आतमध्ये थांबायचे. मेलेले बैल आणि जिवंत बैल सांभाळण्यासाठी एकजणच ठेवला होता; पण बाकीचे दोघे हरामी बिनकामी तिथे थांबायचे. का थांबायचे कुणास ठाऊक?

'कदाचित त्यांच्याकडे घर नसावं, कदाचित पत्ते खेळण्यासाठी थांबत असतील, किंवा घरी बायको दारूला हात लावू देत नसेल म्हणून इथं येत असतील,' अशी विविध उत्तरे वीरूने शोधून ठेवली होती.

मुळात त्याच्याशी आम्हाला काहीही देणंघेणं नव्हतं, आम्हाला फक्त इथून निघायचं होतं. पळण्यातली पहिली अडचण म्हणजे आमचं दावं! दावं सहजासहजी कापणं काही शक्य नव्हतं त्यामुळे पूर्ण रात्रभर आम्ही दाताने दोरी घासत होतो. कुणी जवळ फिरकायला आलं, की बाजूची वैरण पायाने सारून दोरी झाकायची. पाच तास आबदल्यावर कुठे त्या दोरीचा एक भाग तुटला होता. राजाचे दात अजूनही तितकेच कणखर होते, तलवारीच्या पातीसारखे. त्याने दोन तासांतच दोन्ही टोकं अलग केली होती. वीरूचं काहीच झालं नसणार, हे माहीत होतं. करकर आवाज येत असला, तरी एक धागाही नीट तुटला नव्हता. सकाळी मोठ्या आविर्भावाने तो दोरीवर गवत टाकून बसला होता. पण त्याच्याकडून ते पूर्ण नाही झालं, हे दिसत होतं. दुसऱ्या दिवशी सर्वजण झोपल्यावर आम्ही नजर ठेवून उभे

होतो. परवा सकाळी म्हणजे दोन दिवसांनी आमची मुंडी धडावेगळी केली जाणार होती, त्यामुळे उद्या रात्रीच इथून निघावं लागणार होतं. आम्ही दावं तोडून मोकळे झालो होतो. बस्स! आता फक्त आजची रात्र होती, प्लॅन ठरवायला.

ठरलं! रोज रात्रीप्रमाणे फक्त तीनच लोक तिथे असतील. एक बाहेर आणि दोघे आत. आतले दोघे पिऊन तर्रऽऽ होऊन बाराला झोपले की, हळूच चालत तिघांनी तिथून निघायचं. समोरच एक पडकी भिंत होती. तिच्या बाजूला कडब्याचा थर लावला होता. त्या कडब्याच्या थरावरून भिंतीचा आधार घेऊन पलीकडे रस्त्यावर उडी मारावी लागणार होती. मी आणि वीरूने थोड्या कष्टाने का होईना ते पार केलं असतं; पण राजाला ते अवघड जाणार होतं. पायाला झालेल्या जखमेमुळे त्याला नीट पळताही येत नव्हतं. त्यामुळे राजाला भिंतीपार करणं ही माझी आणि वीरूची खरी कसरत होती. बाकी प्लॅन खूप सहज होता. अडचण होती फक्त त्या तिघांची. काही झालं तरी त्यांना जाग यायला नको होती.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

◆

टी बुक क्लब

या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

चालू बुक क्लबचे सभासदत्व ₹ ५० भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणास त्यासंबंधीची माहिती कळवली जाते. ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

₹१०० भरून उपलब्ध असलेली कोणतीही आठ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किमतीत मिळवा. सर्व पुस्तकांसाठी एकूण पोस्टेज ₹५०० राहील किंवा आठ पुस्तकांसाठी पोस्टेज ₹ १२५.

द वॉचमन

लेखक
रॉबर्ट क्रेस

अनुवाद
बाळ भागवत



किंमत : ३००/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

न्यूयॉर्क टाइम्सच्या मते जो पाईक – मरीन, भाडोत्री सैनिक, पोलीस आणि शेवटी एल्व्हिस कोल या खाजगी डिटेक्टिव्हचा व्यवसायातला भागीदार – याच्या कादंबऱ्या म्हणजे एक स्फोटक रसायन असते.

एका रात्री लॉस एन्जलीसमधील एका धनाढ्य कुटुंबाची वारस असणारी लार्किन कॉनर बार्कले हिची ॲश्टन मार्टिन गाडी दुसऱ्या गाडीवर आदळते आणि त्या रहस्यमय गाडीमधल्या प्रवाशांना मदत करण्यासाठी ती स्वत:हून पुढे होते, तेव्हा अशा भानगडीत अडकते की, अफाट संपत्तीचाही त्यामधून निसटायला उपयोग होत नाही... फेडरल चौकशीमधली ती एकमेव साक्षीदार ठरते आणि खुनी तिचा काटा काढायला तिच्या मागे लागतात.

तिला तिच्या बीव्हर्ली हिल्समधल्या ऐषारामी जगामधून बाहेर काढून तिचे रक्षण करण्याची जबाबदारी जो पाईकवर पडते. खोटेपणा, विश्वासघात यांच्यामुळे कोंडीत सापडल्यावर जो पाईक आपल्या पद्धतीप्रमाणे तिचा जीव वाचवण्यासाठी प्रतिहल्ले चढवत अव्याहतपणे त्या खुन्यांच्याच मागे लागतो.

अत्यंत चित्तथरारक शोध, पाठलाग आणि शेवटही!

पुस्तक परिचय

रेझोनान्स

सध्या अजय पांडे भारतीय राजस्व सेवेत म्हणजेच इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिसमध्ये (आयआरएस) कार्यरत आहेत. त्यांची इंजिनिअरिंग क्षेत्रातली शैक्षणिक पार्श्वभूमी, इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिसमधील दोन दशकांचा कार्यकाल, जगातील निरनिराळ्या गुप्तचर विभागांशी तसेच जागतिक बँक आणि वॉशिंग्टन डीसी येथील जागतिक नाणेनिधी यांच्याशी असलेले निकटवर्तीय संबंध, अमेरिकेतील भारतीय वकिलातीबरोबरचा संपर्क आणि अमेरिकेतील नॉर्थ कॅरोलिना येथील ड्यूक युनिव्हर्सिटीतील शिक्षण यांद्वारे त्यांना जागतिक भूराजकीय घडामोडी तसेच जगभरातील गुप्तचर विभागातील विविध स्तर आणि सरकारी खाती यांचे आपापसांतील गुंतागुंतीचे संबंध याविषयी अतिशय सखोल माहिती आहे. या सगळ्याचा परिपाक म्हणजेच ही चित्तथरारक कादंबरी.

अजयच्या पत्नीचे नाव आहे सुमिता आणि मुलाचे प्रांजल.

लेखक
अजय पांडे

अनुवाद
उज्ज्वला गोखले

'टू पाक टू...' मृत्यूपंथावरच्या त्या माणसाचे हे अखेरचे शब्द... एखादा सुगावा, धागादोरा, आरोप की नुसतीच असंबद्ध बडबड?

इंटेलिजन्स ब्युरोचे संयुक्त संचालक सिद्धार्थ राणा एक गूढउकलण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करत आहेत. निव्वळ अंधारात चाचपडायला लावणारे धागेदोरे घेऊन सिद्धार्थना एक लढा लढायचा आहे. भारताविरुद्ध एक भयंकर कट रचणाऱ्या दहशतवाद्यांना प्रतिबंध घालण्याचं आव्हान त्यांच्यासमोर आहे.

हे द्विखंडीय कथानक यातल्या दहशतवादी हल्ल्यांच्या कथासूत्राने तुमच्या मनाची पकड घेईल. कथेच्या मांडणीत आढळणारा प्रगत विज्ञान-तंत्रज्ञानाचा लीलया वापर अचंबित करेल. ही श्वास रोखून धरायला लावणाऱ्या धैर्याची कथा आहे आणि तरीही नात्यांमधले सौंदर्य या कथेचा गाभा आहे. ज्या नात्यांना राष्ट्रांच्या आणि पूर्वापार शत्रुत्वाच्या सीमांचं बंधन नाही.

दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ च्या रात्री मुंबईवर हा महाभयंकर हल्ला झाला.

त्याच दिवशी दुपारी, सुंदरम् अय्यर एका मीटिंगला हजर राहिले होते. नवी दिल्लीमधल्या सेवा भवन येथे, सेंट्रल वॉटर पॉवर कमिशनच्या अधिकारी वर्गासोबत त्यांची चर्चा झाली. सुंदरम् रात्री उशिरापर्यंत काम करणार होते, म्हणून मीटिंगनंतर संध्याकाळी त्यांनी आपल्या ड्रायव्हरकडून गाडीच्या चाव्या मागून घेतल्या आणि त्याला घरी पाठवून दिलं.

सुंदररमनी गाडी कॅनॉट प्लेसला घेतली आणि एम ब्लॉकच्या पार्किंग लॉटमध्ये व्हरायटी बुक स्टोअर या प्रसिद्ध दुकानासमोर उभी केली. गाडीतून उतरून रमतगमत ते बाराखंबा ॲव्हॅन्यूवरच्या ललित इंटरकॉन्टिनेंटल हॉटेलकडे चालू लागले. तिथे पोहोचल्यावर ते सरळ तिथल्या प्रेसिडेंशियल स्विटकडे गेले. हा स्विट दुबईतल्या एका औषधी कंपनीने बुक केला होता. सुंदरम्चे तीन साथीदार, तिथे त्यांची वाटच बघत होते. नमस्कार-चमत्कार झाल्यावर सुंदरम्नी प्रत्येकाला आपापले सेलफोन बंद करून त्यातली बॅटरी काढून टाकायला सांगितली. सगळ्यांच्या फोनचा जगाशी संपर्क तुटल्यावर सुंदरम्ला जरा हायसं वाटलं. मग त्यांनी सोमशेखर रावला तिथला टीव्हीपण बंद करायला सांगितला.

सोमशेखर रावनी लगेच आज्ञापालन केलं. टीव्ही बंद करून आपल्या जागी बसता बसता ते पटकन म्हणाले. ''भारत सरकारनं आमचं कॉन्ट्रॅक्ट रद्द केलं; तेव्हा तुम्ही त्यांना थांबवू कसे शकला नाहीत सुंदरम्?'' प्रोग्रेसिव्ह आर्किटेक्चर अँड कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेडच्या या मॅनेजिंग डायरेक्टरचा चांगलाच भ्रमनिरास झाला होता. आता त्यांना सुंदरम्कडून याचं उत्तर हवं होतं.

''त्यांचं म्हणणं आहे की, तुमच्या कंपनीनं काहीही काम केलेलं नाही; त्यामुळे या प्रकल्पाची किंमत अवाच्या सव्वा वाढली. तुम्हाला माहिती आहे प्रकल्पाचं काम रखडल्यामुळे हायड्रोइलेक्ट्रिक कॉर्पोरेशनचे लोक जाम उखडलेत.''

''पण त्यांनी ती दहा लाखाची बँक गॅरंटी केव्हाच वठवलीये ना त्याचं काय मग?'

''शांत व्हा मिस्टर राव. तुम्ही आधीच इंडियन काउन्सिल ऑफ

आर्बिट्रेशनकडे दाद तुमचे हे व्यावसायिक मतभेद मिटवण्यासाठी मागितली आहे. तुमचे वकील कधीही पर्यावरणवाद्यांकडे बोट दाखवू शकतातच की; 'त्यांच्यामुळे तुमच्या कामात अडथळा निर्माण झाला' असं म्हटलं की झालं. काही अपरिहार्य कारणांमुळे म्हणजे ज्यावर तुमचं काहीही नियंत्रण नाही, अशा परिस्थितीत तुमचं काम रखडणं अगदी स्वाभाविक आहे, हो की नाही?''

''आम्ही हाच मुद्दा मांडला होता; पण त्या महानगर दंडाधिकाऱ्यांनी आमचं म्हणणं साफ धुडकावून लावलं.''

''मी लॉ सेक्रेटरीशी बोलतो. बघू या तो काही मदत करू शकतो का ते.''

''माय डिअर अय्यर, प्रत्येकाची एक ठरावीक किंमत असते साहेब!''

''आता हे माझ्याशिवाय जास्त चांगलं दुसऱ्या कुणाला माहिती असणार? कंपनीचं उत्पन्न विसरून जाऊ? जर गव्हर्नमेंटनं तुमच्या कंपनीचे पैसे परत केले, तर त्याचा तुम्हाला काय फायदा? फक्त कोरडे धन्यवाद मिळतील फार तर! आता मला सांग मित्रा, आजकालच्या या निर्दयी जगात तेवढं पुरेसं आहे का?'' सुंदरम्‌नी मंद स्मित केलं. ''त्यामुळे आता आज आपण या गोष्टीचा असा सोक्षमोक्ष लावून टाकणार आहोत की, घडलं ते सगळ्यांच्याच पथ्यावर पडेल. खरंतर तुमच्यापैकी कुणालाही मग कुठेही नोकरी करायची गरज राहणार नाही. आता मी तुम्हाला जे सांगणार आहे ना त्यामुळे प्रत्येकाला घसघशीत डबोलं मिळेल.''

''म्हणजे साधारण किती?''

''तुमच्यापैकी प्रत्येकाला पाच दक्षलक्ष डॉलर्स.''

सोमशेखर रावनी मान डोलवली आणि सुंदरम्‌नी आपलं लक्ष पराग नंदाकडे वळवलं. आत्तापर्यंत तो स्वत:च्याच नादात असल्यासारखा बसला होता. ''काय झालं पराग, काही प्रॉब्लेम आहे का?''

''मला गुप्तचर विभागाच्या ढवळाढवळीची काळजी वाटतेय. उगीच राईचा पर्वत करताहेत ते. ते ना त्या इस्रायली बराक मिसाइल डीलमधली माझी भूमिका उगीचच फुगवताहेत.'' पराग नंदा अस्वस्थ होता. आत्तापर्यंत त्याला कसलीही तोशीस पडली नव्हती; त्यामुळे त्याला आपल्या सुखेनैव चाललेल्या आयुष्यात नकार पचवायची सवयच नव्हती. सगळ्या प्रश्नांना कशी झटपट उत्तरं हवी असत त्याला. ''तुम्ही संरक्षणमंत्र्यांकडे शब्द का नाही टाकत माझ्यासाठी किंवा शक्य झालं तर सरळ पंतप्रधानांशी बोला आणि सगळं

मिटवूनच टाका ना!''
''हे अजिबात शक्य नाहीये. तुला माहिती आहे हे दोघंही सरळमार्गी आहेत. ते काही आयबीच्या कामात हस्तक्षेप करणार नाहीत.''
पराग नंदाची उलघाल स्पष्ट दिसत होती. त्यानं आपला स्कॉचचा ग्लास उचलला आणि एका झटक्यात रिकामा केला. लगेच त्यानं पुन्हा तो भरूनही घेतला आणि आपली अर्धवट जळालेली सिगारेट ॲश-ट्रेमध्ये मालवून टाकली.
वयाने कमी आणि अननुभवी परागच्या चिडचिडीकडे दुर्लक्ष करत सुंदरम् अय्यरनी पुढे सुरू केलं, ''मला एक सांगा, आपल्या बाकीच्या स्फोटकांची पार्सलं नेपाळ बॉर्डरवरून आत आणू शकता का तुम्ही?''
''हा आणखी एक मोठा प्रॉब्लेम आहे. नेपाळमध्ये कम्युनिस्ट सरकार स्थापन झाल्यापासून त्यांचे भारताबरोबरचे राजनैतिक संबंध खूपच बिघडलेत. नेपाळ हे तसंही कुरापतखोरच आहे. आता तर भारतीय सरकार त्याला जमेला धरतच नाही; कारण ते लोक त्यांच्या देशात आसरा घेतलेल्या नक्षलवाद्यांना आणि माओवाद्यांना भारताच्या स्वाधीन करण्यासाठी काहीही सहकार्य करत नाहीत. आता आयबी आणि रॉचे अधिकारी नेपाळमध्ये घुसून या दहशतवाद्यांना ताब्यात घेतात आणि त्यांचं अपहरण करून त्यांना सरळ इकडे पळवून आणतात. यासाठी ते तिथल्या अधिकाऱ्यांना अजिबात विश्वासात घेत नाहीत. यामुळे नेपाळनं तर सरळसरळ शत्रुत्वच पुकारलंय. त्यांचे सेंट्रल कस्टम्सचे अधिकारी त्यांच्या चेकपोस्टवरून माल पुढे जाऊ देत नाहीत. अगदी सगळ्यांचे हात ओले केले तरीही काही घडत नाहीये.''
''आश्चर्य आहे.''
''विनोदीसुद्धा आहे. ते म्हणतात की, भारतात खोट्या नोटांचं जाळं पसरलंय; त्यामुळे कस्टमच्या माणसांचा आपल्या रोखीच्या व्यवहारावर विश्वास नाही. त्यांना युरोमध्ये किंवा डॉलरमध्ये पैसे हवे आहेत आणि तेसुद्धा ॲडव्हान्समध्ये.''
''विचित्रच आहे. तरीही नेपाळ कस्टम्सच्या डायरेक्टर जनरलशी बोला. तुम्ही काय केव्हाही सांगू शकता की, पार्सलमध्ये स्टीलसारखी काहीतरी निरुपद्रवी गोष्ट आहे. मग त्यांची बॉर्डरवरची माणसं ते पास न करण्याचं काही कारणच उरणार नाही.''

प्रेमाची परिभाषा

लेखक
अँड्रो लिंकलेटर

अनुवाद
मेघना जोशी



किंमत : ३००/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

१९३९ सालचा वसंत ऋतू.
सुंदर तरुणी पामेला किराज, डोनाल्ड हिल या देखण्या पायलटला भेटते, आणि दोघे प्रेमात पडतात! पण दुसऱ्या महायुद्धामुळे त्यांना त्यांचा विवाह लांबणीवर टाकावा लागतो.
डोनाल्डची नेमणूक हाँगकाँगला होते. तेथे भविष्यातला संभाव्य धोका लक्षात घेऊन तो डायरी लिहायला सुरुवात करतो; पण त्यातला मजकूर असतो एका सांकेतिक भाषेत! ही भाषा असते रहस्यमय आकड्यांची!
डोनाल्ड युद्धाहून परततो; पण युद्धकैदी असताना त्याचा अतोनात शारीरिक व मानसिक छळ झालेला असतो. त्याचा परिणाम त्याच्या मनावर, आयुष्यावर होतो. त्या आठवणी आयुष्यभर त्याचा पिच्छा पुरवतात. पामेलाला मनापासून वाटू लागते की, डोनाल्डला समजून घेण्यासाठी त्याच्या डायरीतील हे रहस्य समजून घेतलेच पाहिजे!
हे रहस्यमय आकडे पामेलाला उलगडता येतील?
डोनाल्डची ती सांकेतिक भाषा पामेलाला जाणून घेता येईल?
आपल्या प्रेमाला जाणून घेण्याची, एका शोधाची ही सत्यकथा!

''त्यांनी पास केलं तरीही अशा गोष्टीमुळे आपल्या भारतीय साइडच्या चेकपोस्टवाल्यांचा संशय बळावेल.''
''का?''
''नेपाळ काही स्टील उत्पादन करत नाही.''
''जरा वेगळा विचार करा ना... हा नेपाळचा मार्ग कदाचित सोडूनही देता येईल. महत्त्वाचं काय तर तुम्ही त्या पार्सलमधलं यूएनडीइएक्स जाहीर करू शकत नाही; हा मुद्दा आहे.'' सुंदरम् निर्विकारपणे म्हणाले.
''आपल्याला यूएनडीइएक्सची म्हणजेच पाण्याखालच्या स्फोटकांची गरजच नाहीये दोस्ता'' सोमशेखर राव मध्येच म्हणाले.
''का?''
''अशी स्फोटकं वापरली तर तुम्ही ठरवल्याप्रमाणे हवा तसा महापूर येणार नाही. अशा स्फोटामुळे जलाशयातलं पाणी उसळेल. तिथे प्रचंड मोठा फुगवटा तयार होईल. त्या लाटा जोरात धरणाच्या भिंतीला धडकतील; पण त्यामुळे हे एवढं मोठं दगडी धरण अजिबात फुटणार बिटणार नाही. तो जोर पुरेसा नसेल.''
''ठीक आहे; पण यामुळे भिंतीला आणि स्टील पॅनेल्सना तडे तर जातील. मग अशा डळमळीत पायावर ते धरण काही फार काळ तग धरणार नाही. जलाशयातल्या एवढ्या मोठ्या पाण्याच्या रेट्यानं ते केव्हाच जमीनदोस्त होईल.''
''असं काहीही घडणार नाही. मी स्वत: एक स्ट्रक्चरल इंजिनिअर आहे. धरणासारखी मोठमोठी बांधकामं, आपल्या भिंतीतल्या फटींचा कसा समाचार घेतात ते मला चांगलं माहितीये, खूप मोठ्या भूकंपानंसुद्धा त्यांचं काहीही नुकसान होत नाही. या गोष्टी काही पत्त्याच्या बंगल्यासारख्या कोसळत नाहीत. तिथल्या वाळूचं प्रचंड वजन आणि गुरुत्वाकर्षण, यामुळे आधी ज्या काही फटी पडलेल्या असतील, त्या आपोआप फटाफट बुजवल्या जातील. निमिषार्धात सगळी छिद्रं बंद होतील.''
''पण जर आपण स्फोटांची मालिकाच केली धडाधड एकापाठोपाठ एक... तर त्यामुळे धरण कोसळणार नाही का?''
''प्रत्येक स्फोटागणिक उसळणाऱ्या लाटांची उंची आणि जोर वाढत जाईल. प्रत्येक लाट धरणाच्या भिंतीचा कुठला ना कुठला कोपरा खिळखिळा करण्याचा प्रयत्न करेल; पण तरीही ते संपूर्ण धरण फुटू शकणार नाही.''

''मग यावर उपाय काय?'' सुंदरम् काळजीत पडलेले दिसले. त्यांच्या इतक्या चांगल्या बेतालाच सुरुंग लागायची वेळ आली होती.

''तरंग, दोस्ता आणि कंपनं'' सोमशेखर राव म्हणाले. ''भौतिकशास्त्रातली ही एक अतिशय अनपेक्षितपणे उपयोगी पडणारी संकल्पना आहे. यामुळे पूल पडू शकतात. विमानं धुळीस मिळतात आणि इमारतीही भुईसपाट होतात. ब्रिटनमधला तो ब्रौटन सस्पेंशन ब्रिज आठवतोय ना? काही सैनिकी तुकड्यांनी मार्चिंग करत तो पूल ओलांडला, तेव्हा त्यांच्या बुटांच्या तालबद्ध खडखडाटानं जी कंपनं निर्माण झाली त्यामुळे तो पूल कोसळला. यासापेक्ष आपल्या स्फोटांमुळे निर्माण होणारे एवढे मोठे तरंग काय उत्पात घडवतील त्याची कल्पना करा. काही उस्ताद तबलजी आणि काही गायक आपल्या देहभान हरपायला लावणाऱ्या तालानं आणि तार सप्तकातल्या सुरांनी काचांना तडे पाडतात हे तर ऐकलेलंच आहे आपण.''१

सोमशेखर रावनी एका साध्या ग्लासात थोडी वाइन ओतली आणि एका चमच्याने ग्लासच्या कडेवर हळूच आघात केला. त्यातून जो नाद निर्माण झाला तो त्यांनी लक्षपूर्वक ऐकला आणि मग ते कोपऱ्यातल्या सिस्टिम ३ सिरीयस टर्नटेबलाशी गेले. त्यांनी बेल कान्टोमधल्या ल्युसिआनो पावरोतीच्या ऑपेराची रेकॉर्ड निवडली, लावली आणि ॲम्प्लिफायरचा आवाज मोठा केला; त्यामुळे हमिंग आणि त्याचा प्रतिध्वनी दोन्हीही वाढले. स्वर आधी खर्जात आणि मग हळूहळू सर्वोच्च सप्तकात जाऊ लागले; पण त्यामुळे तसा फारसा फरक पडला नाही. मग त्यांनी हळूहळू आवाज कमी करत नेला. तो सगळ्यात कमी पातळीवर पोहोचल्यावर ते थांबले.

प्रत्येकजण ते काय करताहेत, ते श्वास रोखून पाहात होता. जेव्हा गायकाने खर्ज लावला, तेव्हा अचानक वाइनच्या ग्लासला वरपासून खालपर्यंत तडा गेला आणि क्षणार्धात खळकन् तो ग्लास फुटला.

सोमशेखर राव एकदम तोऱ्यात त्या टर्नटेबलपासून मागे वळले. समोरचे प्रेक्षक हा प्रकार पाहून अक्षरश: स्तिमित झालेले होते. स्मितहास्य करत राव म्हणाले, ''फक्त एक साधीशी एकसंध कंपनमालिका संपूर्ण जग जमीनदोस्त करायला पुरेशी आहे. केवळ यानेच काम तमाम होऊ शकतं. जर थोडी आकडेमोड केली आणि कंपनसंख्या व्यवस्थित नियंत्रित केली, तर आपल्या या अस्त्राने चक्क पृथ्वी दुभंगता येईल.''

सेंट्रल इंडस्ट्रियल सिक्युरिटी फोर्सच्या ॲडिशनल इन्सपेक्टर जनरलनी अचानक संभाषणात भाग घेतला ''माझ्या अटी मान्य केल्याशिवाय मी काही असला आवाजाचा खेळबीळ बिलकूल होऊ देणार नाही.''
ही धमकी ऐकून सुंदरम् बेचैन झाले.''आपलं ठरलं होतं.''
''मी काहीही कबूल केलेलं नाहीये. शिवाय तुम्ही माझे आधीचे पैसेही दिलेले नाहीयेत अजून.''
''कसले पैसे?''
''त्याचं काय आहे मिस्टर अय्यर, तुम्हाला माहिती आहे की, त्या धरणाचा डेप्युटी कमांडंट काही माझ्या हाताखाली काम करत नाही. माझ्याच लेव्हलचा एक दुसरा अधिकारी तिथला मुख्य आहे; पण माझ्यावर सोपवलेलं काम करताना मला ही सगळी अडथळ्यांची शर्यत पार करावी लागली. भारतीय सरकारला पाश्चिमात्य गुप्तचर विभागाकडून खबर मिळाला की, काही विशिष्ट धरणांना दहशतवादी कारवायांचा धोका आहे; ताबडतोब या डायरेक्टर जनरलनी दिल्लीत एक मीटिंग बोलावली. बरीच मखलाशी करून मी डीजींना पटवलं आणि जलाशयापासून खूप दूर अंतरावर त्या दोन नद्यांच्या वरच्या अंगाला वॉचमनची केबिन उभारण्यासाठी राजी केलं. याची अंमलबजावणी करण्याचा अधिकार मलाच दिला गेला. मला अगदी तळागाळातल्या, लहानात लहान तपशिलापर्यंत सगळ्या गोष्टींवर काम करावं लागलं. जर तिथे धरणावर ड्यूटीवर असलेल्या डेप्युटी कमांडंटनी यावर देखरेख करायचं ठरवलं असतं तर हे असलं संवेदनशील काम मी करू शकलो नसतो हे मला माहिती होतं. म्हणून मग मी या डीसीसाठी एक पाच दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम आखला. जेव्हा हा प्राणी या हैदराबादमधल्या एनआयएस ॲकॅडमीत आयोजित केलेल्या प्रशिक्षणासाठी गेला, तेव्हा आम्ही आमचं काम सुरू केलं. काहीही झालं तरी आम्हाला त्या पाच दिवसांत सगळं काम पूर्ण करायचं होतं. सतत वर घिरट्या घालत खाली नजर ठेवणाऱ्या उपग्रहांचा डोळा चुकवून योग्य जागी स्फोटकं पेरणं म्हणजे काही खायची गोष्ट नव्हती. तुम्हाला तर माहितीच आहे की, गव्हर्नमेंटनं धरणांचा प्रदेश अति संवेदनशील ठरवलाय. दर पाऊण तासाला उपग्रहाद्वारे तिथले फोटो काढले जातात हा शिरस्ता आहे. तिथे टपऱ्या उभारल्यानंतर माझी माणसं खणायला लागली, तेव्हा त्या ड्रिलिंग मशीनच्या आवाजाचं पटेल असं कारण द्यावं लागलं

आम्हाला. स्फोटकं तिथपर्यंत आणणं आणि त्या खड्ड्यात पेरणं एवढ्यावरच संपत नव्हतं ते काम. ही सगळी स्फोटकं टायमरशी जोडायची होती; शिवाय क्यू बँड सॅटकॉमबरोबर याच्या फ्रिक्वेन्सीची नाळ जोडायची होती. आम्ही वॉचमनच्या एका केबिनवरच व्हीसॅटचा अँटेना लावून टाकला. इतक्या विपरीत परिस्थितीत काम करत असूनही, आमच्या टीमनं ही अशक्य असलेली गोष्ट फत्ते केली. आत्ता या घडीलादेखील व्हीसॅटवर राष्ट्रीय दूरदर्शनचे कार्यक्रम दिसू शकतात आणि काही उपग्रह रेडिओ स्टेशन्स ऐकू येतात. तुम्ही आरामात घरात बसून रिमोटनं योग्य ती फ्रिक्वेन्सी फिरवू शकता आणि धडाड धुडूमऽऽऽऽ स्फोट घडवून आणू शकता. आता मला आशा आहे मंडळी की, आम्ही काही नुसतं गोट्या खेळण्याचं काम केलेलं नाहीये, हे एव्हाना तुमच्या लक्षात आलंच असेल.''

सुंदरम् अय्यरनी हसून प्रतिसाद दिला. ''शाब्बास रे पट्ठे! आता मला सांगा की, त्या वॉचमनच्या तात्पुरत्या उभारलेल्या टपऱ्यांचं पुढे काय केलंत?''

''त्या अजूनही तशाच आहेत तिथे. सीआयएसएफच्या जवानांचा पहारा आहे त्याभोवती; पण त्या बिचाऱ्यांना कल्पनाही नाहीये की, त्यांच्या पायाखाली काय गाडलं गेलंय ते.''

सुंदरम् अय्यरनी एआयजींच्या फुगलेल्या फुग्याला टाचणी लावायचा प्रयत्न केला. ''छान झालं काम. आता तुमचे आधीचे किती पैसे राहिलेत द्यायचे? मी सगळा हिशोब मिटवूनच टाकतो.''

''दहा लाख डॉलर्स''

''दहा लाख?'' सुंदरम् उडालेच.

''होय मिस्टर अय्यर. मला त्या बंगालच्या नक्षलींना भरपूर रक्कम चारावी लागली.''

सुंदरम्च्या चेहऱ्यावर चिंता पसरली. ''नक्षली लोक काही मोठ्या क्षमतेच्या स्फोटकांची तज्ज्ञ मंडळी नाहीयेत. विशेषत: एवढा मोठा स्फोट घडवणाऱ्या तर नाहीच नाही. त्या मोठाल्या डोंगरांना काहीही होणार नाही या फुसक्या फटाक्यांमुळे. मला वाटतं, तुमचं सगळं गणितच चुकलंय.''

''आधी तुमच्याकडची माहिती नीट तपासून पाहा मिस्टर अय्यर. नक्षलींना कधीही कमी लेखू नका. त्यांच्यापैकी अनेकांनी दगडांच्या उघड्यावाघड्या खाणीत काम केलंय. त्यांनी संपूर्ण डोंगरच्या डोंगर उडवून देणारी स्फोटकं

हाताळली आहेत. या छोट्याछोट्या टेकड्या आणि खडक उडवणं हा त्यांच्या डाव्या हाताचा मळ आहे. त्यांच्याकडची स्फोटकंसुद्धा एकदम मॉडर्न असतात. जर आपलं गणित बरोबर असेल तर तिन्ही टेकड्या एकामागून एक त्या जलाशयात कोसळतील आणि त्यामुळे आधीच ज्या लाटा उसळायला सुरुवात झालेली असेल, त्यांचं त्सुनामीत रूपांतर होईल.''

यावर खूप वेळ विचार केल्यावर सुंदरम् अय्यरनी विचारलं, ''आता पुढच्या कामगिरीसाठी तुम्हाला किती पैसे लागतील?''

''दहा लाख डॉलर्सच हवेत दोस्ता.''

''दहा लाख!''

''अर्थात! तुम्हाला माहिती आहे की, ही सरकारी नोकरी स्वीकारण्यापूर्वी मी संविधानाशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतलीये.''

''आता हिरवी पत्ती बघितली की, तुमची निष्ठा बदलेल.'' यावर त्या अधिकाऱ्यानं काहीच उत्तर दिलं नाही, म्हणून सुंदरम् पुढे म्हणाले, ''जर 'ट्यूपॅक ।।'च्या लोकांनी हे मान्य केलं नाही तर मग?''

''तर मग मी यातून अंग काढून घेईन. माझ्यावर विसंबून राहू नका म्हणून सांगा त्यांना.''

''तुम्हाला कल्पना आहे ना की, गव्हर्नमेंटची नोकरी म्हणजे कधीही बदली होऊ शकते?'' सुंदरम्चा स्वर कडक होता.

''मिस्टर अय्यर, मी बोंब ठोकेन. आपलं मीडिया केव्हाचं दबा धरून बसलंय असलं काहीतरी चविष्ट चघळायला मिळावं म्हणून आणि ही तर कल्पनेच्या बाहेरची अशी सत्यकथा आहे. ज्या कुणाकडे जगाला सांगण्याजोगी अशी एखादी खमंग सनसनाटी गोष्ट असते, त्याला योग्य मोबदला मिळाल्याशिवाय राहात नाही. मी थोडी झलक जरी पेश केली किंवा नुसती हिंट दिली तरी ते जगाच्या अंतापर्यंत माझा पाठलाग करतील.''

सुंदरम्नी मान डोलवली.

एआयजीनी आपल्या खिशातून एक अगदी छोटीशी मेमरी चिप काढली आणि ते पुन्हा फुशारकीने बोलू लागले. ''मी ही चिप माझ्या सेलफोनमध्ये घालीन आणि त्याचा ट्रान्सपाँडरसारखा उपयोग करेन. आत्ता या घडीला मी बसल्या ठिकाणाहून त्या तिन्ही टेकड्या उडवू शकतो. माहिती आहे ना तुम्हाला?''

''तुम्ही किती कर्तृत्ववान आहात ते आम्हाला चांगलंच माहितीये. आता त्या

व्हीसॅटची ट्रान्सपाँडर फ्रिक्वेन्सी आणि स्फोट सुरू करण्यासाठीचा नंबर तेवढा द्या.''

''यात या संदर्भातली एक अगदी छोटी फाइल आहे. फक्त काही कोडवर्डस् आहेत त्यात.'' असे म्हणत एआयजींनी आपल्याकडची ती छोटीशी मेमरी चिप सुंदरम्‌ना दिली. ''क्यूबँड फ्रिक्वेन्सीज एका छोट्या फाइलमध्ये आहेत. कोडवर्डस्‌ची ही चारोळी एक आख्खी टेकडी उद्‌ध्वस्त करेल आणि हा दगड-माती वगैरेचा प्रचंड ओघ भसाभस खालच्या दरीच्या दिशेने सुरू होईल. मजा येईल ना?'' एआयजींनी हसत हसत विचारलं.

''हे थांबवायचं असेल तर काय करायचं?''

''तेही त्याच फाइलमध्ये आहे. तुमच्या बॉसला सांगा, त्याच्या त्या स्पेशल घड्याळाच्या चिपमध्ये सगळं ट्रान्सफर करायला. त्याला हवं तेव्हा तो स्फोटांची मालिका सुरू करू शकेल; पण सुरू झाल्यावर जर हे थांबवायचं असेल तर मात्र त्याला एका ठरावीक टाईमटेबलनुसारच तो कोड वापरावा लागेल.''

''तरीही आणखी एक शेवटची गोष्ट सांगतो. अगदी शेवटच्या घटकेपर्यंत घोड्यांचा लगाम खेचून धरा आणि सगळी जय्यत तयारी झाली की, मगच रेस सुरू करा.'' यावर एआयजींनी मान डोलवली.

मीटिंग संपली. त्यावेळपर्यंत सुंदरम्‌ना मुंबईवर झालेल्या हल्ल्याची काहीही कल्पना नव्हती; तरीही ते चिंताग्रस्त अवस्थेतच कॅनॉट प्लेसला ठेवलेल्या आपल्या गाडीकडे निघाले. ''बैल गेल्यावर झोपा करण्यात काय अर्थ आहे?'' ते गूढपणे म्हणाले.

सुंदरम् बाहेर पडले खरे; पण त्यांना दोन गोष्टींचा भुंगा लागला होता. एक म्हणजे 'तरंग' ही संकल्पना आणि दुसरी होती 'माझ्यावर विसंबून राहू नका' ही एआयजींची धमकी.

काके दा धाबा या एका लोकप्रिय हॉटेलमधला वेटर आणि त्याचा पानवाला मित्र नेहमीसारखे रात्री उशिरापर्यंत गप्पा मारत बसले होते; तेव्हा त्यांनी एका माणसाला बाजूच्या झगझगीत सायबर कॅफेत शिरताना पाहिलं. त्या कॅफेवरची ओपन २४/७ ही निऑन अक्षरं रात्रीच्या अंधारात एकदम चमकत होती.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

◆

पुस्तक परिचय

अडगळ

ल. सि. जाधव यांनी १९७२ मध्ये मराठी विषय घेऊन एम.ए.ची पदवी मिळवली. ते स्टेट बँकेमधून अधिकारीपदावरून निवृत्त झाले. जाधव यांचे 'होरपळ' (मराठी), 'दाह' (हिंदी) हे आत्मकथन, 'सुंभ आणि पीळ', 'मावळतीची उन्हे', 'सं गच्छध्वम' या कादंबऱ्या, 'परतीचे पक्षी' हा काव्यसंग्रह तसेच 'केकतीची फुले', 'तुमचा खेळ होतो पण...', 'भारत माझा देश आहे' आणि 'शूर जवान' हे बालवाङ्मय आदी लेखनसाहित्य प्रकाशित झाले आहे.

जाधव यांच्या 'होरपळ' या आत्मकथनास राज्य शासनाचा लक्ष्मीबाई टिळक उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार, तर 'सुंभ आणि पीळ' या कादंबरीस राज्य शासनाचा उत्कृष्ट दलित साहित्य पुरस्कार, 'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत पुरस्कार, म. सा.प.चा बा. म. जोशी पुरस्कार आणि मधुश्री पुरस्कार तसेच 'मावळतीची उन्हे' या कादंबरीला मनोरमा फाउंडेशनचा पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

ल. सि. जाधव

ल. सि. जाधव यांची 'अडगळ' ही कादंबरी प्रस्थापित दलित लेखकाच्या वयस्क अवस्थेतील अगतिक व साठोत्तरी काळातील दलित साहित्याचा नवा प्रवाह अधोरेखित करते. प्रामुख्याने कथा-कविता व आत्मकथनातून आपल्या वास्तव जगण्याची अनुभूती दाहक, धगधगत्या शैलीतून आविष्कृत करत हा प्रवाह मराठी साहित्यात मिळाला. ल. सि. जाधवांचं साहित्य या प्रवाहात आपल्या वेगळ्या आणि स्वतंत्र ललित-दलित अशा संमिश्र शैलीतून आविष्कृत होऊन एक स्वतःचं खास अस्तित्व म्हणून वेगळेपण दर्शवतं. त्यांचं लेखन वयाच्या सत्तरीत लिहिलेलं असलं तरी ते वयोपरत्वे परिपक्व, वैचारिक भूमिका व मनाची एक स्तब्धस्थिर अवस्था प्रकट करतं, असं जाणवतं. प्रस्तुत कादंबरीत दलित साहित्यिकाचं अस्वस्थ अंतरंग अत्यंत समर्थ शैलीतून हळुवारपणे उलगडत गेलं आहे, असं दिसतं. तरल इंद्रिय संवेदना असोत किंवा मनातील कोमल आंदोलनं असोत, इथं पानोपानी त्यांचं आविष्कृत प्रतिबिंब विस्मयाचा अनुभव देत उमटत राहतं. खोल समजूतदारपणातून जाणवणारी नम्रता त्यांच्या ठायी भरून आहे. हळुवार काव्यात्मकता या कादंबरीत अंगभूत आहे. ती कादंबरीभर जाणवत राहते. ल. सि. जाधवांचं लेखन नुकत्याच उगवलेल्या पानासारखं सतेज, कोवळं नावीन्य प्रकट करणारं आहे. दलित साहित्याच्या प्रवाहात ही कादंबरी नवं स्थान निर्माण तर करेलच; शिवाय मराठी साहित्यातही आपलं वेगळेपण सिद्ध करेल.

- डॉ. प्रा. राजेंद्र दास

बालपणातील परिसर, वातावरण, निसर्ग मनावर खूप खोलवर मुरत असतो. मन तरल, संवेदनशील आणि सुपीक असेल तर खूप हळवेपण त्यावर हुळहुळते, झुळझुळते. अशा वयात आपण खूप सूक्ष्म होतो. आत्ममग्न होऊन जग चक्क विसरून जात असतो. ही तादात्म्य अवस्थाच. कोवळ्या कुसुंबी पानावर नक्षीदार अंग ल्यायलेली गडद हिरवीकाळी अळीदेखील या वयात आपण तल्लीन होऊन निरखत असतो. मी कित्येकदा देहभान हरवून गेलो आणि पाना-फुलांवर हळुवार थरथरत तरळणाऱ्या, अलगद उडत जाणाऱ्या फुलपाखरास डोळ्यांतून आत साठवत गेलो. ती बहुरंगी नक्षीदार फुलपाखरे, पिवळ्या पाकोळ्या, काळ्याशार पाकोळ्या सर्व सर्व मनःचक्षूनं वेचत गेलो. आजही मला त्या सर्व यथावत् स्पष्ट दिसतात. आठवतात.

जोगी वाड्यातील वस्ती गलिच्छ वस्ती म्हणून ओळखली जायची. स्वच्छ मनाची माणसं तिथं गुण्यागोविंदानं राहत असूनदेखील.

मोजकीच मातीभेंड्यांची बुटकी घरं, बाकी सगळी झोपडीवजा, कोपी घालून तंबूसारखी तयार केलेली. अस्ताव्यस्त. मिळेल त्या जागेत घरं घातलेली. नगरपालिकेनं पाहणी करून त्यांना लेआउटचा व्यवस्थित आकार दिलेला. खालचा जोगीवाडा व वरचा जोगीवाडा अशा दोन भागांत विभागलेला. मधोमध प्रशस्त रस्ता. डांबरी. झोपड्यात नसले तरी मोक्याच्या ठिकाणी विजेचे दिवे झगझगीत. चौकात मर्क्युरी दिवा. लख्ख उजेड फेकणारा. दिव्याभोवती किड्यांची ओवाळणी चाले. दिव्याच्या काचआवरणात देहार्पण केलेले किडे साचत.

सकाळ झाली की पोटापाण्यासाठी निघण्याची जोग्यांची धांदल उडे. जोगीवाड्याला लागून एक वाहत्या पाण्याचा सदाबहार कॅनॉल होता. हिप्परग्याचा 'आडवा नळ' नावानं प्रसिद्ध. हिप्परगा तलावापासून निघालेला आणि आडवातिडवा वाहत जवळजवळ पंधराएक किलोमीटर अंतर कापत जोगीवाड्याला कवेत घेऊन डोणगावाकडे विसर्जित झालेला. दुतर्फा प्रचंड झाडी. असंख्य प्रकारची. अजस्र, हिरवीगार. कॅनॉलच्या बाजूला बारमाही बहरलेली शेती, गायरानातही या आडव्या नळामुळे पसरलेली वनराई, शिंदीची बनं, केकताडाच्या असंख्य रांगा. नुसता निसर्गरम्य परिसर. जोगीवाड्याचं दंडकारण्यच. या नळावर, कॅनॉलच्या वनश्रीवर कित्येक जोग्यांची घरं सुखानं जगत होती. मध, डिंक, चिंचा, कवठ, शिंदीचे फडे, केकत असे अनेक व्यवसायांत साहाय्यभूत वृक्ष. पाण्यातील मासे, खेकडे,

झिंगे हेही अधूनमधून पोटाची भूक शमवायला जय्यत असत. पक्ष्यांची तर गणतीच नाही. पोपटांपासून गिधाडापर्यंत असंख्य.

जोग्यांना हा आडवा नळ म्हणजे नंदनवनच. पोटभर खायला नसलं तरी प्यायला उदंड. सकाळच्या अंघोळी आटोपून जोगी लगबगीनं पोटापाण्याला जात. कुणी केरसुण्या, कुणी वाख दोरखंडाची कामं करत. शिंदीचे फडे, केकताडाची केकत आडव्या नळावर विपुल. त्यामुळे पारंपरिक व्यवसाय सांभाळून लोक उदरनिर्वाह करत. हा आडवा नळ आम्हाला जणू आमचा जातगोतावळाच वाटत होता.

नाल्यालगतच्या हागण्या-पोहण्यापासून ते थंडगार सावली, फांद्या जळण इथपर्यंत आडवा नळ जोग्यांची इमानेइतबारे जणू सेवा करे, सांभाळ करीत असे. निसर्गाच्या सान्निध्यात माणूस प्रसन्न राहतो. मला या चिमुकल्या निसर्गसौंदर्यानं अंतर्बाह्य निरामय केलं. मी मनानं समृद्ध झालो. विपुल झाडांनी माझं बालपण जोजवलं. अंकुरलेलं लुसलुशीत कुसुंबी पान ते थरथरत टपटपणारं जीर्ण पिवळं पान, माझे बालपणीचे जीवलगच. कितीतरी पानगळीचा हिशेब मी आर्त मनानं टिपला. अव्याहत वाहणाऱ्या या कॅनॉलच्या पाण्यात ही झाडं आमूलाग्र आपला देह न्याहाळत. मीही पोहताना त्याच्या फांद्या ओंजळीत धरून न्याहाळत असे. एक छंदच. एकरूप होण्याचा. वस्ती तर आडव्या नळानं ओळखली जाणारी.

वस्तीतील घराच्या समोरील अंगणात आम्ही बिनधास्त झोपायचो. ऐसपैस. पथारी कसल्या? गोधडी-वाकळी टाकून. वर आकाशभर चांदणं. झुंबरच. अंधारास लटकलेला चंद्र असला की चांदी पाझरत असे वस्तीभर. वारवसाला झोपणं हा स्वर्गीय आनंदच. उन्हाळ्यातील मौज तर काही औरच. कसली चिंता नाही ना कसली भ्रांत. सुख सुख तरी आणखी काय असते?

आणि इथं!

सिमेन्टची मजबूत घरं पण आत राहणारी माणसं विस्कळीत. जोगीवाड्यातली वस्ती विखुरलेली तरी मनानं, प्रेमानं बांधलेली. इथं तर ओळीत शिस्तबद्ध उभी; पण एकमेकांपासून खूप दुरावलेली. काही देणंघेणं नाही कुणाशी. शिष्ट, आत्मकेंद्रित, माणूस असून नसलेली. ताम्हणकर आमच्याशी असं का वागतात? त्यांचं ते वागणं समर्थक आहे का? हिला हळदी-कुंकवास का नाहीत बोलवत? की दुसरं कारण असेल! असूया?

काही स्पष्ट सांगवत नाही. काही स्पष्ट कळत नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळीच ताम्हणकर आले. 'काळेसाहेब' म्हणत हाक मारत. मी 'या या' म्हणत त्यांना प्रेमानं आत घेतलं. चहापाणी विचारलं.

''कालचा प्रकार उगाच ताणला गेला हो. मलादेखील असं वागायला नको होतं हे नंतर ध्यानात आलं.'' ताम्हणकर असं अगदी नरमाईला येऊन बोलत होते.मी सरळ विचार करतो. गोष्टीत तेढअसते, बोलण्यात लपलेला हेतू असतो, हे मला कधी फारसं ध्यानात येत नसतं; मी गप्प. पुन्हा तेच म्हणाले,

''तुमचा मुलगा ॲट्रॉसिटीचं बोलून गेला.''

मुद्दा ध्यानात आला. मुलगाही घरात होता. एवढं होऊनही तो ''काका नमस्कार'' म्हणत हॉलमध्ये येऊन बसला. सौ. जानकानं पाणी आणलं. दिलं. ताम्हणकरांनी घोटभर घेऊन ग्लास टिपॉयवर ठेवला. निदान ताम्हणकरांनी आमचं पाणी तरी प्यायलं. माझं मन आणखी स्वच्छ होऊ लागलं. मी बोलू लागलो.

''ताम्हणकर! अहो, तुम्ही-आम्ही कायमचे शेजारी-शेजारी हो. चालायचं. शेजारपाजार म्हटलं की थोडंफार खटकायचं. मी समजू शकतो. पण तुम्हास तरीही मोकळेपणानं सांगतो. आम्हीही चांगले शेजारी म्हणून राहू शकतो हो. मुळात आमची अख्खी जिंदगी दलित वस्तीत आणि रानावनात गेलेली. भांडण-तंटे, शिवीगाळ, हाणामारी हा रोजचा खेळ हो तिथं. आम्हालाही असला प्रकार नकोय. कंटाळून गेलो त्याला. इथंही तेच म्हटलं की अवघड आहे. माझं सोडा, मी खूप समजून घेतो; पण आमच्या हिचं...? बरं मी ही खात्री देतो, ती उगाच नाही कुणाच्या वाट्याला जाणार, पण...'' मुलानं मध्येच भाग घेतला.

''तुम्ही काका, लहान मुलांकडे लक्ष देऊ नका. मी तसं का म्हणालो ते आता पप्पांच्याही समोर सांगतो, काकूंनी कम्पाउन्ड वॉलच्या भिंतीवरून तुमच्या आवारातून विंचरलेला केसांचा बुचका आमच्या अंगणात टाकला. मी स्वतः बघितलं. काकू चपापल्या म्हणून...''

मुलास थांबवत मी ताम्हणकरांना स्पष्ट सांगू लागलो, ''ताम्हणकर, बाब किरकोळ असो नसो- पण हेतू वाईट दिसतो. ब्राह्मणांनी दलितांच्या अंगणात किंवा दिशेनं असं फेकणं, कचरा टाकणं याला वेगळा अर्थ प्राप्त होतो हो. आम्ही उलट गलिच्छ वस्ती सोडून तुमच्या संगतीला आलोत.''

''मला हे माहीतच नव्हतं,'' ताम्हणकर काही आर्जवी विनयानं बोलू लागले. ''काळेसाहेब, आम्ही जुन्या पठडीतले नाहीत हो. मनातला गैरसमज

अग्निदिव्य

कल्याणीरमण बेन्नुरवार



किंमत : ४९५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

हिंदवी स्वराज्याचे सरनोबत नेताजी पालकर यांचे मोगलांना सामील होणे, दुर्दैवाने धर्मांतरित होणे आणि प्रदीर्घ काळानंतर परत येणे; महाराजांनी त्यांना कौल देणे व शुद्ध करवून हिंदू धर्मात परत घेणे वगैरे मराठा इतिहासातील घटना अचानक किंवा दैवदुर्विलासाने घडून आलेल्या दुःखद घटना नाहीत, तर महाराजांनी गनिमी काव्याच्या राजकारणाचा एक भाग म्हणून खेळलेल्या एका धाडसी डावपेचाचा आणि सतत सावध राहून धूर्त, चपळ राजकीय खेळी करणाऱ्या औरंगजेब बादशहामुळे फसलेल्या व अंगलट आलेल्या राजकारणाचा अनिवार्य परिपाक होता, असा श्री. कल्याणीरमण बेन्नुरवार यांचा ठाम विश्वास आहे.

अनेक गुप्त मसलतींचे पुरावे कागदोपत्री नोंदवले जात नाहीत; त्यामुळे त्यांचा धांडोळा कागदपत्रांमध्ये घेणे शक्य नसते. परिस्थितीजन्य संदर्भ, पुसटसे उल्लेख व सूचक सूत्रे यांच्या मदतीने तर्कावर आधारित कल्पनेतून अशा मसलतींचा उलगडा करता येतो. अशा प्रकारेच वास्तवांचा वेध घेण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. शिवरायांचे अनुयायी त्यांच्या इच्छेखातर, शब्दाखातर, एका इशाऱ्यासरशी मती गुंग करणारी अतर्क्य साहसे करून अवघडातील अवघड कामे लीलया पार पाडताना दिसतात.

काढून टाका. आमच्या ध्यानीमनीदेखील हे असलं नाही.''

''अहो आता पूर्वीचे दिवस नाहीत राहिले. माहीत आहे.''

सौ.नं ट्रेमध्ये चहाचे कप भरून आणले व ते समोर ठेवत म्हणाली ''घ्या''.

''अहो वहिनी, मी आत्ताच घेऊन आलो. निदान विचारायचं तरी,'' ताम्हणकर नेहमीच्या सुरात बोलले.

''हेच बघा. हाच फरक तुमच्या आमच्यात. तुम्ही 'घेणार का?' म्हणून विचारता. 'चहा टाकू का?' म्हणून विचारत खात्री करून घेता. आमचा सगळा व्यवहार हा असा. रांगडा. कदाचित अशहरी. घरी आलेल्याला चहा देणारच. पटो न पटो.''

आम्ही चहा घेऊ लागलो. तणाव तसा नव्हताच, पण तरीही हलकंहलकं वाटू लागलं. ताम्हणकरांनी चहा घेतघेत मुलास विचारलं,

''सुधीर, शेती काय म्हणते?''

''ठीक आहे काका! ''

''काय आहे शेतात?''

''ज्वारी.''

''अरे वा!''

''काका पंधराएक दिवसात हुरडा भरतोय. जाऊ आपण सगळे.''

''नक्की हो. हुरडा खायला मिळणं दुर्मिळच. फार चांगला बेत असतो. नक्की जाऊ.''

चर्चा झाली. सौ. कशी काय गप्प होती हे तरीही कोडंच होतं. मी तिच्या चेहऱ्याकडे मधूनच पाहत होतो. पण अंदाज लागत नव्हता. पण काहीतरी डोक्यात चाललं होतं. घोळत होतं. चहा घेऊन ताम्हणकर 'येतो' म्हणून निघाले. ही त्यांची बोलणी तहाची होती का आणखी काही, हे कळणं माझ्या कक्षेबाहेरचं होतं.

ताम्हणकर असो, बाजूचे शेटे असो किंवा समोरचे अमणगी, देशपांडे असो- काही हातचं राखून वागत असायचेच. पूर्वीइतकं नसलं तरी अजून अंतर जाणवतंच. सार्वजनिक कार्यक्रमात आम्ही सगळे एकत्र होत असू. गणपतीच्या वर्गणीत आमच्या नोटा सहज मिसळून जात; परंतु पूजा मात्र पुरोहित-ब्राह्मणांचीच अधिकृत. वतीने पूजा चाले; पण हस्ते पूजा नाही. बारीकसारीक

गोष्टींत मला माणसामाणसातला पाळला जाणारा भेद जाणवत असे. जातीयता नष्ट झाली असे आपण म्हणतो, पण पूर्णतः नामशेष झाली असे म्हणता येत नाही. होईलही, नाही असे नाही.

मध्यंतरी माझा दुसरा मुलगा अरुण इरिगेशनमध्ये इंजिनिअर असूनही त्याच्या लग्नासाठी किती यातायात करावी लागली. पहिल्या पत्नीचा घटस्फोट झालेला. दुसरं लग्न इच्छेसारखं होत नाही. सर्व दृष्टीनं तो अनुरूप असूनही घटस्फोटित म्हणून योग्य स्थळं मिळेनात. विवाहसंस्थेत नोंदणी केली. वेबसाइटवर शोध घेऊन फोन करायचो, पण हे कारण आडवं यायचं. पुन्हा त्यात जातीची भर. दै. लोकसत्तात विवाहाच्या जाहिराती पाहायचो, पण त्यात अनेक जाहिरातींत 'एससीएसटी' क्षमस्व' असं असायचं. काय करावं कळत नव्हतं. त्याचं वयही उलटून गेलेलं नव्हतं. कोणत्याही जातीतील अनुरूप मुलगी चालणार होती, पण अडथळे. शेवटी मुलगी मिळालीच नाही. नात्यात शोध घेतला आणि जुळलं. तेव्हा हा अनुभव आता तीव्र होता. याचा अर्थ कसा घ्यायचा?

अनेक प्रथा-परंपरा अजाणतेपणानेही तशाच चालत राहतात. पिढी दरपिढी नवी जुनी पिढी अजून पूर्णपणे हे अकारण लोढणं नाही टाकून देत. आमच्यातही.

अगदी ताजाताजा गमतीचा दुसरा अनुभव- आमच्या जुन्या जोगीवाड्यात जी शिकली ती पिढी वस्ती सोडून चांगल्या ठिकाणी नवी घरं करून राहू लागली. आमचं जुनं घर अजून वस्तीत आहे. वस्तीची नाळ तोडावी असं नाही वाटत. आमच्यासारखंच वस्ती सोडून आमच्या येथील भाऊ थोरो व लगतच्या महारवाड्यातील श्रीकांत मस्के हे शिक्षित आमच्या कॉलनीला लागून असलेल्या श्रीकांत नगरात राहायला आले. दोघेही युनायटेड इन्शुरन्स कंपनीत कामाला. चांगला हुद्दा, चांगला पगार. कौतुकाची बाब म्हणजे दोघांनी आपल्या आई-वडिलांना बरोबर आणलेलं. मला दोघंही चांगले परिचित. माझ्यावर त्यांची श्रद्धा. दोघांचेही वडील मला खूप मान देतात. अदबीनं बोलतात.

मी सहज म्हणून भेटायला गेलो. ड्रीम रेसिडेन्सीत दोघांचे ब्लॉक ग्राउंड फ्लोअरला समोरासमोर. दोघांना मी आल्याचं खूप आवडलं. प्रत्येकानं नवं घर आवर्जून दाखविलं. हॉलमधील किमती सोफादेखील. सगळं नवंकोरं. पण अंथरूण जुनंच. जुनं घोंगडं, जुनी वाकळ, जुनी चादर, हे पाहून मला काही बरं वाटलं नाही. दोघांना नवं घ्या म्हणून सुचवलं. म्हणाले, 'ऑर्डर दिलीय,

फर्निचर येऊ लागलंय अगदी डनलपिलो गादीसह. मग बरं वाटलं. चहापोहे घेऊन झाले. वस्तीच्या गप्पा झाल्या. आई कोपरा धरून बसलेली. वडील उभेच. मीच म्हणालो, 'भगवानराव बसा ना.', 'होय होय, हाय की' म्हणत नीलकमल खुर्चीवर टेकले. मी दोघांच्याही वडिलांचं कौतुक केलं. 'तुमच्या कष्टांना फळ आलं' म्हणालो.

आणि ते खरंच होतं. वस्तीत डहाळा, बोरं, कणसं विकून जगणारी अडाणी माणसं. मुलांना छान शिकवतात. मुलंही शिकतात. ग्रॅज्युएट होतात. चांगल्या नोकरीस लागतात. गलिच्छ वस्ती सोडून चांगल्या एरियात राहायला येतात... हे कौतुकाचंच की.

मी निघालो. दोघांच्या वडिलांना खासगीत त्यांना धन्यवाद द्यावेत व आता नव्या ठिकाणी कसं वाटतं हे विचारावं, म्हणून बाजूला घेऊन विचारलं. मस्केचे वडील म्हणाले, 'सायब, होय तुम्ही कवतिक करता बरुबर हाय; पन येक लय मोठी चूक केली भाड्यानं.' 'काय हो, कोणती?' 'काय सांगू, घर हितं घ्येया नकू व्हतं. त्या जोगड्याचं रोज रामपाऱ्यात त्वांड बगावं लागतंया की वो.'

थोरोचे वडीलही नेमकं असंच म्हणत होते, 'काय चांगलं म्हंताव, रोज उटून सकाळ सकाळ म्हाराचं त्वांड बगायचं साडंसाती.'

मी अवाकच झालो.

जातीयता, अस्पृश्यता वाण्या-बामणांनी अजूनही पाळली म्हणून त्यांच्या नावानं बोटं मोडायची, तर या दोघांच्या वडिलांची अजब नाराजी यास काय म्हणायचं? हीही अस्पृश्यांतील अस्पृश्यता. आणखी खोल.

मनुस्मृती जाळूनही ती काही स्मृतीतून, कृतीतून जात नाही.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

◆

काळोखाचे थेंब

प्रभाकर नारायण परांजपे



किंमत : १५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

एक एक व्यक्ती म्हणजे काळोखाचा एक एक थेंब. आपल्यातल्या काळोखाला आकार देत, 'अर्थ' देत; प्रत्येक थेंब काही क्षण थरथरत राहातो आणि कधीतरी अचानकपणे ओघळून जातो. पण सगळ्यांनाच आपल्यातला अंधार आकळतो असं नाही. ज्यांना तो आकळतो त्यांना आपली असहायता उमगते, असहायतेतली अपरिहार्यता जाणवते.
आपल्या असहायतेवर, तात्पुरती का होईना, मात करायचा एकच उपाय त्यांना दिसत असतो. धडपडत, हातपाय मारत, जगत राहणं आणि त्या जगण्याचा आविष्कार शब्दबद्ध करणं.

पुस्तक परिचय

नाना आणि महादजी

कुंदन तांबे वाणिज्य शाखेचे द्विपदवीधर असून, राज्य वित्तीय महामंडळातून सेवानिवृत्त झाले. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांना लेखनाची आवड असून, विद्यार्थिजीवनातच साहित्य सूची, एकता, कादंबरी इत्यादी अनेक मराठी मासिकांतून त्यांच्या लेख, कविता, लघुकादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या.

२००७ मध्ये प्रसिद्ध झालेली थोरले बाजीराव पेशव्यांवरील 'बाजी' ही त्यांची कादंबरी खूप गाजली. वाचकप्रिय ठरली. त्यांच्या महाकवी कालिदास आणि शिवरायांवरील कादंबऱ्यासुद्धा रसिकांना आवडल्या. अनेक वृत्तपत्रांनी या कादंबऱ्या तसेच 'सिनेसंगीताची बखर' या पुस्तकाची गौरवपूर्ण दखल घेतली. तांबे यांचा फलज्योतिषाचा गाढा अभ्यास असून, ते ज्योतिषपंडित आहेत.



कुंदन तांबे

...थोरल्या माधवराव पेशव्यांच्या सन १७७२ मधील अकाली मृत्यूमुळे मराठेशाहीवर पानिपतच्या पराभवापेक्षा मोठा घाव बसला. त्यातच नारायणरावांचा खून, राघोबादादांमुळे पडलेली फूट आणि इंग्रजांच्या कारवायांमुळे मराठेशाही बुडणार असा रंग दिसू लागला.

– पण दोन व्यक्तींच्या असामान्य कर्तृत्वामुळे मराठेशाही वाचली आणि पुढे कळसाला पोहोचली. ही दोन कर्तृत्ववान माणसे म्हणजे नाना फडणीस आणि महादजी शिंदे!

या दोघांच्या संयुक्त कामगिरीचा मागोवा घेणारी कादंबरी.

मध्यान्हीची वेळ होती. शनिवारवाड्याच्या ईशान्य टोकाला म्हणजे पार्वतीकाकूंच्या महालाच्या बरोबर विरुद्ध टोकाला असलेल्या आपल्या महाली राघोबादादा त्यांच्या सहकाऱ्यांबरोबर हास्यविनोद करत बसले होते– उपस्थितांमध्ये पानाची तबकं फिरत होती.

''अखेर आलेच की नाही सल्ला मागायला– अजून विशीत नाही प्रवेश केला अन् शहाणपणा करत होते! शेवटी आले दादासाहेबांना शरण...'' चिंतो विठ्ठल हसून म्हणाले.

''पण दादासाहेबांनी पेशव्यांची चांगली जिरवली– म्हणाले नारायणा, आता का सल्ला मागायला आलास? थोडक्यात, ''तेव्हा कुठे गेला होता राधासुता तुझा धर्म असंच विचारलं ना दादासाहेबांनी...'' मांडीवर थाप मारत भवानराव प्रतिनिधी म्हणाले. ''आता पळता भुई थोडी होईल– गारद्यांशी वाटाघाटी करायच्या म्हणजे काय थट्टा आहे– डोकेफिरू लोक ते...'' मोरोबादादा म्हणाले. हे सर्व ऐकताना राघोबादादा गालातल्या गालात हसत होते. त्यांना स्वत:ची स्तुती ऐकून आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या.

एवढ्यात चिंतो विठ्ठल म्हणाले, ''पण सखारामबापू कुठे आहेत? दादासाहेबांनी पेशव्यांची जिरवलेली कळल्यावर त्यांना मोठं समाधान वाटलं असतं. कारण त्या दिवशी भर दरबारात पेशव्यांनी बापूंचा उपमर्द केला– तुम्ही लेल्यांची वकिली का करताय म्हणून...''

''तुम्हा सर्व मंडळींच्या राजकारणांमुळे आमच्या बापूंचं मन त्रस्त झालं आहे... त्यांना हल्ली रात्री झोप लागत नाही, अशी त्यांच्या कुटुंबाची तक्रार आहे...'' देवघरातून बाहेर आलेल्या आनंदीबाई फणकाऱ्यानं म्हणाल्या.

''हे तुमचं आपलं काहीतरीच वहिनीसाहेब– उलट पेशव्यांचं आता कसं होणार म्हणून बापूंना झोप लागत नसेल–'' मोरोबा म्हणाले.

हे ऐकून राघोबादादा मोठ्यानं हसले.

एवढ्यात बाहेरून शिपायांचं बोलणं, शस्त्रांचा खणखणाट व घोड्यांच्या टापांचा आवाज, बराच गलका ऐकू येऊ लागला.

''बाहेर हा कसला गलका होतोय?'' आनंदीबाई म्हणाल्या.

''अहो, पेशवे मातोश्रींचा सल्ला विचारून गंगापुराहून आले असतील...'' मोरोबा कुचकटपणे म्हणाले.

''छे! पेशव्यांची स्वारी सकाळीच वाड्यावर आली.''

पुढचे तर्कवितर्क कुणी करणार एवढ्यात सखारामबापू बोकील घाईघाईनं

आत आले. त्यांचा चेहरा पडला होता.

''दादासाहेब, घात झाला...'' घाईनं ते म्हणाले.

''बोला बापू...''

''दादासाहेब, आपल्या निवासस्थानांवर गारद्यांचा पहारा ठेवण्यात येतोय... अन् हुजुरातीचं छोटं पथकही बंदोबस्तात तात्पुरतं सामील आहे. आपल्याला नजरकैदेत ठेवण्यात आलं आहे!''

''नजरकैद?'' राघोबा घोगऱ्या आवाजात म्हणाले.

''होय दादासाहेब, पेशव्यांचा तसा हुकूम आहे...'' दरवाजातून आवाज आला.

सगळ्यांनी चमकून तिकडे पाहिलं. हुजुरातीचे सेनापती हरिपंत फडके आत आले.

''हरिपंत, हा काय तमाशा आहे?''

''तमाशा नव्हे, ही वस्तुस्थिती आहे! आम्ही केवळ हुकमाचे ताबेदार! दादासाहेब, आजपासून पुढील हुकूम होईपर्यंत आपण, वहिनीसाहेब व अमृतराव यांना निवासस्थान सोडून जाता येणार नाही!! बाकीच्यांचं जाणं-येणं, नित्याचे व्यवहार नेहमीप्रमाणेच सुरू राहतील. सुमेरसिंग गारद्याच्या पथकाचा पहारा अष्टौप्रहर सुरू राहील...''

''हरिपंत तात्या, हे बरं नव्हे! याचे परिणाम चांगले होणार नाहीत!'' राघोबादादा धमकावणीच्या स्वरात म्हणाले.

पण हरिपंतांवर त्याचा काहीही परिणाम झाला नाही.

''आपल्या भावना मी पेशव्यांना कळवतो...'' एवढं बोलून ते दरवाजातून बाहेर पडले.

राघोबांच्या महालातील मंडळींमध्ये एकच खळबळ उडाली.

❋ ❋ ❋

नाना फडणीसांना चित्रसंग्रहाचा मोठा जबरदस्त छंद होता. निरनिराळ्या चित्रकारांनी काढलेली देवादिकांची व प्रसिद्ध व्यक्तींची सुंदर चित्रं त्यांनी जमवली होती आणि वाईजवळील मेणवली गावच्या आपल्या वाड्यात हा संग्रह ठेवला होता. आत्तासुद्धा 'मस्तानीबाईसाहेबांचं अस्सल चित्र' आपल्याजवळ आहे असा दावा करणाऱ्या एका संग्राहकाला त्यांनी मेणवलीला बोलावलं होतं. त्याच्याजवळून जरा जास्तच किमतीला ते विकत घेतलं होतं– शिवाय थोरल्या बाजीरावसाहेबांचं अस्सल चित्र मिळवून देण्याचं आश्वासनही त्याच्याकडून

घेतलं होतं...

...त्यामुळे दोन दिवसांचा मुक्काम आटोपून मेणवलीहून ते पुण्याला परतले तेव्हा जरा खुशीतच होते. बुधवारातील आपल्या निवासस्थानी ते परतले तेव्हा संध्याकाळ होऊन दिवेलागण झाली होती.

आपण आल्याचे आपल्या कुटुंबाला– अन्नपूर्णाबाईंना– सांगून ते माडीचा जिना चढून आपल्या खासगीकडच्या खोलीत शिरले– आणि चकितच झाले! त्यांच्या बुटक्या मेजाजवळच असलेल्या बैठकीवर, भिंतीजवळच्या तक्क्याला टेकून सखारामबापू बसले होते...

...तसे दरबारी कामांव्यतिरिक्त बापूंशी त्यांच्या खासगी भेटी क्वचितच होत असत. एकमेकांच्या घरी ते क्वचितच जात-येत असत. शिवाय आधीपासूनच बापूंचा ओढा राघोबादादांकडे तर नानांचा थोरल्या माधवरावांकडे असल्याने तशी त्यांची घसट नव्हती; पण एकमेकांच्या मुत्सद्देगिरीविषयी दोघांनाही आदर होता. तसेच राघोबांशी नानांनी व्यक्तिगत संबंध एवढे चांगले ठेवले होते की, 'सगळ्यांच्या तक्रारी दादासाहेब नानांजवळ सांगतात.' असा प्रवाद लोकांमध्ये पसरला होता– बापूंनाही याची जाणीव होती.

मग आत्ता बापू कशासाठी आले होते? नाना मनाशी अटकळ बांधत होते.

कोनाड्यातील दिव्याची वात साफ करून, त्याची ज्योत मोठी करत नाना म्हणाले, ''आत्ताच मेणवलीहून परतलो... काय बापू, काही विशेष?''

आपल्या मेजाजवळील लोड-तक्क्याला टेकून बसलेल्या नानांकडे पाहून बापू गंभीरपणे म्हणाले, ''नाना, तुम्ही पुण्यात नसलात की काहीतरी नवीन घोटाळे उत्पन्न होतात– आणि माझ्या डोक्याला ताप होतो...''

''एवढं काय घडलं बापू?''

''नजरकैदेत ठेवल्यापासून दादासाहेबांचा तोल सुटला आहे! दोन दिवसांपूर्वी रात्री त्यांनी स्थानबद्धतेतून सुटका करण्याचा प्रयत्न केला...''

''म्हणजे पळून जाण्याचा?'' नाना निर्विकार चेहऱ्यानं म्हणाले.

''पाहिजे तर तसं म्हणा! पण शनिवारवाड्यातून पळणं ही काय सोपी गोष्ट आहे? त्यामुळे प्रयत्न फसला... गारद्यांनी पुन्हा त्यांना पकडलं व पहारे कडक केले.''

''पळून जाणं ही कल्पना कुणाची? बापू, तुमची तर नक्कीच नसणार!''

''सांगितलं ना दादासाहेबांचा तोल सुटला आहे म्हणून– मी काय किंवा

मोरॅलिटी फॉर ब्यूटिफुल गर्ल्स

अलेक्झांडर मॅक्काल स्मिथ

अनुवाद
नीला चांदोरकर



किंमत : २२०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

द नं. वन लेडिज डिटेक्टिव्ह एजन्सी या मालिकेतील हे तिसरं पुस्तक. मनाला भुरळ पाडणारी प्रेश्यस रामोत्स्वे सध्या घरी आणि व्यवसायामध्येही अडचणींना तोंड देतेय. तिच्या संस्थेला आर्थिक संकटानं घेरलंय. शेवटी तिनं एक मोठा निर्णय घेतलाय-आपले भावी पतिदेव श्री. जे. एल. बी मातेकोनी यांच्या मोटारदुरुस्ती गॅरेजच्या इमारतीत आपल्या ऑफिसचं बस्तान हलवायचं.

या संकटाचा सामना करण्यासाठी ती मनाचं बळ एकवटतेय तेवढ्यात तिला तिच्या व्यवसायात एका वेगळ्याच समस्येला तोंड द्यावं लागतंय- तिच्या काही अशिलांनी तिची मति गुंग करून टाकलीय; एका सरकारी अधिकाऱ्यांनी तिला स्पष्ट शब्दांत सांगितलंय, 'माझी भावजयच माझ्या भावावर विषप्रयोग करतेय'; एका सौंदर्यस्पर्धेतील महिला उमेदवारांच्या देखण्या रुपड्यामागे दडलेल्या मनाचा निर्मळपणा तपासून पाहण्याची जोखीम तिच्यावर येऊन पडलीय; अचानकपणे काही लोकांना एका संपूर्ण नग्नावस्थेतील मुलाचा शोध लागलाय- त्याचं रानटी प्राण्यासारखं वागणं, त्याच्या अंगाला येणारा हिंस्र सिंहाचा वास...

मोरोबा अथवा चिंतो विठ्ठल काय, असला मूर्खपणाचा सल्ला देऊ काय? पण हल्ली दादासाहेब व आनंदीवहिनी मधूनच त्या तुळाजी पवाराच्या फार आहारी जातात आणि मग चुकांमागून चुका घडतात– शेवटी एका हुजऱ्यांचं किती ऐकायचं यालाही काही मर्यादा आहे की नाही?''

''खरं आहे...''

''हा प्रयत्न फसल्यावर दादासाहेबांनी रागारागानं अन्नत्याग केला! नारायण आमचे हाल करतो, विपत्ती सोसवत नाही तेव्हा आनंदी व दत्तकपुत्र अमृतरावासह प्राण देतो असा थयथयाट केला! हे सांगायला श्रीमंत नारायणरावांकडे गेलो तर त्यांनी चेष्टेचाच सूर लावला– शिवाय आता सूर्यदर्शनासाठी देखील बाहेर पडायचं नाही अशी दादासाहेबांना ताकीद दिली. दादासाहेबांना हे समजल्यावर त्यांनी एका मांत्रिकाला महाली बोलावून श्रीमंतांच्या पदच्युतीचा संकल्प धरून, कसलेसे उग्र अनुष्ठान सुरू केलेय...''

''काय सांगता काय बापू– पेशव्यांच्या कर्त्या पुरुषाकडून हे असलं अनुष्ठान?''

''होय नाना. श्रीमंत गंगापुरी असलेल्या मातुश्रींच्या– गोपिकाबाईंच्या– सल्ल्यानं तर्कटपणे अन् बालिशपणे वागतात तर दादासाहेब तुळाजीच्या नादानं काहीतरी वेडपटासारखं करतात!''

''बापू, हे असलं ऐकलं की, याच शनिवारवाड्यानं थोरले बाजीरावसाहेब, श्रीमंत नानासाहेब, श्रीमंत माधवराव अशी कर्तबगार माणसं मराठेशाहीला दिली, यावर विश्वास बसत नाही– शिवाय यात मुत्सद्दी चिमाजीअप्पा आणि पानिपतावर गमावलेली रत्नं भाऊसाहेब व विश्वासराव यांचं नाव राहिलंच!'' नाना पोटतिडकीनं म्हणाले.

''खरं आहे नाना, अगदी खरं– पण आता ही आग विझलीच पाहिजे! आपण काहीतरी केलं पाहिजे...'' बापू म्हणाले.

''आपण...'' हा शब्द ऐकून नाना चमकले. माधवरावांच्या काळापासून बापूंमधल्या थोर मुत्सद्याला जसं नाना ओळखून होते, तशी त्यांची सत्ताभिलाषासुद्धा त्यांना परिचयाची होती. दादासाहेबांच्या बाजूनं प्यादी हलवत, काही काळ माधवराव पेशव्यांना सखारामबापूंनी कसं अडचणीत आणलं होतं ते त्यांना आठवलं– केवळ ते माधवरावच होते व त्यांना नानांची साथ होती म्हणून ते निभावून गेले...

''बापू, तुम्हाला खरं सांगू, कौटुंबिक वादात आपण पडू नये असा मी

केव्हाच निर्णय घेतला आहे– आम्हा भानूंच्या घराण्याकडे 'फडणिशी' म्हणजे दफ्तर ठेवण्याचं काम व कारकुनगिरी आहे; तीच मी पुढे चालवत आहे– मी काही कुणी मुत्सद्दी नव्हे, शिवाय मला तलवारही चालवता येत नाही! बापू, तुम्ही काय, नागपूरकर भोसल्यांचे कारभारी देवाजीपंत काय किंवा निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर काय; तिन्ही 'पूर्ण' शहाणे! मुत्सद्देगिरी व तलवारबाजीतही प्रवीण! आम्ही पडलो अर्धेच शहाणे! तेव्हा राजकारणाच्या भानगडीत मी न पडलेलंच बरं. शिवाय पेशव्यांनी एखादे वेळी माझं ऐकलं तर मातुश्री गोपिकाबाईंनाही आवडत नाही की, आनंदीबाईसाहेबांनाही आवडत नाही– तेव्हा कौटुंबिक वाद ज्याचे त्यानं सोडवावे. आम्ही फक्त मराठी दौलतीचे एकनिष्ठ सेवक...''

''पण नाना, हे तुमचं अलिप्तपण मराठी दौलतीच्या मुळाशीच आलं तर? कारभारात अराजक व गोंधळ माजला तर? आधीच सातारा दरबारात छत्रपती रामराजांचे कान फुंकणारे स्वार्थी लोक आहेत... छत्रपतींनी वैतागून पेशवाईची वस्त्रं नारायणरावांकडून काढून घेतली तर?'' बापूंनी नानांना विचारलं.

''तर तो दैवदुर्विलास समजावा...'' नाना ठामपणे म्हणाले.

अखेर बापूंनी हार पत्करली. मोरोबा त्यांना म्हणालेच होते, 'या नानाच्या अंत:करणाचा थांग तुम्हाला लागणार नाही. म्हणून!' शिवाय बोलण्यावरून तरी नाना काहीच हालचाल करायला तयार दिसत नाहीत. उगीच बोलणं रेटण्यात काहीच अर्थ नाही.

''ठीक आहे नाना– पण माझ्या बोलण्यावर पुन्हा एकदा विचार करून ठेवावा–'' असं म्हणून बापू जायला निघाले.

नाना फक्त किंचित हसले.

बापू गेल्यावर त्यांनी टाळी वाजवून खाशाबाला बोलावून घेतलं. म्हणाले, ''चंद्रीला म्हणावं दादासाहेबांच्या महाली कोण कोण मंडळी येतात-जातात यावर बारकाईनं लक्ष ठेव, माहिती काढत राहा.''

* * *

...पुण्याच्या पश्चिमेला सह्यगिरीच्या दुर्गम पर्वतरांगा ओलांडल्यावर जो कोकणपट्टीचा समुद्रकिनारा होता, त्याला लागून टोपीकर इंग्रजांचं एक प्रमुख ठाणं होतं– मुंबई! या मुंबापुरी नगराचं नाव अजून फारसं कुणाला माहितीही नव्हतं– राजकारणाच्या दृष्टीनं मोगलांचं दिल्ली अन् मराठ्यांचं पुणं यांच्या एक शतांशही महत्त्व त्यावेळी मुंबईला नव्हतं; पण टोपीकर इंग्रजांच्या 'ईस्ट इंडिया

कंपनी'चं हिंदुस्थानातील कलकत्ता, मद्रास येथील ठाण्यांच्या खालोखाल 'बॉम्बे प्रोव्हिन्स' मानलं जायचं...

...त्या रात्री मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यावरील 'फोर्ट जॉर्ज'मधील आपल्या ऑफिसमध्ये गव्हर्नर हॉर्नबी बसला होता. त्याच्या मागच्या भिंतीवर कंपनीचं लंडन येथील मुख्यालय, बकिंगहॅम पॅलेस, थेम्स नदीचा देखावा अशी निवडक तैलचित्रं लटकावली होती. त्याच्या समोरच्या टेबलावरील नक्षीदार कँडल स्टँडमधील मेणबत्तीच्या प्रकाशात, टेबलावरच ठेवलेला पृथ्वीचा गोल चमकत होता.

हॉर्नबीच्या समोरच पुणे दरबारातील इंग्रजांचा वकील मॉस्टिन बसला होता– प्रवासामुळे तो दमला होता. पुण्याहून घोडेस्वारी करत मुंबईला यायचं म्हणजे काही गंमत नव्हती. सह्याद्रिच्या दुर्गम पर्वतरांगा ओलांडणं म्हणजे कसलेल्या घोडेस्वाराचीही हाडं खिळखिळी व्हायची.

''बोला मॉस्टिन, काय बातमी आणली तुम्ही?''

''मिस्टर हॉर्नबी, पेशव्यांच्या दरबारात सध्या गृहकलहाचा व भाऊबंदकीचा खेळ भलताच रंगला आहे...''

''पण मॉस्टिन, यात नवीन काय आहे? माधवराव पेशव्यांच्या काळापासून ते चालत आलं आहे.''

''तसं नाही– आता आग फारच वाढत चाललीय. नुकतंच पेशव्यांनी राघोबादादाला कैदेत टाकलं!''

''अरेच्या, मग प्रकरण फारच पुढे गेलं...''

''पण राघोबाही स्वस्थ बसलेला नाही. त्यानं त्याच्या बाजूला माणसं जमवायला सुरुवात केली आहे– सखारामबापू बोकील, मोरोबादादा वगैरे मुत्सद्दी मंडळी तर त्याच्या बाजूची आहेतच; पण भवानराव प्रतिनिधीसारखा सातारा दरबारात वजन असलेला माणूसही राघोबाच्या बाजूला आहे. मध्यंतरी होळकरांचे कारभारी नारो गणेश, मुधोजी भोसल्यांचा एक वकील वगैरे मंडळी राघोबाला येऊन भेटून गेली...''

''पण महादजी शिंदे कुणाच्या बाजूला आहे? आणि तो महाधूर्त नाना फडणीस?''

''त्यांचा अजून काही थांगपत्ता लागत नाही.''

''मग लक्षात ठेवा मॉस्टिन, रात्रंदिवस शनिवारवाड्यावर लक्ष ठेवा! जर राघोबा आणि पेशवे यांच्या बेबनावाचा फायदा आपण घेऊ शकलो,

मराठ्यांमध्ये फूट पाडू शकलो तर अख्खा हिंदुस्थान आपला होईल– कारण मुघलांमध्ये आता काही दम राहिलेला नाही. ते महादजीच्याच तंत्रानं चालतात. हैदर, निजाम, शीख वगैरे एकांडे शिलेदार आहेत– मराठ्यांचा पराभव झाला तर आपल्या कंपनीचा फायदाच फायदा! साऱ्या हिंदुस्थानची योजनाबद्ध लूट करता येईल!'' हॉर्नबी मोठ्या उत्साहानं म्हणाला.

''आणि या साऱ्यातून पैसा मिळाला तर बॉम्बे प्रोव्हिन्स तोट्यातून फायद्यात येईल; शिवाय वुई विल बी प्रमोटेड!'' मॉस्टिनही आनंदानं म्हणाला.

''म्हणूनच डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवा आणि माझ्याकडे बातमीपत्र देत राहा...'' आपल्या हातानं पृथ्वीचा गोल फिरवीत गव्हर्नर हॉर्नबी म्हणाला...

❋ ❋ ❋

अशा प्रकारे शनिवारवाड्यातील बेबनावाचे पडसाद सर्वत्र उमटत असताना दोन जावांमुळे गृहकलहात आणखी भर पडत होती– गोपिकाबाईंनी आपल्या मुलाला म्हणजे पेशव्यांना अधिकार गाजवण्याचा सल्ला दिला होता आणि ते मागचापुढचा विचार न करता तो अमलात आणत होते, तर आपल्या पतीराजांनी सर्व कारभार ताब्यात घ्यावा म्हणून आनंदीबाई त्यांना चेतवत होत्या.

...यामुळे गोंधळात भर पडेल अशा अनेक घटना घडू लागल्या.

नागपूरचे राजे जानोजी भोसले यांचा मृत्यू झाल्यानं साबाजी व मुधोजी या त्यांच्या दोन मुलांमध्ये सिंहासनासाठी स्पर्धा सुरू झाली. नारायणराव पेशव्यांनी साबाजीला पाठिंबा दिला तर राघोबांनी मुधोजीला– पण बापू व नानांनी कसातरी दोन भावांमध्ये समेट घडवून आणला; त्यानुसार मुधोजीच्या मुलाला गादीचा वारस नेमण्यात आलं; पण जेव्हा नागपूरकर भोसल्यांचे वकील पुण्याला आले तेव्हा त्यांनी राघोबांना पेशव्यांविरुद्ध मदतीचं आश्वासन दिलं. यामुळे चिडलेल्या नारायणरावानं आईच्या– 'गोपिकाबाईंच्या– सल्ल्यानं एका रात्रीत पूर्वीचा निर्णय फिरवून साबाजीला गादीचा वारस जाहीर केलं! बापू व नाना तोंडघशी पडले...

...अशा रीतीने वाद वाढू लागल्यावर कैदेत असलेल्या राघोबांचं डोकं चांगलंच भडकलं व पेशव्यांविरुद्धच्या गटातील लोकांची ऊठबस बदामी महालात वाढत चालली. उन्हाळा संपला. पावसाळाही संपून पुण्यातील प्रसिद्ध गणेशोत्सव जवळ आला, तसा खलबतांनाही ऊत आला...

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

◆

अभिप्राय

खिळवून ठेवणारं रहस्य...

कॅलिस्टो

लेखक	:	टोर्स्टन क्रोल
अनुवाद	:	उज्ज्वला गोखले
पृष्ठसंख्या	:	३६४
किंमत	:	३९५/-

‘कॅलिस्टो’ ही अमेरिकेतील एका निर्जन प्रदेशाच्या पार्श्वभूमीवरील अनुवादित मराठी कादंबरी. विलक्षण रहस्यमय आणि तितकीच रंजक. एकामागोमाग एक अनपेक्षित घटना कशा घडत जातात आणि त्यातून ओडेल डीफस या तेवीस वर्षांच्या निग्रोसारख्या दिसणाऱ्या देखण्या, उंच, धिप्पाड आणि बेरोजगार असलेल्या अमेरिकन तरुणाचं आयुष्य वाऱ्याच्या वेगाप्रमाणे कसं भरकटत जातं याची ही विलक्षण गुंतागुंतीची उत्कंठामय कथा...

प्रसिद्ध पाश्चात्त्य कादंबरीकार टोर्स्टन क्रोल यांनी लिहिलेल्या या जाडजूड कादंबरीचा मराठी अनुवाद उज्ज्वला गोखले यांनी अतिशय साध्या, सोप्या आणि सुबोध मराठी भाषेत केला आहे की, आपण परकीय कादंबरीचा अनुवाद वाचत आहोत असं वाचकांना वाटणारही नाही.

यातील नायक ओडेल डीफस आत्मनिवेदनातून ‘फ्लॅशबॅक’ पद्धतीने आपली कहाणी सलग सांगतो. मुळात तो राकट असला तरी अतिशय संवेदनशील आहे. जीवनाकडे पाहण्याची त्याची दृष्टी विनोदी, खेळकर आणि बिनधास्त आहे. तो फारसा शिकलेला नाही.

अमेरिकन सैन्यात भरती होऊन इराकशी चाललेल्या युद्धात दहशतवादी कट्टरपंथी मुस्लिमांचा बदला घ्यावा या भावनेने तो पछाडलेला असला, तरी आपल्या नोकरीचा प्रश्न सुटेल हा त्यामागचा खरा हेतू असतो. तो लष्करी भरतीसाठी कॅलिस्टो येथे जायला निघतो. त्या प्रवासात त्याची खटारा मोटार वाटेत बंद पडल्यावर तो त्या निर्जन परिसरातील एका जुनाट घरात पाणी प्यायला जातो. त्यानंतर त्याच्या जीवनात जे चक्रीवादळ घोंघावत येतं त्याची ही अतर्क्य कोटीतील कथा. एकामागून एक संकटं त्याच्यावर कोसळत जातात आणि त्यांना तोंड देताना त्याची उडणारी त्रेधातिरपीट आणि भंबेरी त्याच्यापुढे आणखी नवनवीन संकटं उभी करते.

ओडेल डीफस हा तरुण आणि तिथे त्याच्या जीवनात येणाऱ्या गूढ व्यक्ती यांच्या पाठशिवणीचा हा खेळ त्याला यातनाचक्रात गुरफटवून टाकतो. त्या गुंतागुंतीची ही कहाणी ब्लॅक कॉमेडीसारखी. पण अतिशय उत्कंठावर्धक आणि ओघवती. ही ओडेल डीफसच्या जीवनात घडणारी कथा असली तरी, ती अमेरिकन प्रशासकीय यंत्रणांच्या काळ्या बाजूवर नकळत प्रकाश टाकते.

इथे एक स्त्री पोलीस आणि तिचे सहकारी ड्रग्जचा धंदा करतात. तुरुंगातील कैद्यांना ड्रग्ज पुरवतात. निरागस ओडेल डीफस केवळ एका चुकीच्या वळणामुळे ठरवलेली वाट चुकतो आणि विक्षिप्त, तऱ्हेवाईक इसम ड्रग्ज विकणारे अट्टल बदमाश, कट्टर धर्मपंधीय आणि कुटील पोलीस यांच्या ढोंगी, अत्याचारी, खुनी विश्वात कसा फसत जातो याची ही कहाणी अमेरिकेच्या काळ्या विश्वाची सफर घडवून आणते.

नीतिनियम बासनात गुंडाळून ठेवलेल्या चित्रविचित्र स्वभावांचं विदारक दर्शन इथे घडतं. त्या घरातील इस्लामी दहशतवादाकडे झुकलेला तरुण डीन लोरी, त्याची पोलीस असलेली बहीण लोरेन, खून करून फ्रीझरमध्ये लपवलेली ब्री मावशी, ख्रिश्चन धर्मगुरू प्रीचर बॉब या आणि इतरांच्या व्यक्तिरेखा लेखकाने ठसठशीत रेखाटल्या आहेत. घराच्या मागील अंगणात खणलेल्या माणूस पुरता येईल एवढ्या खोल खड्ड्याचं रहस्य प्रत्येक वेळी चक्रावून टाकतं.

हा खड्डाही या कथानकातील जणू एक मुख्य पात्र ठरतो. ओडेल डीफसचा मुस्लीम दहशतवादी समजून अमेरिकन सैनिकांनी केलेला अमानुष छळ हा या कादंबरीतील बीभत्स रसाचा भयानक आविष्कार आहे.

एका विशाल पटावर घडणाऱ्या मानवी कौर्याचं, फसवणुकीचं, विनोदाची झाक असलेल्या संवेदनशीलतेचं आणि रहस्यमय गुंत्याचं दर्शन कादंबरीत घडतं. ओडेल डीफस या तरुणाच्या सहनशक्तीची परिसीमा पाहण्यासाठी तरी ही रहस्यमय कादंबरी वाचायला हवी. शेवट सुखान्त असला, तरी त्या सुखाला बोचणारे काटे अस्वस्थ करणारे आहेत. अस्सल कलाकृतीचं हे यश म्हणावं लागेल.

-श्रीकांत आंब्रे

दै. सामना, २/७/२०१८

◆

संकरित

डॉ. संजय ढोले



किंमत : १९५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक उपलब्ध

विज्ञानकथेत विविधांगी विषय हाताळलेले असून, एखादं विज्ञान, प्रयोग किंवा त्यांचे निष्कर्ष मानवाच्या जेवढ्या भल्यासाठी वापरता येऊ शकतात; तेवढाच त्या विनाशालाही कारणीभूत ठरू शकतात. 'परिवर्तन' ही कथा मूळपेशींवर आधारलेली आहे. 'कोळिष्टक' ही कथा 'स्पायडर फार्मिंग' व त्यांच्या जनुकावर आधारलेली आहे.

'संकरित' ही कथा जनुकांमध्ये हेतुपुरस्सर बदल घडवून आणल्यानंतरचे परिणाम दर्शविते तर 'अस्तित्व'मध्ये वैद्यकशास्त्रात मानवावरील विधायक प्रयोग दाखविलेला आहे. 'उद्ध्वस्त' ही कथा पदार्थाच्या 'दीपन' या गुणधर्मावर असून, 'अखेर तो परतला' ही कथा स्मृतिपटलांवर आधारित आहे. 'सॉकर' ही कथा फुटबॉलच्या रोमांचक खेळावर विज्ञानाच्या दृष्टिकोनातून भाष्य करणारी आहे. 'विचारवहन' हे मानवी मेंदूतील प्रक्षेपित होणाऱ्या क्षीण लहरींवर आधारलेले आहे. शिवाय 'दुर्गम्य' ही कथा भौतिकशास्त्रातील 'टॅनेलिंग इफेक्ट'वर आधारित आहे.

अभिप्राय

'ययाति'मुळे घडले वाचन-लेखन संस्कार!

ययाति

लेखक	:	वि.स.खांडेकर
पृष्ठसंख्या	:	४३२
किंमत	:	२९५/-

वाचनाची आवड मला लहानपणापासूनच होती व ती आजतागायत टिकून राहिलेली आहे. प्राथमिक शाळेत असताना आम्हाला पुस्तके वाचायला दिली जात नसत. कुणाला कळणार नाही अशा पद्धतीने मी पुस्तके चोरून घेऊन जात असे. पुढे माध्यमिक शिक्षणासाठी हायस्कूलमध्ये दाखल झालो. तिथेही हीच तऱ्हा होती. खूप दर्जेदार व चांगले ग्रंथ मोठमोठाल्या कपाटांत बंदिस्त केलेले होते. कपाटातील बंदिस्त ग्रंथ बघून मला खूप अस्वस्थ व वाईट वाटायचे. 'भेटी लागी जीवा' अशी माझ्या मनाची अवस्था होत असे. दुरून काचेतून मी त्या पुस्तकांचे दर्शन घेऊन समाधान मानत असे.

आठवीच्या पुस्तकात वि.स.खांडेकर लिखित 'ययाति' मधील 'कच-ययाति'चा संवादरूपी उतारा अभ्यासासाठी आम्हाला होता. तो संवाद मला इतका भावला की मी 'ययाति' कादंबरी विकत घेण्याचे ठरविले. आमची घरची परिस्थिती बेतास बातच होती. जिथे क्रमिक पुस्तके मिळण्याची मारामार, तिथे अवांतर वाचनासाठी कथा-कादंबऱ्या कुठून मिळणार? मग मी दिवाळीच्या सुट्टीत गवंड्याच्या हाताखाली कामाला जाऊन पैसे मिळवले. माझे मूळ गाव शेडबाळ ते सांगली हे तीस कि.मी. अंतर सायकलने कापत मी पुस्तक घेऊन आलो. 'ययाति'चा फडशा मी दोन-तीन दिवसांत अधाशीपणे पाडला.

कादंबरी वाचून मी अत्यंत भारावून गेलो. माझी मनोरचना तयार होण्याच्या वयातच ही कादंबरी माझ्या हाती आली होती. परिणामी, माझ्या विचारांना दिशा मिळाली. जवळपास प्रत्येकच पानावर सुभाषितांनी नटलेली चिंतनशील वाक्ये, जीवनाचे तत्त्वज्ञान उलगडणारी, माझ्या मनावर अशा वाक्यांची मोहिनी पडली. माझ्या विचारशैलीवर तसे संस्कार झाले. निराश, अंधारलेल्या मनाला अशी वाक्ये जणू काही दीपस्तंभासारखीच भासतात.

प्रखर सामाजिक जाणीव, समाजातील दुःख कमी करण्याची मनापासूनची तळमळ आणि व्यक्तिगत सुखापेक्षा दुसऱ्याला सुखी करण्यात व त्यासाठी स्वतःच्या सुखाची किंमत देण्याची तयारी, यामध्येच चिरस्थायी आनंद आहे. या व अशा प्रकारच्या मूल्यांचा खांडेवरांच्या साहित्यातून जो पुरस्कार केलेला जाणवतो तो मनाला वेगळाच आनंद देऊन जातो. विचारांना चालना देतो, मनाची मशागत करतो.

'ययाति'मुळे खांडेकर माझे आवडते लेखक बनले. माझ्या वाचन

प्रवासाला खऱ्या अर्थाने याच कादंबरीमुळे गती मिळाली. भावी आयुष्यातील माझ्या ध्येय-धोरणांना ययातिने नकळत आकार दिला. कादंबरीमधील प्रेमकहाणी म्हणा, शृंगाररसाचा पुरेपूर वापर करून फुलवलेले वर्णन असो, त्याचा माझ्या मनावर खूप प्रभाव पडला. पौगंडावस्था म्हणा अथवा त्या वेळच्या मनोरचनेची मानसिक भूक असेल, यामुळे खांडेकरांच्या शब्दांनी खरोखरच अक्षरश: संमोहित केले.

एका संवेदनशील व चिंतनशील मनाने घडविलेल्या 'ययाति'मधील आलंकारिक भाषाशैलीने नटलेल्या वाक्यांनी माझी वाचनाची भूक शमवलीच, शिवाय माझ्यासुद्धा संवेदनशील मनाला साहित्यिक सृजनतेचा आस्वाद दिला. 'ययाति'च्या अनेक पारायणांमुळे माझ्यातला एक लेखकही कधी घडत गेला हे मलासुद्धा कळले नाही. आजपर्यंत मी जे काही मोडकंतोडकं लेखन करीत आलेलो आहे, त्याचं श्रेय मी खांडेकरांना विशेषत: 'ययाति'ला देतो. 'ययाति'च्या वाचनाने एका बाजूला एका अभिजात कलाकृतीच्या आस्वादाचा आनंद तर मिळतोच; शिवाय आपली साहित्यिक अभिरुचीसुद्धा नकळत घडत जाते. ययातिच्या वाचनाने आपल्या विचारांची एक पक्की बैठक तयार होते.

'ययाति' असो अथवा खांडेकरांची कोणतीही साहित्यकृती असो, ते खूपच स्वप्नाळू आणि आदर्शवादी होते अशी टीका केली जाते. असे असते तर 'ययाति' आजही वाचली गेली नसती; पण खांडेकरांनी त्यांच्या साहित्यात प्रतिभेच्या मुक्त कल्पनाविष्काराबरोबर सूक्ष्म वास्तवतेचे यथार्थ चित्रण केलेले आहे. विशेष म्हणजे या थोर मानवतावादी कलावंताला भविष्याचा वेध घेणारी प्रतिभा लाभलेली होती. म्हणूनच मला खांडेकरांच्या सर्व साहित्यकृती आजही आवडतात आणि त्यातल्या त्यात 'ययाति' ही माझी 'ऑल टाइम बेस्ट' आणि फेवरिट कादंबरी आहे.

- उत्तम तळवार,

चिंचवाड, कोल्हापूर

मोबाईल -९९७०७५४१८०

◆

सुलोचनादीदी : मराठी चित्रपट रसिकांच्या मनावर अनेक दशकं अधिराज्य गाजवणाऱ्या सुलोचनादीदींचा नव्वदावा वाढदिवस नुकताच साधेपणाने साजरा झाला. मेहता पब्लिशिंग हाऊसने खास त्यांच्या आवडीचा केक पाठवून त्यांचं अभीष्टचिंतन केलं. तो केक कापताना सुलोचनादीदी.

काळजाला जाळले अन् गायली माझी गज़ल
काल जेव्हा वेदनेने माळली माझी गज़ल

ना कुणी मदतीस आले संकटी माझ्या कधी
पाहुनी मग दु:ख माझे धावली माझी गज़ल

आरसे लाजून जाती पाहती जेव्हा तिला
मोगरा चाफेकळी की, सायली माझी गज़ल?

जोडला संबंध ऐसा मी तिचा माझ्यासवे
रूप मी आहे तिचे अन् सावली माझी गज़ल

सोसले ते बोललो, पण वाहवा झाली अशी
मैफली जिंकून साऱ्या गाजली माझी गज़ल

-स्नेहदर्शन

Registered
Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020
RNI. No. MAHMAR/2000/02739
No. SDO/Pune City/SR/3/2018 - Date : 10/01/2018
Posting at Marketyard, PSO, Pune 411037.
Publication Date : 09/09/2018 Posting Date : 11/09/2018

आवर्जून वाचावे

मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,